Agatha Christie

वृषाली जोशी

# हर्क्युलसचे श्रम- १

# THE LABORS OF HERCULES



A Hercule Poirot Collection

# The Labors of Hercules-1

# हर्क्युलसचे श्रम- १

मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# हर्क्युलसचे श्रम- १

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हर्क्युलसचे श्रम- १

## लेखिका : अगाथा ख्रिस्ती


## अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ ऑगस्ट २०२१

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# हर्क्युलसचे श्रम- १

## कथांचा क्रम

अगाथा ख्रिस्ती

हर्क्युलस

1. हर्क्युलसचे श्रम
2. नेमियन सिंह
3. लर्नियन हायड्रा
4. आर्केडीयन हरिणी
5. इरायमॅथियन डुक्कर
6. ऑजियन तबेले
7. स्टॅयम्फेलियन पक्षी

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी ‘The Mysterious Affair of Styles’ ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या

गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. ‘The Murder of Roger Ackroyd’ या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. ‘And then There Were None’ यावर आधारित हिंदी सिनेमा ‘गुमनाम’ तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या सहा गोष्टींचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

# हर्क्युलस

ग्रीक पुराणकथेप्रमाणे हर्क्युलस हा देवांचा राजा झिअस याचा पुत्र असून, त्याचा सावत्र भाऊ व राजा असलेला युरेस्थियस हा त्याला [ त्याच्या मृत आईमार्फत ] बारा श्रमांची अवघड कामे करायला सांगतो. त्यासाठी हर्क्युलस बारा वर्षे प्रवास करत असतो. ही अशक्य भासणारी कामे तडीस नेऊन तो लोकांच्या मनातील त्याचे स्थान एवढे उंचावतो, की ते त्याला देवत्व बहाल करतात. नंतर तो प्रजेचा आवडता राजा होतो. ही बारा श्रमांची कामे 'हर्क्युलसचे श्रम' म्हणून प्रसिद्ध आहेत.

पहिलेः नेमियन सिंह

दुसरेः लर्नियन हायड्रा

तिसरेः ऑर्केडीयन हरीण

चौथेः इरायमॅथियन डुक्कर

पाचवेः ऑजियन तबेले

सहावेः स्टॅयम्फॅलियन पक्षी

सातवेः क्रेटन बैल

आठवेः डिओमेडसचे घोडे

नववेः हिप्पोलीटाचा कंबरपट्टा

दहावेः गेरयॉनचा कळप

अकरावेः सोनेरी सफरचंदे

बारावेः सर्बेरस कुत्र्यावरील पकड

अगाथा ख्रिस्तीने या हर्क्युलसच्या बारा श्रमांच्या कामांवर आधारित अशी बारा आधुनिक कामे हर्क्युल पायरो करतो, असे पुढील दोन भागात असलेल्या सहा सहा कथांच्याद्वारे मांडले आहे.

# The Labors of Hercules

## हर्क्युलसचे श्रम




हर्क्युल पायरोच्या सदनिकेत आधुनिक फर्निचर होते. ते क्रोमियमने चमकत होते. तेथील खुर्च्या आरामशीरपणे गुबगुबीत

होत्या. त्यांच्या चौकोनी आकारामध्ये काही तडजोड केलेली नव्हती.

त्यापैकी एका खुर्चीवर हर्क्युल पायरो नीट बसला होता. खुर्चीच्या मध्यभागी त्याच्यासमोर दुसऱ्या खुर्चीत, सगळयांचा मुख्य डॉ बर्टोन बसला होता. मोठ्या आनंदाने तो पायरोच्या चॅटेऊ मोटॉन रोथ्सचिल्ड येथील पेयाचे घुटके घेत होता. डॉ बर्टोन व्यवस्थित नव्हता. तो जाडा, गबाळा असून त्याच्या पांढऱ्या केसांमध्ये तांबडी सतेज त्वचा दिसत होती. खोल श्वासाचा आवाज काढत तो हसत असे. त्याच्याभोवती तंबाखूची राख पसरलेली असे. पायरो राख गोळा करायची भांडी त्याच्याभोवती ठेवायचा फुकट प्रयत्न करत होता.

डॉ बर्टोन प्रश्न विचारत होता. "हर्क्युल, मला का ते सांग."

"म्हणजे तुला माझ्या ठेवलेल्या नावाबद्दल विचारायचे आहे का?"

दुसरा विरोध दाखवत बोलला, "ठेवलेल्या नावाबद्दल नव्हे. ते नक्कीच पागन [ ख्रिश्चन, इस्लामिक नसलेले व अनेक देवांना भजणारे ] आहे. पण का? ते मला जाणून घ्यायचे आहे. वडिलांची आवड का? आईचा इच्छेमुळे का? की काही कौटुंबक कारणाने? जर मला बरोबर आठवत असेल, तरी माझी स्मरणशक्ती आता

पूर्वीसारखी राहिली नाही --- तुला अॅचिले नावाचा एक भाऊ आहे, नाही का?”

पायरोचे मन मागे जाऊन अॅचिले पायरोच्या करीयरसंबंधी विचार करू लागले. ते सगळे खरेच घडले होते का?

तो उत्तरला, “फक्त काही काळासाठी.”

डॉ बर्टोनने युक्तीने अॅचिले पायरोचा विषय बदलला. “लोक स्वतःच्या मुलांची नावे ठेवायच्या बाबतीत जास्त जागरूक व्हायला हवेत.” खोलवर विचार करत, तो बोलला, “मला देवासारखी मुले आहेत, हे मला माहिती आहे. त्यातील एक गोरा आहे. तर एक जिप्सीसारखा काळा! मग डेरड्रे आहे. दुःखमय डेरड्रे --- त्या मुलीचे नाव मेरी आहे. ती म्हणजे छोट्या इल माशासारखी आहे. अजून धीर नावाची मुलगी आहे खरे तर तिचे नाव अधीर चांगले शोभले असते, कारण ती तशी आहे. आणि डायना --- ठीक आहे --- तो वयस्क, हुशार जाणता मनुष्य शहारला. आता तिचे वजन बारा दगडांइतके आहे. आणि ती फक्त पंधरा वर्षांची आहे. ते म्हणतात ती फार जाड आहे --- पण मला ती तशी वाटत नव्हती --- त्याना तिला हेलन या नावाने हाक मारायची होती --- पण मी तिथे ठाम राहिलो. तिचे आई वडील व आजी कसे दिसतात, हे मला माहिती होते. त्यामुळे मी मार्था किंवा डोरकसवर किंवा काही

अर्थवाही शब्दावर भर दिला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. माझे श्रम फुकट गेले. तिचे पालक दारूबाज लोक होते.''

पायरो त्याच्याकडे चौकसपणे बघत होता. तो हळूहळू श्वासाचा आवाज करत व चेहऱ्यावर आठ्या पाडत बोलला, ''काल्पनिक संभाषणाचा विचार करता, तुझी आई आणि कैलासवासी मिसेस होम्स या छोटे कपडे शिवत किंवा काही विणत बसल्या आहेत, ''ॲचिले, हर्क्युल, शेरलॉक, मायक्रॉफ्ट --- ''

त्याच्या मित्राच्या विनोदी बोलण्याचा आनंद हर्क्युल पायरो घेऊ शकला नाही. ''मला एवढेच समजले, की मी हर्क्युलससारखा दिसत नाही?''

डॉ बर्टोनचे डोळे त्या छोट्याशा, नीटनेटक्या, पट्टेरी पँट, काळे जाकीट व छान टाय घातलेल्या हर्क्युल पायरोवरून, त्याच्या चामडी बुटांवरून, अंडाकृती डोक्यावरून व वरचा ओठांवर खूप शोभणाऱ्या मिशांवरुन फिरले.

''पायरो, मोकळेपणाने बोलायचे तर तसे नाही. मला वाटते, तुला ती गाजलेली व्यक्तिरेखा जाणून घ्यायला कधी सवड झाली नाही, बरोबर?''

''तसे आहे खरे!''

“हे दयनीय आहे. तू खूप काही गमावले आहेस. जर माझ्या हातात असते, तर मी सगळ्यांना आपली जुनी गाजलेली पुस्तके अभ्यासायला लावली असती.”

पायरोने खांदे शहारवले. “अरे मित्रा, माझे त्यावाचून उत्तम चालले आहे.”

“चालू दे! चालू दे! प्रश्न चालण्याचा नाही आहे. तो फार चुकीचा दृष्टीकोन आहे. हल्लीच्या पत्राद्वारे शिक्षणासारखा आपली जुनी गाजलेली पुस्तके म्हणजे काही झटपट यश मिळवण्याची शिडी नाही. माणसाचे कामाचे तास किती याचे महत्व नाही, त्याच्या फुरसतीच्या वेळाचा प्रश्न आहे. ही चूक आपण सगळे करतो. तुझेच बघ, सर्व चांगले चालले आहे. त्यातून तुला हवे ते मिळत असेल. सोपे करून सांगायचे म्हणजे, तू तुझ्या रिकाम्या वेळाचे काय करणार आहेस?”

पायरोचे उत्तर तयार होते. “मी गंभीरपणे भाजीचे शेत लावणार आहे.”

डॉ बर्टोनना धक्का बसला. “शेती करणार? म्हणजे तुला काय म्हणायचे आहे? त्या फुगलेल्या हिरव्या पाणचट भाज्या?”

पायरो उत्साहाने बोलला, “मला तेच तर करायचे आहे. त्या पाणचट नसतात.”

“ओहो, मला माहिती आहे. त्यांना चीजने, कांद्याने अथवा पांढऱ्या सॉसने शिंपडा.”

“नाही. नाही. तुम्ही चूक करत आहात. माझी कल्पना अशी आहे, की भाजीच्या पिकात सुधारणा करायची. ती फुलांच्या गुच्छासारखी दिसायला हवी.”

“अरे माणसा, ही चांगली कल्पना आहे. ती लाल वाइन आहे. फुलांचा गुच्छ या शब्दामुळे डॉ बर्टोनना त्यांच्या कोपराजवळ असलेल्या पेल्याची आठवण आली. त्याने घोटभर पिऊन त्याचा आस्वाद घेतला. “ही फार छान वाइन आहे. अगदी मस्त! हो. त्याने मान्यतेने त्याचे डोके हलवले. “पण हा भाजीचा व्यवसाय --- त्याबद्दल तू गंभीर नाहीस ना? खरेच तसा तुझा विचार नाही ना?” तो मोठ्या भीतीने विचारत होता --- त्यामुळे तू गाळात जाशील.” त्याचे हात सहानुभूतीपूर्वक त्याच्या ढेरपोटावर विसावले. ”तुझा बेंडबाजा वाजेल.”

पायरो म्हणाला, “तुम्हाला भाजीशेतीबद्दल चांगली माहिती दिसते आहे.”

“मी गावाकडे रहात असतांना, लोकांना हे करतांना पाहिलेले आहे. पायरो, पण खरेच हा काय छंद आहे! त्याची तुलना --- “ त्याचा आवाज खोल समाधानाने कापरा झाला --- पुस्तकांची

ओळ असलेल्या खोलीत शेकोटीसमोर आरामखुर्चीत --- ती खोली लांबलचक असणार --- चौकोनी नाही. सगळीकडे पुस्तके --- पेयाचा पेला भरलेला आणि तुमच्या हातात उघडे पुस्तक! वाचता वाचता काय छान वेळ जातो!" तो खर्जातील आवाजात बोलला.

त्याने भाषांतर केले, "वाइनच्या गडद समुद्रावरील लाटा पायलटने त्याचे कसब वापरून परत सरळ केल्या. डौलदारपणे जहाज वाऱ्यावर डोलत होते... "

अर्थात भाषांतराने मूळ कवितेतील स्वाद येत नाही."

थोडा वेळ त्याच्या उत्साहात मग्न होऊन, तो पायरोला विसरला. पायरोला त्याला बघून एकदम एक संशय आला. --- एक अस्वस्थ कळ आली. इकडे तिकडे त्याचे काही चुकले होते का? जाणीवेची श्रीमंती? त्याच्यावर उदासीचे सावट आले. खरेच त्याने जुनी गाजलेली पुस्तके अभ्यासायला हवी होती --- फार पूर्वीच --- आता त्यासाठी फार उशीर झाला.

डॉ बर्टोनने त्याची खुपणारी उदासी दूर हटवत विचारले, "तू खरेच निवृत्त व्हायचा विचार करतो आहेस का?"

"हो."

दुसरा गालातल्या गालात हसत बोलला, “नाही. असे करू नकोस.”

“पण मी तुला सांगतो आहे.”

“अरे, पण तू हे करू शकणार नाहीस. तुला तुझ्या कामात खूप रुची आहे.”

“नाही, खरेच मी सर्व तजवीज केली आहे. आणखी काही केसेस --- विशेषतः निवडक केसेस --- नाही. माझ्याकडे येतील त्या सर्व नव्हे. फक्त खासगीपणे विनवणी करणाऱ्या!”

डॉ बर्टोन जिवणी रुंद करत बोलला, “असे आहे तर! एखाददुसरी केस, अजून एकच केस --- असे करत --- पायरो, प्रिमा डोनाच्या शेवटच्या कामाची केस बहुधा तुझ्या यादीत नसेल.”

तो छोटा, पांढऱ्या केसांचा माणूस मित्रत्वाने गालातल्या गालात हसत बोलला, “तुझे श्रम हर्क्युलसचे श्रम नाहीत. तुझे प्रेमाचे श्रम आहेत. मी चुकीचे बोलत असेन वा बरोबर असेन, तर तू बघशीलच. मी पैज लावतो की बारा महिन्यांच्या काळात, तू अजून इथेच असशील. भाजी उगवायचा विचार अजून --- “ तो शहारला. “फक्त विचारच राहील.”

त्याच्या पाहुण्याचा निरोप घेऊन, डॉ बर्टोनने चौकोनी खोली सोडली. पायरो पुन्हा न वाचण्यासाठी पाने उलटत राहिला. त्याने मागे ठेवलेल्या कल्पनेबरोबर आपल्याला काम करायला हवे.

तो गेल्यावर पायरो हळूच स्वप्नातल्यासारखा बसला व गुणगुणला, “हर्क्युलसचे श्रम --- मी ठीक आहे. तू? हे चिरडीला आणणारे आहे.”

दुसऱ्या दिवशी पायरोने स्लीमरने लिहिलेले गाईच्या कातड्याच्या वेष्टनातील पुस्तक आणले व सततच्या लकड्यामुळे एक त्रासिक कटाक्ष त्यातील छापील मजकुरावर टाकला.

त्याची सचिव मिस लेमनला त्यातील हर्क्युलसचे श्रम शोधण्याचे काम देऊन, ते त्याच्यासमोर ठेवायला सांगण्यात आले. त्यात रस नसतांना [ तिचा स्वभाव कुठलेही काम नाकारण्याचा नव्हता. ] तिने झटपट तिचे काम पूर्ण केले.

‘त्या आश्चर्यचकित करणाऱ्या समुद्रासारख्या विशाल, जुन्या गाजलेल्या व मौखिक परंपरेने पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या प्रसिद्ध नायक हर्क्युलसने पायरोचे डोके खायला सुरवात केली. मरणानंतर त्याला देवांच्या ओळीत बसवले गेले आणि त्याला दैवी मान दिला जाऊ लागला.’ इथपर्यंत ठीक होते पण नंतरचा भाग जरा गुंतागुंतीचा होता. पायरोने दोन तास तो लक्ष देऊन वाचला.

त्यावरून टिपणे काढली. भुवया उंचावत, कागदांच्या तुकड्यांचा अर्थ लावत आणि इतर पुस्तकांचा संदर्भ घेऊन, तो त्या कामात गुंतलेला राहिला. शेवटी तो खुर्चीत मागे सरकून आरामात बसला व मान हलवली. आधीच्या संध्याकाळची त्याची मनस्थिती निघून गेली. काय लोक असतात! हा हर्क्युलस घ्या. हा नायक! तो काय होता, तर महाकाय, स्नायुबल असलेला, पण डोक्याने जरा कमी असलेला आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचा! पायरोला एकदा १८९५ मध्ये लयॉन येथे ज्याच्यावर खटला चालवला गेला, त्या ॲडॉल्फ डयुरांड नावाच्या खाटकाची आठवण झाली. त्याची ताकद एखाद्या बैलासारखी होती व त्याने अनेक मुलांना ठार मारले होते. त्याला अत्यंत त्रासदायक अशी चक्कर येत असल्याचे सांगून त्याची केस लढवली गेली. चक्करेचे स्वरूप फार मोठे होते की लहानसे, यावर अनेक दिवस चर्चा झाली. हा पुराणातील हर्क्युलस बहुधा मोठ्या त्रासदायक स्वरूपच्या चक्करेने बेजार होता. नाही. पायरोने डोके हलवले. नाही. ही जर ग्रीक नायकाची कल्पना असेल, तर आधुनिक मोजमापाने ते चालणार नाही.

त्या जुन्या धाटणीने त्याला चक्रावून टाकले. या त्या काळातील देवदेवतांना आधुनिक काळातील गुन्हेगारांसारखी टोपणनावे होती. नक्कीच त्यांचे स्वरूप गुन्हेगारी असले पाहिजे. दारूसारखी पेये घेणे, लैंगिक वर्तनातील आनंद उपभोगणे, बहीण

भावातील लैंगिक संबंध, स्त्रियांवरील लैंगिक बळजोरी, चोऱ्या, खूनखराबा आणि फसवणूक यामुळे --- कोर्ट केसेस आणि जज्जचे निकाल या गोष्टी सतत चालू असणार. चांगले कौटुंबिक आयुष्य नाही. सुव्यवस्था नाही. त्यांच्या गुन्हा करण्यातदेखील काही पद्धत नाही.

या सर्व गोष्टींमुळे अपेक्षाभंग झालेला पायरो उठून उभा रहात बोलला, "खरेच हर्क्युलस! त्याने आजूबाजूला पसंती दर्शवत पाहिले. आधुनिक फर्निचर असलेली चौकोनी खोली --- एखाद्या खोलीत एखादे आधुनिक शिल्प ठेवलेले! कुठे तांब्याच्या वायरची भौमितिक रचना केलेली! आणि या सर्वांमध्ये चमकणारा तो! त्याने आरशात स्वतःकडे पाहिले. इथे आधुनिक हर्क्युलस होता --- त्या पुराणातील कुरूप, फुगलेल्या स्नायुंच्या, हातात शस्त्र धरलेल्या, नग्न आकृतीपेक्षा खूप वेगळा. छोट्याशा नीटनेटक्या आकृतीचा, चांगल्या शहरी कपड्यात, मिशा असलेला --- अशा मिशा ठेवायचे कधी हर्क्युलसला स्वप्नातही सुचले नसते. मोठ्या पण तरीही सुसंस्कृत मिशा. तरीही हर्क्युल पायरो आणि सनातन रूढीच्या हर्क्युलसमध्ये एका गोष्टीत साम्य आहे. दोघेही संशयातीतपणे, जगाला त्रास देणाऱ्या उपद्रवी गोष्टींपासून जगाचे संरक्षण करत आहेत --- दोघेही ते रहातात, त्या समाजाचा फायदा करून देणारे आहेत.

काल रात्री जाताना डॉ बर्टोन काय म्हणाला होता --- "तुझे श्रम हर्क्युलससारखे नाहीत --- "

ओहो, पण तो चुकीचे बोलला होता. जुना प्राणी! इथे पुन्हा एकदा हर्क्युलसचे श्रम केले जाणार आहेत --- आधुनिक हर्क्युलसचे --- हुशार व मनोरंजन करणाऱ्या हर्क्युलसची अभिमानाची गोष्ट इथे घडणार आहे. त्याच्या निवृत्तीपूर्वी तो बारा केसेस घेईल. कमी नाही आणि जास्तही नाही. या बारा केसेस जुन्या हर्क्युलसच्या बारा श्रमांशी मिळत्या जुळत्या असतील. हो. ते फारच मनोरंजक ठरेल. ते कलात्मक व अध्यात्मिक असेल.

पायरोने ते जुने, बहुमुल्य पुस्तक उचलले आणि पुन्हा त्याच्यात बुडून गेला. तो हर्क्युलसच्या बारा श्रमांशी अगदी सहीसही नक्कल करणार नव्हता. त्यात बाई किंवा नेससचा शर्ट असणार नव्हता --- श्रम आणि फक्त श्रम.

मग पहिले श्रम नेमीयन सिंहाचे असणार होते. 'नेमीयन सिंह' त्याने त्याच्या जिभेला सवय होण्यासाठी पुनरुच्चार केला. अर्थात त्याला मास आणि रक्त असलेल्या सिंहाची अपेक्षा नव्हती. प्राणीसंग्रहालयातील अधिकारी काही त्याच्याकडे त्यांची खऱ्या सिंहाची समस्या घेऊन येणार नव्हते. तसे झाले असते, तर ते अतीच सादृष्य ठरले असते. नाही. इथे ते प्रतीकात्मक असणार होते. या


पहिल्या केसमध्ये समाजातील कोणीतरी प्रसिद्ध व्यक्ती असायला पाहिजे. ती महत्वाची आणि भावनाशीलदेखील असायला हवी. कोणी मोठा गुन्हेगार --- किंवा पर्याय म्हणून, लोकांच्या मते सिंह असायला हवा. कुणी प्रसिद्ध लेखक वा राजकीय नेता वा चित्रकार किंवा राजघराण्यातीलही चालेल का?

त्याला राजघराण्यातील व्यक्तीची कल्पना आवडली ---

त्याला काही घाई नव्हती. तो त्या खूप महत्वाच्या केससाठी थांबला असता --- त्याने स्वतः होऊन स्वतःवर लादलेले हे श्रमाचे काम होते.

# THE NEMEAN LION

## नेमियन सिंह




दुसऱ्या दिवशी सकाळी आत आल्या आल्या पायरोने विचारले, “मिस लेमन, आज सकाळी काही उत्कंठा वाढवणारे आले आहे का?”

त्याचा मिस लेमनवर विश्वास होता. ती कल्पनाशक्ती नसलेली स्त्री होती. पण तिच्याकडे सहजप्रवृत्ती होत्या. ती जे विचार

करण्यासारखे असल्याचे म्हणे, ते खरेच तसे असे. ती उपजत सचिव होती.

"मिस्टर पायरो, फारसे काही नाही. पण तुम्हाला उत्सुकता वाटेल, असे एक पत्र आहे. मी ते गठ्ठ्यात सर्वात वर ठेवले आहे."

पायरोने एक रुचीपूर्ण पाऊल पुढे टाकत विचारले, "आणि ते काय आहे?"

"ते एका माणसाकडून आले आहे. त्याच्या बायकोचा हरवलेला बुटक्या पायांचा छोटा चिनी कुत्रा शोधायचा आहे."

त्याचे पाय हवेत असलेल्या अवस्थेत पायरो थांबला. त्याने मिस लेमनकडे एक विचारपूर्वक कटाक्ष टाकला. तिचे लक्ष नव्हते. तिने टंकलेखनाला सुरवात केली होती. ती आग ओकणाऱ्या रणगाड्यासारखे ते फार वेगाने व अचूकपणे करे.

पायरोला धक्का बसला होता व धक्का बसून कटूपणा आला होता. तत्पर मिस लेमनने त्याला तसे व्हायला भाग पाडले होते. छोटा चिनी कुत्रा! बुटक्या पायांचा छोटा चिनी कुत्रा! काल रात्री त्याला पडलेल्या स्वप्नानंतर आणि व्यक्तिशः त्याचे आभार मानले गेल्यांनतर, तो बकिंगहॅम राजवाड्यातून आता बाहेर पडतो आहे आणि नोकर त्याचे सकाळचे चॉकलेट पेय घेऊन येतो आहे, असे त्याने पाहिले होते.

त्याच्या ओठांवर शब्द थरथरले --- शहाणपणाचे जहरी शब्द. त्याने ते उच्चारले नाहीत. कारण मिस लेमनच्या वेगवान व अचूक टंकलेखनात तिने ते ऐकले नसते.

शिसारी येऊन त्याने टेबलावरच्या गठ्ठ्यातील सर्वात वरचे पत्र उचलले.

बरोबर. ते मिस लेमन म्हणाली तसेच होते. शहराचा पत्ता होता --- व्यवसायासारखी रोखठोक गावठी मागणी. विषय --- बुटक्या पायांच्या छोट्या चिनी कुत्र्याचे अपहरण! मोठे डोळे असणारा व फार कुरवाळला जाणारा श्रीमंत बाईचा कुत्रा. ते वाचतांना हर्क्युल पायरोचे ओठ वाकडे झाले.

यात काही विशेष असे नाही. काही जगावेगळेही नाही. पण हो --- हो, एक लहानशी गोष्ट सोडली तर --- मिस लेमनचे बरोबर होते. एका लहानशा गोष्टीत काही वेगळे होते.

हर्क्युल पायरो बसला. त्याने काळजीपूर्वक व सावकाश ते पत्र वाचले. ते त्याला हव्या असलेल्या केससारखे नव्हते. त्याला सोडवल्यावर अभिमान वाटेल अशी ती केस नव्हती. ती फार महत्वाची वाटत नव्हती. अगदीच फालतू होती. त्याने ती सोडवण्यास हरकत घ्यावी असा महत्त्वाचा मुद्दा होता, की ती हर्क्युलसच्या श्रमांपैकी नव्हती --- अजिबात नव्हती.

पण दुर्दैवाने तो त्या बाबतीत चौकस होता ---

हो, तो चौकस होता ---

मिस लेमनच्या टंकलेखनाच्या आवाजापेक्षा मोठा आवाज काढून त्याने आज्ञा दिली, “सर जोसेफ हॉगीनना फोन कर. त्याने सुचवल्याप्रमाणे त्याच्याबरोबर त्याच्या कार्यालयातील माझ्या भेटीची वेळ निश्चित कर.”

नेहमीप्रमाणे मिस लेमन बरोबर होती.

सर जोसेफ हॉगीन म्हणाले, “मिस्टर पायरो, मी एक साधा माणूस आहे.”

हर्क्युल पायरोने त्याच्या उजव्या हाताने काही नेमके न म्हणण्याचे हावभाव केले. [ जर तुम्ही तसे घ्यायचे ठरवले, तर ] ते सर जोसेफ हॉगीनच्या व्यावसायिकतेची व नम्रपणाची स्तुती दर्शवत होते. ते डौलदारपणे त्या वाक्याचे महत्व कमी देखील करत होते. काही झाले तरी पायरोच्या मनात काय आहे, याचा थांगपत्ता ते लागून देत नव्हते. त्यामुळे सर जोसेफ नक्कीच [ थोड्या गोंधळलेल्या अवस्थेत अर्थ काढून ] तो खरेच अगदी साधा माणूस असल्याचे सिद्ध करत होते. पायरोचे डोळे टीका करत, जोसेफच्या गालाच्या सुजलेल्या खालच्या भागाकडे --- छोट्या डुकरा-

सारख्या डोळ्यांकडे, भोपळ्यासारख्या नाकाकडे व ओठ मिटलेल्या तोंडाकडे, स्थिरपणे बघत होते.

तो पूर्ण सामान्य असा परिणाम त्याला कसली तरी व कुणाची तरी आठवण करून देत होता --- पण या क्षणी त्याला ते कोण व काय होते, ते आठवत नव्हते. सावकाशीने स्मृती चाळवून बघितली गेली. फार काळापूर्वी --- बेल्जियममध्ये --- नक्की काहीतरी --- साबणाशी संबंधित ---

सर जोसेफचे चालू होते.

“मी तेच तेच बोलत नाही. जरुरीचे नसलेले काही बोलत नाही. मिस्टर पायरो, बहुतेक लोक आहे तसेच चालू ठेवतात. वाईट कर्ज म्हणून ते विसरून जा, त्याला हद्दपार करून टाका. पण जोसेफ हॉगीन तसे करत नाही. मी श्रीमंत मनुष्य आहे --- आणि तसे पाहिले तर दोनशे पौंड म्हणजे माझ्याकरता फारसे नाहीत --- “

पायरोने हळूवारपणे शेरा मारला,

“मी तुमचे अभिनंदन करतो.”

“काय?”

सर जोसेफ मिनिटभर स्तब्ध राहिले. त्यांचे लहान डोळे अजून बारीक झाले. ते कडकपणे बोलले,

“म्हणजे मला असे म्हणायचे नाही, की मी माझे पैसे उधळतो. मी बाजारमूल्य चुकते करतो. त्याहून अधिक नाही.”

पायरो म्हणाला, “तुम्हाला माझी फी जास्त वाटते का?”

सर जोसेफ त्याच्याकडे लबाडीने बघत बोलले, “हो. हो. पण हा फार गौण मुद्दा आहे.”

पायरोने त्याचे खांदे उडवले व बोलला,

“मी भाव करत नाही. मी माझ्या कामात निष्णात आहे. आणि निष्णात माणसाकडून सेवा घ्यायला तुम्हाला पैसे मोजावे लागतात.”

सर जोसेफ मोकळेपणे बोलले,

“अशा प्रकारच्या गोष्टींमध्ये तुम्ही एक नंबर आहात. मी चौकशी केली तेव्हा मला असे समजले, की उपलब्ध माणसांपैकी तुम्ही सर्वोत्कृष्ट आहात. मला या बाबतीत अगदी खोलापर्यंत जायचे आहे. त्यामुळे मी घासाघीस करत नाही. म्हणून तर मी तुम्हाला इकडे बोलावून घेतले.”

पायरो म्हणाला, “तुम्ही नशीबवान आहात.”

पुन्हा सर जोसेफ उद्गारले, “काय?”

हर्क्युल पायरो ठामपणे बोलला, “फारच भाग्यवान! मी अवाजवी नम्रतेशिवाय म्हणू शकतो, की मी माझ्या व्यावसायिक यशाच्या शिखरावर आहे. लवकरच मी निवृत्त होणार आहे --- मग

मी स्वस्थपणे रहाणार, जग बघण्यासाठी प्रवास करणार --- किंवा कदाचित माझ्या बागेकडे लक्ष देणार --- भोपळ्यांसारख्या भाज्या छान फोफावतील इकडे लक्ष देणार. मोठ्या हायब्रीड भाज्या --- पण त्यांचा स्वाद नष्ट होतो. तसे मला करायचे नाही. मला एवढेच स्पष्ट करायचे आहे, की मी माझे नेमके उद्दिष्ट ठरवले आहे. मी फक्त बारा केसेस घ्यायचे ठरवले आहे. त्याहून जास्त नाही. कमी नाही. 'हर्क्युलची कामे' अशी स्वतःवर लादलेली बंधने! सर जोसेफ, या बारांमधील तुमची पहिली केस आहे." त्याने उसासा टाकला. "मी तिच्या धक्कादायक गौणपणामुळे, या केसकडे आकर्षित झालो."

सर जोसेफ म्हणाले, "गौणपणा?"

"मी तेच म्हणालो. मला अनेक कारणांसाठी बोलावले जाते --- खुनाच्या तपासासाठी, संदीग्ध मरणांसाठी, दागिन्यांवरील डाका, चोऱ्यामाऱ्या, यासाठी. पण पहिल्यांदाच मला छोट्या चिनी कुत्र्याच्या अपहरणाची केस मिळाली आहे."

सर जोसेफ खाखरले व म्हणाले,

"तुम्ही मला आश्चर्यचकित करता. मला असे म्हणावे लागेल, की स्त्रिया त्यांच्या पाळीव कुत्र्याबद्दल किती त्रास देतात, याला काही सुमारच नाही."

“ते नक्की आहे. पण असे पहिल्यांदाच झाले आहे, की अशा केसमध्ये मला नवऱ्याकडून बोलावले गेले आहे.”

सर जोसेफचे बारीक डोळे अजूनच बारीक झाले. ते म्हणाले,

“मला तुमची शिफारस का करण्यात आली, ते मला समजू लागले आहे. मिस्टर पायरो, तुम्ही गर्विष्ठ माणूस आहात.”

पायरो पुटपुटला, आता तुम्ही मला केससंबंधीचे मुद्दे सांगा. कुत्रा नाहीसा झाला. कधी?”

“बरोबर आठवड्यापूर्वी.”

“आणि मला वाटते, या वेळेपर्यंत तुमची बायको काळजीने बेजार झाली असेल.”

सर जोसेफने सुरवात केली,

“तुम्हाला समजत नाही आहे. कुत्रा परत आला आहे.”

“परत आला आहे? मग माझे इथे काय काम आहे?”

सर जोसेफचा चेहरा जांभळा लाल झाला.

“कारण मला पैसे घालवायची हौस आली आहे. मिस्टर पायरो, मग आता, मी तुम्हाला सगळी गोष्ट सांगतो. आठवड्यापूर्वी कुत्रा चोरला गेला --- माझ्या बायकोच्या सहकारी बाईबरोबर केन्सिंग्टन बागेत कुत्रा गेला असतांना, तो कुणाला तरी चावला.

दुसऱ्या दिवशी माझ्या बायकोकडे दोनशे पौंडांची मागणी केली गेली. मी तुम्हाला विचारतो --- दोनशे पौंड! नेहमी तुमच्या पायात येणाऱ्या व भुंकणाऱ्या त्या बेकार प्राण्यासाठी!”

पायरो पुटपुटला,

“अशा कारणासाठी एवढी रक्कम देणे, अर्थातच तुम्हाला मंजूर नसेल, नाही का?”

“अर्थात नव्हते. म्हणजे मला माहिती असते, तर नक्कीच मला ते मान्य झाले नसते. मिली [ माझी बायको ] हिला ते चांगलेच माहिती होते. तिने मला काही सांगितले नाही. तिने एक पौडांच्या नोटांचे बंडल दिलेल्या पत्त्यावर पाठवून दिले.”

“आणि कुत्रा परत मिळाला?”

“हो. त्या संध्याकाळी घंटी वाजली आणि तो लबाड दाराशी बसलेला होता. बाकी कोणी दिसत नव्हते.”

“ठीक आहे. पुढे सांगा.”

‘मग तिने काय केले, ते अर्थात मिलीने कबूल केले. रागाने माझा थोडा तोल गेला. पण जरा वेळाने मी शांत झालो --- शेवटी व्हायचे ते होऊन गेले होते. थोडा तरी शहाणपणा असलेल्या बाईने असे वागावे --- जर मला वयस्क सॅम्युल्सन क्लबमध्ये भेटला नसता, तर मी सर्व काही सोडून दिले असते.”

“हो का?”

“जाऊ दे. ही लोकांना फसवण्याची युक्ती असणार. त्याला देखील बरोबर असाच अनुभव आला. त्याच्या बायकोला त्यांनी तीनशे पौंडांना फसवले. हे जरा अतीच झाले. मी हे थांबवायचे ठरवले. म्हणून मी तुम्हाला बोलावले.”

“सर जोसेफ, खात्रीने योग्य [ आणि खूपच स्वस्त ] गोष्ट, पोलिसांना बोलावणे, ही ठरली असती, नाही का?”

सर जोसेफने त्याचे नाक खाजवले. तो म्हणाला,

“मिस्टर पायरो, तुम्ही विवाहित आहात का?”

पायरो उत्तरला, “अरेरे, माझे तेवढे भाग्य नाही.”

सर जोसेफ म्हणाला, “हं, भाग्य की काय ते माहिती नाही. पण तुम्ही तसे असतात, तर तुम्हाला कळले असते की बायका या विनोदी प्राणी असतात. मी नुसते पोलिसांचे नाव काढले असते, तर माझी बायको बेभान झाली असती --- तिच्या डोक्यात असे आहे, की मी पोलीसांकडे गेलो, तर तिच्या मूल्यवान कुत्र्याला काहीतरी होईल. ती माझे काही ऐकून घेत नाही --- आणि मी असेही म्हणू शकतो, की तुम्हाला बोलवायची कल्पना देखील तिला फारशी पसंत नव्हती. पण मी त्यावर ठाम राहिलो. शेवटी ती तयार झाली.

पण तुम्हाला सांगून ठेवतो, तिला हे काही फारसे आवडलेले नाही.”

पायरो पुटपुटला,

“म्हणजे मामला नाजूकच आहे म्हणायचा. जर मी पुढचे काही जाणून घेण्यासाठी तुमच्या बायकोची मुलाखत घेतली, तर मला तिचा कुत्रा सुरक्षित रहाण्याची हमी द्यावी लागेल, असे दिसते.”

सर जोसेफने होकारार्थी मान हलवली व तो उठला. तो बोलला,

“मी तुम्हाला माझ्याबरोबर गाडीने घेऊन जातो.

## दोन

मोठ्या, फर्निचरने सजवलेल्या गरम हॉलमध्ये दोन स्त्रिया बसलेल्या होत्या.

सर जोसेफ आणि मिस्टर पायरो आत शिरल्याबरोबर तो छोटा चिनी कुत्रा जोराने भुंकत धावत आला व पायरोच्या पायांभोवती धोकादायकपणे गोल गोल फिरू लागला.

“शान --- शान इकडे ये. आईकडे ये. छान --- मिस कारनबी, त्याला उचलून घे.”

दुसरी बाई घाईने पुढे आली. पायरो पुटपुटला,

“जणू खराखुरा सिंहच आहे.”

थोड्या धापा टाकत शानला पकडणारीने कबूल केले.

“खरोखर, तो इतका चांगला राखणदार आहे. तो कशालाही व कुणालाही घाबरत नाही. तो शहाणा मुलगा आहे.”

पद्धतशीर ओळख करून दिल्यावर, सर जोसेफ म्हणाले,

“तर मिस्टर पायरो, मी इथे तुम्हाला त्याच्याशी ओळख करून घ्यायला सोडतो.” मान हलवत, तो बाहेर पडला.

हॉगीन बाईसाहेब ही पोरकट, चिडचिडी, जाडसर व रंगवलेल्या लाल केसांची बाई होती. फडफडणारी तिची सहकारी मिस कारनबीसुद्धा जाडसर, चाळीस ते पन्नास वयामधील, मैत्रीपूर्ण दिसणारी बाई होती. हॉगीन बाईसाहेबांबरोबर ती त्यांना मान देऊन, नम्रपणे वागताना दिसत होती आणि ती मालकिणीला मरणांतिक घाबरत होती.

पायरो म्हणाला, “हॉगीन बाईसाहेब, आता मला या फार वाईट गुन्ह्याबद्दलची सर्व परिस्थिती सांगा.”

हॉगीन बाईसाहेब लाजल्या.

“मिस्टर पायरो, मी तुम्हाला असे बोलतांना ऐकून फार खूष झाले. कारण तो गुन्हाच होता. हे छोटे चिनी कुत्रे अगदी मुलांसारखे अती भावनाप्रधान असतात. बिचारा शान दुसऱ्या कशाने नाही, पण भीतीने मरायला आला होता.”

मिस कारनबीने दम टाकत आमची दखल घेतली.

“हो, ते फार दुष्टपणाचे होते ---दुष्टपणाचे!

काय काय झाले, ते मला सांगा.”

“तर ते असे झाले. कारनबीने शानला बागेत चक्कर मारायला नेले होते.”

“हो, ती सर्वस्वी माझी चूक होती. मी इतक्या मूर्खपणे व काळजी न घेता कशी काय वागले, कोण जाणे!

हॉगीन बाईसाहेब कटूपणे बोलल्या,

“मी तुझ्याबद्दल काही नाराजी दाखवत नाही. पण तू जास्त सावधान रहायला हवे होतेस, असे मला वाटते.”

पायरोने कारनबीकडे नजर वळवली.

“काय झाले?”

कारनबी तयारीने पण थोडी गोंधळून बोलू लागली,

“तर ती फार असामान्य गोष्ट घडली. आम्ही नुकतेच फुलांच्या कडेने चाललो होतो. अर्थात शान माझ्यापुढे होता --- त्याचे हिरवळीवर थोडे धाऊन झाले --- आता वळून मी घरी जायला निघणार होते. तेव्हा माझे लक्ष बाबागाडीतील एका बाळाकडे गेले ते इतके छान मूल होते --- ते माझ्याकडे बघून हसले. त्याचे गोबरे गुलाबी गाल आणि कुरळे केस! ते मूल किती वर्षाचे आहे असे दाईला विचारण्याच्या मोहापासून मी मला परावृत्त करू शकले नाही --- ती म्हणाली. सतरा महिन्यांचे आहे. मी तिच्याशी एक दोन मिनिटे बोलले असेन. मग मी अचानक खाली पाहिले तर शान तिथे नव्हता. कुत्र्याचा पट्टा कापला गेला होता --- “

हॉगीन बाईसाहेब म्हणाल्या,

“जर तू तुझ्या कामाकडे नीट लक्ष दिले असतेस, तर कोणी त्याची तक्रार करून पट्टा तोडला नसता.”

मिस कारनबी जवळजवळ रडायला आली होती. पायरो घाईने बोलला,

“पुढे काय झाले?”

“अर्थात मी सगळीकडे शोधले. हाका मारल्या. बागेच्या पहारेकऱ्याला विचारले, की त्याने कुणाला छोट्या चिनी कुत्र्याला घेऊन जातांना बघितले का, पण त्याला तसे कुणीच दिसले नव्हते

--- काय करावे, ते मला समजेना --- मी त्याला शोधत राहिले. अर्थात पण शेवटी, मी घरी आले --- “

मिस कारनबी एकदम शांत झाली. पायरो त्या प्रसंगाची कल्पना करू शकत होता. त्याने विचारले,

“मग तुम्हाला पत्र आले?”

हॉगीन बाईसाहेब सांगू लागल्या.

“दुसऱ्या दिवशी सकाळी पहिल्या डाकेने पत्र आले. त्यात लिहिले होते की जर शानला जिवंत बघायचे असेल, तर साध्या पाकिटातून खालील पत्त्यावर एकेक डॉलरच्या नोटांमध्ये २०० डॉलर पाठवून द्या. कॅप्टन कर्टीस, ३८, ब्लूम्सबरी चौक. त्यात पुढे लिहिले होते, जर पोलिसांना कळवले वा पैसे पाठवले नाहीत, तर कुत्र्याचे कान व शेपूट कापून टाकण्यात येईल.”

मिस कारनबी नाकाने सू सू करू लागली. ती पुटपुटली,

“इतके भीतीदायक! इतके टोकाचे रागीट कुणी असू शकते?”

हॉगीन बाईसाहेबांनी चालू ठेवले.

“त्यात लिहिले होते, की जर मी पैसे लगेच पाठवले, तर शानला त्याच संध्याकाळी परत धाडण्यात येईल. पण उशीर लावल्यास व पोलिसांकडे गेल्यास, शानला शिक्षा करण्यात येईल --- “

डोळे भरून आलेली मिस कारनबी पुटपुटली,

“जरी पायरो साहेब पोलीस नसले, तरीसुद्धा मी इतकी घाबरले आहे.”

हॉगीन बाईसाहेब काळजीने म्हणाल्या,

“तर मिस्टर पायरो, तुम्हाला हे काम जपून करावे लागेल.”

हर्क्युल पायरोने झटपट त्यांची काळजी घालवली.

“पण मी पोलीस नाही. मी गुप्तता पाळून व काळजी घेऊनच, शांतपणे, चौकशी करणार. हॉगीन बाईसाहेब, तुम्ही अगदी निश्चिंत रहा. शान पूर्णपणे सुरक्षित असेल, याची मी ग्वाही देतो.”

त्याच्या जादुई बोलण्याने दोन्ही स्त्रियांनी सुटकेचा श्वास सोडला. पायरो पुढे बोलत राहिला, “इथे तुमच्याकडे ते पत्र आहे?”

हॉगीन बाईसाहेबांनी मान हलवली.

“नाही. मला त्यात गुंडाळून पैसे पाठवावेत, अशी सूचना होती.”

“आणि तुम्ही तसे केलेत?”

“हो.”

“हं, हे दयनीय आहे.”

मिस कारनबी स्पष्टपणे बोलली,

“माझ्याकडे शानचा तुटका पट्टा आहे. मी तो आणू का?”

ती खोलीबाहेर गेली. ती गेल्यामुळे पायरो काही प्रश्न विचारू शकला.

“ॲमी कारनबी? ओहो! ती ठीक आहे. थोडी मूर्ख असली, तरी चांगली दिसते. मी बऱ्याच सहकारी महिला पाहिल्या आहेत आणि त्या सर्व मूर्ख आहेत. पण ॲमी शानवर जीव टाकणारी आहे. ती या गोष्टीमुळे खूपच उदास झाली आहे. बाबागाडीवर ओणवी होऊन माझ्या आवडत्याकडे दुर्लक्ष करणारी अशी ती आहे. या जुन्या नोकराणी सगळ्या सारख्याच! बाळांवर जीव टाकणाऱ्या! मला खात्री आहे आहे की यात तिचा काही हात नाही.”

पायरोने कबूल केले, “तसे काही वाटत नाही. पण तिच्या ताब्यात असतांना शान नाहीसा झाल्यामुळे, तिच्या प्रामाणिकपणाबद्दल खात्री करून घेणे गरजेचे आहे. ती तुमच्याबरोबर खूप काळ आहे का?”

“जवळपास वर्षभर. ती ज्यांच्या ओळखीने आली, ते सर्व चांगले लोक आहेत. वयस्क हार्टींगफिल्ड बाईसाहेब मरेपर्यंत, दहा वर्षे ती त्यांच्याकडे होती. त्यानंतर काही दिवस ती एका अपंग परिचारीकेकडे होती. ती खरेच फार चांगली आहे --- पण मी म्हटल्याप्रमाणे सर्वथा मूर्ख!”

त्याच मिनिटाला ॲमी कारनबी थोडीफार कमी दमून, परत आली. तिने मोठ्या गंभीरपणे तो तुटका कुत्र्याचा पट्टा काही अपेक्षेने पायरोच्या हातात दिला.

पायरोने त्याचे काळजीपूर्वक निरीक्षण केले. तो म्हणाला,

“हो. हा नक्की कापलेला दिसतो आहे.”

दोन बायका अपेक्षेने थांबल्या होत्या. तो बोलला, ”मी हा माझ्याकडे ठेवतो.”

मोठ्या डौलदारपणे त्याने तो खिशात ठेवला. दोघी बायकांनी सुटकेचा निःश्वास टाकला. त्याच्याकडून ज्याची अपेक्षा होती, ते त्याने केले.

## तीन

काहीही तपासल्याशिवाय न सोडण्याची पायरोची सवय होती.

मृत हार्टींगफिल्ड बाईसाहेबांची पुतणी असलेली मिस कारनबी जरी चेहऱ्यावरून निर्दोष वाटत असली, तरी पायरोने तिची मुलाखत घ्यायचे ठरवले.

मिस मालट्राव्हर्स म्हणाली, “ॲमी कारनबी? अर्थात मला ती चांगली आठवते. ती चांगली होती आणि ज्युलिया आत्याची तिने खूप काळजी घेतली. ती कुत्र्यांच्या बाबतीत मायाळू असून, मोठ्याने चांगले वाचून दाखवू शकते. हुशार आहे. अपंग लोकांना कधीच विरोध दाखवत नाही. तिला काय झाले? मी आशा करते की ती काही दुःखात नसेल. मी तिला सुमारे वर्षापूर्वी ह पासून सुरु होणाऱ्या एका बाईचा पत्ता दिला होता.”

पायरोने घाईने सांगितले, “अजून ती तिथेच आहे. हरवलेल्या कुत्र्यासंबंधी मी काही चौकशी करत होतो.”

“ॲमी कारनबी कुत्र्यांच्या बाबतीत मायाळू आहे. माझ्या आत्याकडे छोटा चिनी कुत्रा होता. ती वारल्यावर तिने तो मिस कारनबीच्या हवाली केला. मला वाटते तो कुत्रा मेला तेव्हा तिला फार शोक झाला. जरी फार हुशार नसली, तरी ती खूप चांगली आहे.”

पायरोने कबूल केले की कदाचित तिला फारसे हुशार म्हणता आले नसते.

त्याची पुढची भेट बागेच्या पहारेकऱ्याबरोबर होती. त्याच्याबरोबर मिस कारनबी त्या दुर्दैवी दिवशी बोलली होती. हे त्याने सहजपणे केले. त्याला तो प्रसंग आठवत होता. तो म्हणाला,

“साधारण मध्यमवयीन स्त्री, थोडी जाडसर --- नेहमीसारखी ती फिरत असतांना तिचा कुत्रा हरवला. मी तिला बघून ओळखतो. बहुतेक दुपारी ती कुत्र्याला फिरवायला आणत असे. मी त्या दोघांना फिरतांना पाहिले आहे. कुत्रा हरवला तेव्हा ती वेगळ्याच मनस्थितीत होती. तिने धावत येऊन मला विचारले, की मी कुणाला छोटा चिनी कुत्रा घेऊन जातांना पाहिले का? --- मी तुम्हाला सांगू शकतो, की बागेत अनेक प्रकारची कुत्री फिरत असतात. त्यामुळे मी विशिष्ट एका जातीच्या कुत्र्याला पाहिले, असे सांगू शकत नाही.”

पायरोने विचारपूर्वक डोके हलवले.

तो ३८, ब्लूम्सबेरी चौकात गेला.

नंबर ३८, ३९ व ४० एकत्रितपणे बालाक्लव्हा हॉटेल म्हणून दाखवले जात होते. पायरो पायऱ्या चढून वर गेला व ढकलून दार उघडले. आतून कोबी शिजवल्याचा वास येत होता. त्या वासाने व धुरकट अंधाराने त्याचे स्वागत केले. न्याहारी देणाऱ्या वेटर्सची लगबग चालली होती. त्याच्या डावीकडे महोगनी टेबल होते. त्यावर एक दुःखी दिसणारे एक रोपटे पडले होते. एका स्टँडवर काही पत्रे होती व त्यावर हिरवे वस्तू झाकायचे फडके टाकलेले होते. पायरोने त्याकडे काही वेळ निरखून पाहिले. त्याने

उजवीकडचे दार ढकलून उघडले. तिथून तो एका लहान टेबले व तथाकथित आरामखुर्च्या मांडलेल्या मोकळ्या जागी गेला. तिथे फुलाफुलांचे उदास करणारे हिरवे सुती कापड घातलेले होते. तीन म्हाताऱ्या बायका व एक भीतीदायक दिसणाऱ्या सभ्य गृहस्थाने डोकी वर केली व आत आलेल्या माणसाकडे विषारी फुत्कार टाकल्यासारखे बघितले. पायरो लाजला व तेथून सटकला.

तो पॅसेजमधून पुढे निघाला व एका जिन्याशी आला. त्याच्या उजव्या हाताला जेवायच्या खोलीपासून तो काटकोनात वळत होता.

तिथून थोडे पुढे जाऊन ***कार्यालय*** असे लिहिलेले दार होते.

पायरोने त्या दारावर टकटक केले. पण काही प्रतिसाद न मिळाल्याने त्याने ते उघडून आत बघितले. तिथे कुणी दिसत नव्हते. पण मोठ्या टेबलावर कागद पडले होते. त्याने बाहेर पडत दार परत लावून घेतले व तो जेवायच्या खोलीत शिरला.

एक उदास दिसणारी घाणेरड्या ॲप्रनमधील मुलगी टोपलीतील चाकू व काटे टेबलावर मांडून ठेवत होती.

हर्क्युल पायरो क्षमायाचनेच्या सुरात बोलला,

“मी व्यवस्थापक बाईंना भेटू शकतो का?

त्या मुलीने त्याच्याकडे मलूल नजरेने पाहिले.

ती म्हणाली, “मला माहिती नाही.”

पायरो बोलला, “कार्यालयात कुणीच नाही आहे.”

“ती म्हणाली, “त्या कुठे आहेत ते मला माहिती नाही.”

पायरो शांतपणे व चिवटपणे म्हणाला, “कदाचित तुम्हाला शोधता येईल का?”

त्या मुलीने उसासा टाकला. तिचे दिवसभराचे तेच तेच काम उदासवाणे होते. आता तिच्यावर टाकलेल्या या ओझ्याने ते अजूनच तसे झाले. ती दुःखाने म्हणाली,

“मला काय करता येईल, ते मी बघते.”

पायरोने तिचे आभार मानले आणि पॅसेजमधील लोकांच्या जळजळीत नजरा झेलायला नको म्हणून, तो परत हॉलमध्ये गेला. एका स्टँडवरील काही पत्रांवर हिरवे वस्तू झाकायचे फडके टाकलेले होते. पायरोने त्याकडे काही वेळ निरखून पाहिले, तेव्हा वस्त्रांची सळसळ व डेव्होनशायर व्हायोलेटचा उग्र वास आला. त्यावरून व्यवस्थापिका आल्याचे कळले.

मिसेस हार्टे फारच डौलदार होती. ती उद्गारली,

“मी कार्यालयात नव्हते, त्याबद्दल क्षमस्व. तुम्हाला खोल्या हव्या होत्या?”

पायरो पुटपुटला, “खरे तर नाही. मला माझा एक मित्र अलीकडे इथे रहात होता का, ते हवे होते. कॅप्टन कर्टीस.”

मिसेस हार्टे उद्गारली, “कॅप्टन कर्टीस? मी ते नाव कुठे बर ऐकले होते?”

पायरोने तिला मदत केली नाही. रागावून, तिने डोके हलवले.

तो म्हणाला, “तुम्ही ऐकले नाही, मग, कॅप्टन कर्टीस इथे रहात होता की नाही?”

“अलीकडे तरी नक्कीच नाही. आणि तरीही, तुम्हाला माहिती आहे, मला ते नाव ओळखीचे वाटते आहे. तुम्ही तुमच्या मित्राचे वर्णन करू शकता का?”

पायरो म्हणाला, “ते अवघड आहे. मला वाटते कधीकधी असे होते की कुणीतरी येणार असल्याचे पत्राने कळवते, पण प्रत्यक्षात येत नाही. त्या नावाचे कोणी इथे रहात नाही का?”

“अर्थात असे होऊ शकते.”

“तुम्ही अशा पत्रांचे काय करता?”

“आम्ही तशी पत्रे काही काळ ठेवतो. कदाचित ते लोक काही काळाने येतात. अर्थात इथे बराच काळ पडलेली व कुणीच घेऊन जात नसलेले सामान वा पत्रे आम्ही परत टपालखात्याकडे पाठवून देतो.”

तो म्हणाला, ”माझ्या लक्षात आले. मी माझ्या मित्राला पत्र लिहिले. बघा, हे असे झाले.”

मिसेस हार्टेचा चेहरा स्वच्छ झाला.

“मग हे स्पष्ट झाले. मला पाकीटावरचे नाव आठवत असेल. पण आमच्या येथे सैन्यातून निवृत्त झालेले लोक येतजात असतात --- मला एकदा बघू दे.”

तिने बोर्डाकडे पाहिले.

पायरो म्हणाला, “आता ते तिथे नाही.”

“मला वाटते, ते टपालखात्याकडे परत केले असणार. मला माफ करा. मला आशा आहे, ते फार महत्वाचे नसेल.”

“हो. ते ते फार महत्वाचे नव्हते.”

तो दाराकडे जाऊ लागल्यावर मिसेस हार्टे तिच्या सेंटच्या भपकाऱ्यासह त्याच्या मागे आली व बोलली, “जर तुमचा मित्र येणार असेल तर --- “

“तसे वाटत नाही. मी काही चूक केली असेल --- “

मिसेस हार्टे म्हणाल्या, “आमचे भाडे अगदी योग्य असते. जेवणानंतर कॉफी असतेच. तुम्ही काही खोल्या बघितल्यात, तर --- “

मोठ्या मुश्किलीने पायरो तेथून सटकला.

## चार

मिसेस सॅम्युलसन्सचा हॉल मोठा होता. फर्निचर महागडे होते. छान होते. मध्यवर्ती हवा गरम करायची यंत्रणा हॉगिन बाईसाहेबांकडील यंत्रणेहून जास्त छान होती. आरामशीर टेबलांमधून आणि मोठ्या पुतळयांमधून हल्लक झालेल्या डोक्याने वाट काढत, हर्क्युल पायरो चालला होता.

हॉगिन बाईसाहेबांपेक्षा सॅम्युलसन्स बाईसाहेब उंच होत्या. त्यांचे केस केमिकलने रंगवलेले होते. त्यांच्या छोट्या चिनी कुत्र्याचे नाव, नान्की पो होते. त्याच्या बाहेर आलेल्या वाटोळ्या डोळयांनी तो पायरोकडे चढेलपणे बघत होता. मिसेस सॅम्युलसन्सची सहकारी, मिस केबल बारीक व हडकुळी होती तर मिस कारनबी, थोडी जाडी, बडबडी व दम लागणारी होती. नान्की पो नाहीसा झाल्याबद्दल तिलाही दोष दिला जात होता.

“मिस्टर पायरो, खरे तर ही फार नवलपूर्ण गोष्ट होती. ती एका सेकंदात घडली. हॅरॉडच्या बाहेर हे घडले. तेथील परिचारिकेने मला वेळ विचारली.”

पायरोने तिला मध्येच थांबवले.

“परिचारिका? दवाखान्यातील परिचारिका?”

“नाही. नाही. मुलांची दाई! ते बाळ इतके गोड, गुलाबी गालांचे आणि छोटेसे होते. ते म्हणतात, लंडनमध्ये सुदृढ बाळे दिसत नाहीत. पण माझी खात्री आहे --- “

मिसेस सॅम्युलसन्स म्हणाल्या, “एलेन.”

मिसेस केबल लाजली, थांबली आणि शांत झाली.

मिसेस सॅम्युलसन्स कटूपणे बोलली,

“आणि मिस केबल बाबागाडीवर वाकली होती, त्याच्याशी तिला काही करायचे नव्हते. तेव्हा या साहसी खलनायकाने नान्की पोचा पट्टा तोडला आणि त्याला घेऊन पळाला.

मिस केबल पुटपुटली,

“हे एका सेकंदात झाले. मी भोवताली पाहिले पण नान्की पो नाहीसा झाला होता --- माझ्या हातात फक्त तुटका पट्टा राहिला होता. मिस्टर पायरो, तुम्हाला तो बघायचा आहे का?”

पायरो घाईने म्हणाला, “नको.” त्याला कुत्र्यांचे तुटके पट्टे गोळा करायची इच्छा नव्हती. तो पुढे म्हणाला, “मी समजू शकतो, की त्यानंतर काही दिवसातच तुम्हाला पत्र मिळाले?”

सर्व गोष्ट तशीच घडली --- पत्र --- सॅम्युलसन्स यांच्या कुत्र्याचे कान व शेपूट खुनशीपणे कापून टाकण्याच्या धमक्या! फक्त दोन गोष्टी वेगळ्या होत्या. ३०० पौंडांची मागणी केली होती. आणि जिथे ते पाठवायचे होते, तो पत्ता वेगळा होता. तो असा होताः कमांडर ब्लॅकली, हॅरिंग्टन हॉटेल, ७६, क्लोनमेल गार्डन, केन्सिंग्टन."

मिसेस सॅम्युलसन्स पुढे म्हणाल्या,

"जेव्हा नान्की पो सुरक्षितपणे परत आला, तेव्हा मिस्टर पायरो, मी त्या ठिकाणी स्वतः गेले. शेवटी तीनशे पौंड म्हणजे तीनशे पौंड आहेत."

"नक्कीच."

"पहिली गोष्ट मी कुठली पाहिली असेल, तर पैसे गुंडाळलेले माझे पत्र हॉलमधील खिळ्यावर टांगलेले होते. व्यवस्थापिकेसाठी थांबलेली असतांना, मी ते माझ्या बॅगेत टाकले. दुर्दैवाने --- "

पायरो बोलला, "दुर्दैवाने तुम्ही ते जेव्हा उघडता, तेव्हा तो फक्त कोरा कागद असतो."

मिसेस सॅम्युलसन्स भीतीयुक्त आश्चर्याने म्हणाल्या, "तुम्हाला हे कसे काय माहिती?"

पायरोने त्याचे खांदे शहारवले.

“अर्थात, बाईसाहेब, कुत्रा परत करण्यापूर्वी, चोर पैसे मिळवायचा प्रयत्न करणार. तो नोटा काढून घेऊन कोऱ्या कागदाचे पत्र खिळ्यावर टांगून ठेवणार, म्हणजे ते पत्र तिथून नाहीसे झाले, असे कुणाला वाटायला नको.

पायरो हसून बोलला, “कमांडर ब्लॅकली नावाची कुणी व्यक्ती तिथे रहात नव्हती.”

“त्यामुळे या सर्व गोष्टीवर माझा नवरा फार चिडला. खरे तर तो रागाने लाल झाला --- लालीलाल झाला.”

पायरो काळजीपूर्वक पुटपुटला,

“तुम्ही पैसे असलेले पत्र टपालपेटीत टाकण्यापूर्वी त्याचा सल्ला घेतला नाही का?”

मिसेस सॅम्युलसन्स ठामपणे म्हणाल्या, “नक्कीच नाही.”

पायरोची प्रश्नार्थक नजर पाहून, त्या बाईने स्पष्ट केले,

“क्षणभरसुद्धा मी तो धोका घेतला नसता. कारण पैशांचा प्रश्न असतो, तेव्हा पुरुष इतके असामान्यपणे वागतात, की जेकबने तर नक्की पोलिसांकडे जायचा हट्ट धरला असता. मला तो धोका नको होता. माझा बिचारा नान्की पो, त्याला काहीही होऊ शकले असते. अर्थात मला माझ्या नवऱ्याला नंतर सांगावे लागलेच असते. कारण त्याला मी बँकेतून पैसे काढलेले समजलेच असते.”

पायरो पुटपुटला, “बरोबर आहे. बरोबर आहे.”

मिसेस सॅम्युलसन्स त्यांची हिऱ्याची सुंदर बांगडी मागे पुढे करत व अंगठी बोटावर गोल फिरवत म्हणाल्या, “मी त्याला एवढे रागावलेले कधीच पाहिले नव्हते. पैसा सोडून कसला म्हणून विचार नाही!”

## पाच

हर्क्युल पायरो लिफ्टने वर जोसेफ हॉगीनच्या कार्यालयात गेला. त्याने त्याचे कार्ड आत पाठवले. पण त्याला सांगण्यात आले, की सर जोसेफ आता कामात आहेत व लवकरच ते त्याला भेटतील. सर जोसेफच्या खोलीतून एक सोनेरी केसांची मादक बाई हातात कागदांची चळत घेऊन बाहेर पडली. तिने जाता जाता त्या जुन्या वळणाच्या छोट्या माणसाकडे तुच्छतेचा कटाक्ष टाकला.

त्याच्या महागड्या महोगनी टेबलामागे सर जोसेफ बसला होता. त्याच्या हनुवटीवर लिपस्टिकचा डाग होता.

“मिस्टर पायरो, बसा. माझ्यासाठी काही बातमी आहे का?”

पायरो उत्तरला,

“हे सगळे प्रकरण अगदी साधे आहे. दोन्ही केसेसमध्ये पैसे हॉटेलमध्ये किंवा लॉजमध्ये पाठवले गेले. तिथे कुणी हमाल किंवा

हॉलचा शिपाई नव्हता, आणि तिथे पुष्कळ लोक येत जात होते. त्यात खूपसे सैन्यातून निवृत्त झालेले लोक होते. तिथे कुणालाही सहज प्रवेश होता. कुणीही भिंतीवरील पत्र काढून घेऊ शकत होते व बरोबर घेऊनही जाऊ शकत होते. किंवा त्यातील पैसे काढून घेऊन कोरे पत्र परत होते तिथे ठेऊ शकत होते. त्यामुळे दोन्ही केसेसमध्ये प्रवास अचानक रिकाम्या भिंतीत संपत होता."

"म्हणजे हे करणारा कोण होता, त्याची तुम्हाला काही कल्पना नाही?"

"माझ्या काही कल्पना आहेत, हो. काही दिवसात मी त्यांची चाचपणी करून बघतो."

सर जोसेफने त्याच्याकडे चौकसपणे पाहिले.

छान! मग जेव्हा तुमच्याकडे काही सांगण्यासारखे असेल ---
"

"तेव्हा मी तुमच्या घरी येईन."

सर जोसेफ म्हणाले,

'जर तुम्ही या प्रकरणाच्या तळाशी गेलात, तर हे चांगले काम होईल."

पायरो बोलला, "मला अपयश माहीतच नाही. हर्क्युल पायरो कधी अपयशी झालेला नाही."

सर जोसेफ हॉगीनने त्या छोट्या माणसाकडे बघितले आणि तो तोंडभरून हसला.

तो बोलला, “तुम्हाला स्वतःबद्दल फारच खात्री दिसते.”

“मला तेवढा आत्मविश्वास आहे.”

सर जोसेफ खुर्चीत मागे रेलून बसला. “ओहो, ठीक आहे. तुम्ही जाणत असाल, की अभिमान हा अयशस्वितेपूर्वी असतो.”

## सहा

हर्क्युल पायरो विजेच्या शेगडीसमोर बसला होता [ आणि त्याच्या नीट भूमितीय प्रकाराबद्दल फार समाधानी होता. ] तो त्याच्या नोकराला सर्व प्रकारच्या सूचना देत होता.

“जॉर्ज, तुला समजले का?

“सर, अगदी चांगले समजले.”

“जास्त करून सदनिका किंवा छोटी इमारत. आणि ती नक्की काही मर्यादेत असेल. बागेच्या दक्षिणेला, केसिंग्टनच्या पूर्वेला, नाईट्सब्रिज वसाहतीच्या पश्चिमेला आणि फुलहॅम रस्त्याच्या उत्तरेला.”

“सर, मला नीट समजले.”

पायरो पुटपुटला,

"ही लहानशी उत्सुकता ताणणारी केस दिसते. यात विशिष्ट प्रकारच्या संस्थात्मक बुद्धीचा वापर केलेला दिसतो आहे. आणि अर्थात त्यात उच्च प्रतीच्या अभिनेत्याची नवलपूर्ण अदृष्यता दिसते आहे. मला म्हणायचे झाले तर --- नेमियन सिंहच जणु! हो. लहानशी उत्सुकता ताणणारी केस! माझी इच्छा आहे की मी माझ्या अशीलाकडे अधिकाधिक आकृष्ट व्हावे. पण तो दुर्दैवाने जुन्या साबण कंपनीचा उत्पादक आहे. त्याने सोनेरी केसांच्या सचिव बाईबरोबर लग्न करण्यासाठी स्वतःच्या बायकोला विष दिले आहे. माझे लवकरचे एक यश."

जॉर्जने डोके हलवले. तो थंडपणे बोलला, "सर, या सोनेरी केसांच्या बायका म्हणजे एक त्रासच आहे."

## सात

तीन दिवसांनी अमूल्य जॉर्ज म्हणाला, "सर, हा घ्या पत्ता."

हर्क्युल पायरोने त्याने दिलेला कागद घेतला.

'छान! जॉर्ज, चांगले केलेस. आणि आठवड्यातील कुठला दिवस?"

“सर, गुरुवार.”

“गुरुवार. आणि आज मोठ्या सुदैवाने गुरुवारच आहे. त्यामुळे मग उशीर नको.”

वीस मिनिटांनी पायरो एका फॅशनेबल रस्त्याच्या पलीकडील लहान रस्त्यावरील एका अगम्य सदनिकेचे जिने चढत होता. १०, रोशोलम मॅन्शनचा सर्वात वरचा व तिसरा मजला असा पत्ता होता आणि लिफ्ट नव्हती. पायरो अरुंद जिन्याने गोल गोल चढून वर जात होता.

तिसऱ्या मजल्यावरील दहा नंबरच्या सदनिकेसमोर तो मध्ये श्वास घेण्यासाठी थांबला, तेव्हा एक मोठा आवाज होऊन शांततेचा भंग झाला. एक कुत्रा मोठ्याने भुंकत होता. पायरोने हसून मान हलवली. त्याने त्या सदनिकेची घंटी वाजवली.

भुंकणे दुप्पट झाले --- दारापर्यंत पाऊले वाजली. ते उघडले गेले --- मिस ॲमी कारनबी मागे झाली. तिचा हात तिच्या मोठ्या छातीवर गेला. पायरोने विचारले, ”मी आत येऊ शकतो का?” आणि उत्तरासाठी न थांबता, आत गेला.

उजवीकडे आतील हॉलचे दार उघडे होते. तिथे तो चालत गेला. त्याच्यामागे मिस कारनबी स्वप्नात असल्यासारखी चालत गेली.

हॉल लहान होता. त्यात सामानाची फार गर्दी होती. फर्निचरमध्ये मनुष्यमात्र सापडू शकला असता. वयाने मोठी, सोफ्यावर पहुडलेली बाई, शेकोटीची उब घेत होती. जसा पायरो आत आला, तसा एक छोटा चिनी कुत्रा सोफ्यावरून उडी मारून पुढे आला. तो थोड्या संशयाने भुंकत होता.

पायरो बोलला, “ओहो, मुख्य अभिनेता! माझ्या छोट्या मित्रा, मी तुला सलाम करतो.” तो त्याचा हात पुढे करत पुढे वाकला. कुत्र्याने त्याचा वास घेतला. त्याचे बुद्धिमान डोळे पायरोच्या चेहऱ्यावर स्थिर झाले.

मिस कारनबी हळू बोलली, “तुम्हाला माहिती आहे तर?”

पायरोने मान हलवली.

तो सोफ्यावरील बाईकडे बघत बोलला, “हो. मला माहिती आहे. मला वाटते, तुमची बहीण?”

मिस ॲमी कारनबी यांत्रिकपणे म्हणाली, ”हो. इमिली, हे --- हे मिस्टर पायरो आहेत.”

इमिली कारनबीने आवंढा गिळत, म्हटले, “अस्स!”

ॲमी कारनबी म्हणाली, ”ऑगस्टस --- “

कुत्र्याने तिच्याकडे बघितले --- त्याची शेपूट हलू लागली --- मग त्याने परत पायरोच्या हाताची तपासणी सुरु केली. आता शेपूट हलायचा वेग कमी झाला.

पायरोने हळूच त्याला उचलून घेतले. तो ऑगस्टसबरोबर गुडघ्यांवर बसला व बोलला,

“तर अशा तऱ्हेने मी नेमियन सिंहाला पकडले आहे. माझे काम पूर्ण झाले आहे.”

ॲमी कारनबी कोरड्या आवाजात बोलली, “तुम्हाला खरेच सगळे माहिती आहे का?”

पायरोने मान हलवली.

“मला असे वाटते. तुम्ही --- ऑगस्टसच्या मदतीने ही मोहीम सुरु केली. तुम्ही तुमच्या अशीलांच्या कुत्र्यांना त्यांची नेहमीची फेरी मारायला नेले. त्यांना इथे आणले. ऑगस्टसच्या बरोबर तुम्ही बागेत गेलात. बागेतील पहारेकऱ्याने तुम्हाला नेहमीप्रमाणे छोट्या चिनी कुत्र्याबरोबर पाहिले. मूल सांभाळणाऱ्या लहानशा मुलीनेही सांगितले की तुम्ही तिच्याशी बोललात, तेव्हा तुमच्याकडे छोटा चिनी कुत्रा होता. बोलतांना तुम्ही शिकवलेल्या ऑगस्टसच्या पट्ट्याचा काही भाग कापलात. लगेच तुम्ही तेथून तडक घर

गाठ्लेत. काही मिनिटाने तुम्ही कुत्रा चोरीला गेल्याचे जाहीर केलेत.''

तिथे शांतता पसरली. मग मिस कारानबीने स्वतःला दयार्द्रपणे आब राखत सावरले. ती बोलली, ''हे सर्व खरे आहे. मला --- मला काहीच बोलायचे नाही.''

सोफ्यावरील अपंग स्त्री हळूहळू रडू लागली.

पायरो म्हणाला, ''बाईसाहेब, काही झाले नाही.''

मिस कारनबी म्हणाली, ''काही नाही. मी चोर आहे --- माझे पितळ आता उघडे पडले आहे.''

पायरो पुटपुटला, ''तुम्हाला काही म्हणायचे नाही --- तुमच्या स्वतःच्या बचावाकरता?''

अचानक ॲमी कारनबीच्या गोऱ्या गालांवर लाली पसरली. ती बोलली,

''मी काय केले त्याबद्दल मला खंत नाही. मला वाटते तुम्ही दयाळु माणूस आहात. मिस्टर पायरो, आणि शक्य तर तुम्हाला समजू शकेल. असे बघा, मी फार घाबरले आहे.''

''घाबरले आहे?''

“हो. हे एका सभ्य गृहस्थाला समजणे अवघड आहे. माझी अपेक्षा आहे. पण तुम्हाला माहिती आहे, मी काही हुशार बाई नाही. माझे काही शिक्षण झालेले नाही आणि मी म्हातारी होत चालले आहे. माझ्याकडे साठवलेले काहीही पैसे नाहीत. एमिली आणि मी कशा काय जगू शकू? मी जसजशी म्हातारी व दुर्बळ होत जाईन, तसतशी मी सगळ्यांना नकोशी होईन. सर्वांना तरूण व चटपटीत मंडळी हवी असतात. मला माझ्यासारखे अनेक लोक माहिती आहेत. तुम्ही कोणाला नको असता आणि तुम्ही शेकोटीच्या उबेशिवाय एका खोलीत, खायचे वांधे असतांना तसेच रहाता. शेवटी तुम्हाला तुमच्या खोलीचे भाडेही परवडत नाही --- इथे --- काही अर्थात काही संस्था आहेत. पण तुम्हाला तसेच जबरदस्त मित्र असल्याशिवाय तेथे प्रवेश मिळत नाही. मला तसे कोणी मित्र नाहीत. माझ्यासारखे अनेकजण आहेत. गरीब लोक --- अशिक्षित निरुपयोगी बाई --- भीतीशिवाय जवळ काही नसलेली --- “

तिचा आवाज थरथरला. ती पुढे बोलली,

“आणि म्हणून --- आमच्यापैकी काहीजण --- एकत्र आलो आणि हा असा विचार केला. खरे तर ऑगस्टसला बघून मला हे सुचले. तुम्ही जाणता, बहुतेक लोकांचा छोटा चिनी कुत्रा हा

दुसऱ्यासारखाच असतो. [ जसे चिनी लोक असतात. ] अर्थात खरे तर हे विचित्र आहे. ज्याला माहिती आहे, त्याला ऑगस्टस, शान आणि नान्की पो मधील फरक कळेल. तो काही बाबतीत खूप शहाणा असतो. खूप देखणा असतो. पण मी म्हणते तसे, बऱ्याच लोकांना त्यांचा कुत्रा म्हणजे तोच तो असतो. खूपशा श्रीमंत बायकांकडे असले छोटे चिनी कुत्रे असतात.”

पायरो किंचित हसून बोलला,

“हे फायदेशीर असले पाहिजे --- हा सापळा! तुमच्या टोळीत कितीजण आहेत? किंवा मी असे विचारतो की किती वेळा तुमचा हा सापळा यशस्वी ठरला?”

मिस कारनबी साधेपणे म्हणाली, “शान सोळावा होता.”

पायरोने त्याच्या भुवया चढवल्या.

“मी तुमचे अभिनंदन करतो. तुमची टोळी खरोखर हुशार आहे.”

इमिली कारनबी बोलली,

“ॲमी संस्थात्मक बाबतीत हुशारच आहे. आमचे वडील --- इसेक्समधील केलिंग्टनच्या चर्चचे ते सभासद होते --- नेहमी ते म्हणायचे, की बेत आखण्यात ॲमी चांगलीच निष्णात आहे. समाजातील बाजारांचे व समारंभांचे आयोजन ती उत्तम करते.”

पायरो थोडे वाकून बोलला, “मी कबूल करतो. गुन्हेगार म्हणून बाईसाहेब, आपण थोर आहात.”

ॲमी ओरडली, “गुन्हेगार? अरे प्रिय माणसा, समजा मी आहे. पण मला तसे कधीच वाटले नाही.”

“मग कसे वाटले?”

“अर्थात तुमचे बरोबर आहे. मी कायदा मोडला आहे. पण तुम्ही बघता आहात --- मी हे कसे स्पष्ट करू? आम्हाला कामावर ठेवणाऱ्या बायका फार चढेल आणि वाईट असतात. उदाहरणार्थ हॉगीन बाईसाहेब मला वाट्टेल तसे बोलतात. एक दिवस ती म्हणते तिचे शक्तिवर्धक औषध चवीला वाईट लागते आणि दुसऱ्या दिवशी मी ते तिला दिल्याबद्दल मला शिव्या देते. अशाच सर्व गोष्टी!” मिस कारनबी लाजली व पुढे बोलली, “हे खरेच फार त्रासदायक आहे. आणि त्यावर मला काही उत्तर देता न येणे, हे अजून जास्त त्रासदायक आहे. मला काय म्हणायचे आहे, ते तुम्हाला समजले असेल.”

हर्क्युल पायरो बोलला, “मला समजले.”

मग पैसा उधळला जात असतांना बघणे --- फार उदास करते. आणि सर जोसेफ कधीकधी त्यांनी मिळवलेल्या सरकारी उच्चपदाबद्दल सांगत. मला ते अप्रामाणिकपणाचे वाटे. [ अर्थात

माझ्या बाईच्या डोक्याला अर्थकारण काही समजत नाही. ] मिस्टर पायरो, असे बघा, या सर्व गोष्टींनी मी अस्वस्थ होत असे. माझ्या मनात असा विचार येई, की या लोकांकडून थोडे पैसे लंपास केले पाहिजेत. त्याचे त्यांना काही वाटणार नाही. ते चुटकीसरशी ते अजून पैसे मिळवू शकतात. त्यामुळे मला मी केले, त्यात काही पाप आहे, असे मुळीच वाटत नाही."

पायरो पुटपुटला,

"आधुनिक रॉबिन हूड! मिस कारनबी, मला सांगा, तुम्ही पत्रात लिहिलेल्या धमक्या कधी तुम्हाला अनुभवाव्या लागल्या का?"

"धमक्या?'

"तुम्हाला कधी कुत्र्यांना तुम्ही पत्रात म्हटल्याप्रमाणे कुरूप करावे लागले का?"

मिस कारनबीने त्याच्याकडे आदरपूर्वक पाहिले.

"अर्थात मी असे करायचा कधी स्वप्नातही विचार केला नाही. तो जरासा --- फक्त जरासा कलात्मक चिमटा होता."

"फारच कलात्मक. त्याने काम झाले."

"मला माहिती होते, की त्यामुळे काम होईल. मला ऑगस्टसबद्दल कसे वाटायला हवे होते, हे मला माहिती आहे. मला माहिती होते की या बायका त्यांच्या नवऱ्यांना याबद्दल सगळे

काही नंतर सांगतात. प्रत्येक वेळी बेत छानपैकी पार पडला. दहापैकी नऊ वेळा कामवाल्या बाईकडे पैसे असलेले पत्र देण्यात आले. त्यांनी ते वाफेने उघडले, पैसे काढून घेतले व फक्त कागद ठेवला. एक दोन वेळा ते मालकिणीने टपालपेटीत टाकले. मग अर्थात नोकराणीला हॉटेलात जाऊन पत्र बाहेर काढून, कार्यभाग उरकावा लागला, पण ते सोपे होते.''

“आणि दाईने त्याला हात लावला? नेहमी ती दाईच होती का?''

“असे बघा, मिस्टर पायरो, म्हाताऱ्या दाया त्यांच्या बाळांबद्दल मूर्खासारख्या भावनाशील असतात. त्या बाळामध्ये गुंग असल्याने, त्याना फसवणे सोपे असते.''

पायरोने एक सुस्कारा टाकला. तो म्हणाला,

“तुमचे मानसशास्त्र कमालीचे आहे. तुमची टोळी उत्तम आहे. आणि तुम्ही चांगली अभिनेत्री आहात. मी हॉगीन बाईसाहेबांची मुलाखत घेतली, त्याच्या दुसऱ्या दिवशीचा तुमचा अभिनय वाखाणण्याजोगा होता. मिस कारनबी, तुम्ही स्वतःला अशिक्षित समजू नका. तुमचे चारचौघांसारखे शिक्षण झाले नसेल पण तुमची बुद्धी व धैर्य स्तुत्य आहे.''

मिस कारनबी थोडे हसून बोलली, “पण तरीही मी पकडली गेले.''

“ते टाळणे अशक्य होते. मी मिसेस सॅम्युलसन्स यांची मुलाखत घेतल्यानंतर मला कळले, की शानचे अपहरण हे तशा साखळीतील एक होते. मला आधीच समजले होते, की तुमच्याकडून छोटा चिनी कुत्रा हरवला होता आणि तुम्हाला एक अपंग बहीण आहे. मला फक्त माझ्या अमोल नोकराला विचारायचे राहिले होते, की या भागात आसपास कुणी छोटा चिनी कुत्रा असलेली व आठवड्यातून एकदा अपंग बहीण भेटायला येत असलेल्या बाईची सदनिका आहे का. हे सोपे होते.”

ॲमी कारनबी ताठ बसली. ती म्हणाली,

“तुम्ही दयाळु आहात. मी तुम्हाला एक कृपा करण्याची विनवणी करायचे धैर्य दाखवते. मला माहिती आहे, मी आता यातून निसटू शकत नाही. मला शिक्षा, तुरुंगवास होणारच. मिस्टर पायरो, जर तुम्ही माझी चार लोकांमध्ये नाचक्की होण्यापासून मला वाचवलेत, तर ते इमिलीसाठी व आम्हाला ओळखणाऱ्या काही लोकांसाठी थोडे सुसह्य होईल. मला वाटते, खोट्या नावाने मला तुरुंगात जाणे शक्य नसावे, बरोबर? हे असे विचारणे फार चुकीचे आहे.”

पायरो बोलला,

“मला वाटते, मी यापेक्षा जास्त करू शकतो. पण प्रथम मला एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. हे प्रकरण इथेच थांबले पाहिजे. अजून कुत्रे हरवता कामा नयेत. ते सर्व संपले पाहिजे.”

“हो. नक्की!”

“आणि हॉगीन बाईसाहेबांकडून मिळवलेले पैसे तुम्ही परत करायला हवेत.”

ॲमी कारनबी खोलीत लांबवर गेली. तिने कपाटाचा खण उघडून, नोटांनी भरलेले पाकीट पायरोच्या हवाली केले.

“मी आज हे आमच्या टोळीच्या रकमेत जमा करणार होते.”

पायरोने नोटा मोजल्या. तो उठला.

“मिस कारनबी, मला वाटते, हे शक्य आहे. की मी कोर्टात केस दाखल न करण्याबद्दल सर जोसेफचे मन वळवू शकेन.”

“ओहो, मिस्टर पायरो!”

ॲमी कारनबीने तिच्या हातांची घडी घातली. इमिलीने आनंदाचा चित्कार काढला. ऑगस्टसने भुंकून, त्याची शेपटी हलवली.

त्याला उद्देशून पायरो बोलला, “अरे माझ्या मित्रा, तू मला एक गोष्ट द्यावीस, अशी माझी इच्छा आहे, की तू तुझी आंधळेपणाची

शाल मला द्यावीस. मला त्याची गरज आहे. या सर्व केसमध्ये असे कुणालाच वाटले नाही, की यात कुणी दुसरा कुत्राही आहे. ऑगस्टसकडे सिंहाचे आंधळेपण आहे.''

''अर्थात, मिस्टर पायरो, दंतकथेनुसार, छोटे चिनी कुत्रे एके काळी सिंह होते. आणि अजून त्यांना सिंहाचे काळीज असते!''

''मी समजतो हार्टींगफिल्ड बाईसाहेबांनी तुमच्याकडे ठेवलेला कुत्रा, ऑगस्टस मेल्याची बातमी आली आहे का? रस्त्यावरील गर्दीतून त्याचे तुमच्याकडे एकट्याने येणे तुम्हाला कधी भीतीदायक वाटले नाही का?''

''ओहो, नाही, मिस्टर पायरो. गर्दीच्या बाबतीत ऑगस्टस खूप हुशार आहे. मी त्याला काळजीपूर्वक प्रशिक्षण दिले आहे. त्याला रस्त्यावरील एकेरी वाहतूकही कळते.''

पायरो बोलला, ''मग तो माणसापेक्षाही वरचढ आहे.''

## आठ

सर जोसेफला त्याच्या अभ्यासिकेत पायरो भेटला. तो म्हणाला,

''कसे काय, मिस्टर पायरो? तुमच्या बढाया काय म्हणत आहेत?''

बसत पायरो म्हणाला, “प्रथम मला तुम्हाला एक प्रश्न विचारू दे. गुन्हेगार कोण आहे, हे मला माहिती आहे. या व्यक्तीविरुद्ध माझ्याकडे पुरेसा पुरावा आहे. पण अशा वेळी तुमचे पैसे परत मिळण्याची शाश्वती मला वाटत नाही.”

“माझे पैसे परत मिळणार नाहीत?”

सर जोसेफ रागाने लाल झाला.

पायरो पुढे बोलला,

“पण मी काही पोलीस नाही. मी केवळ तुमच्यासाठी ही केस लढतो आहे. मला वाटते, जर तुम्ही कोर्टात गेला नाहीत, तर तुमचे पैसे परत मिळू शकतील.”

सर जोसेफ उद्गारले, “आं! मला त्याचा विचार करावा लागेल.”

“हे पूर्णपणे तुमच्या हातात आहे. खरे बोलायचे तर, लोकांसाठी तुम्ही कोर्टात जाणे ठीक राहील. बहुतेक लोक असेच म्हणतील.”

सर जोसेफ काटेकोर पणे म्हणाले, “ते असे म्हणतीलही. त्यांचे पैसे काही फुकट जाणार नाही आहेत. मला पैशांच्या बाबतीत कुणी फसवलेले आवडत नाही. आजपर्यंत मला पैशांच्या बाबतीत कुणी फसवलेले नाही.”

“ठीक आहे. मग तुम्ही काय ठरवता?

सर जोसेफने त्यांची मूठ टेबलावर आपटली.

“माझे दोनशे पौंड त्यांनी पळवले, असे कुणी म्हणता कामा नये. मला माझे पैसे परत मिळणारच.”

पायरो उठला. लिहायच्या टेबलाकडे गेला. दोनशे पौंडांचा चेक लिहिला व तो त्या माणसाला दिला.

सर जोसेफ अशक्त आवाजात म्हणाला,

“मी फसवला गेलो होतो? तो कोण भिकार माणूस आहे?”

पायरोने डोके हलवले.

“जर तुम्हाला पैसे मिळाले असतील, तर तुम्ही प्रश्न विचारता कामा नयेत.”

सर जोसेफने चेक दुमडून खिशात ठेवला.

“मिस्टर पायरो, हे दयनीय आहे. पण पैशांचा प्रश्न होता. आता मी तुमचे काय देणे लागतो?

“माझी फी काही जास्त नाही. ही अगदी बिनमहत्वाची गोष्ट आहे.”

तो थांबून पुढे बोलला, “अलीकडील माझ्या सर्व केसेस खुनाच्या असतात --- “

सर जोसेफ चमकून बोलला, “मग त्या उत्कंठावर्धक असणार.”

“कधीकधी. मला माझी सुरवातीची, खूप वर्षांपूर्वीची, एक बेल्जियममधील केस आठवते. त्यातील मुख्य माणूस दिसायला तुमच्यासारखा होता. तो श्रीमंत साबण उत्पादक होता. त्याच्या सचिव स्त्रीबरोबर लग्न करण्यासाठी त्याने बायकोला विष दिले --- हो --- सारखेपणा अगदी उल्लेखनीय आहे --- “

सर जोसेफच्या ओठातून एक बारीक आवाज आला. ते विचित्रपणे निळे पडले. त्याच्या गालांमधून उद्धट झाक निघून गेली. डोक्यामधून बाहेर पडू बघणारे त्याचे डोळे पायरोवर रोखले गेले. तो खुर्चीत थोडा घसरून बसला.

मग थरथरत्या हातांनी त्याने खिसा चाचपला व चेक बाहेर काढून त्याचे तुकडे केले.

“हा मी फाडून टाकला. ही तुमची फी समजा.”

“पण, सर जोसेफ, माझी फी एवढी मोठी नाही.”

“ते ठीक आहे. पण ती मी तुम्हाला दिली आहे.”

“मी ती योग्य ठिकाणी दान करेन.”

“त्याचे तुम्हाला काय करायचे ते करा.”

पायरो पुढे वाकून बोलला,

“मिस्टर जोसेफ, मला हे सांगणे फारसे गरजेचे नाही, की तुमच्या हुद्दयाला साजेशी अशी फार काळजी तुम्ही घेतली पाहिजे.”

जेमतेम ऐकू येईल अशा आवाजात सर जोसेफ बोलला,

“तुम्हाला काळजी करायची काही गरज नाही. मी सर्वतोपरी काळजी घेईन.”

हर्क्युल पायरो तिथून बाहेर पडला. पायऱ्या उतरतांना तो मनाशी म्हणाला, “म्हणजे माझे बरोबर होते.”

## नऊ

हॉगीन बाईसाहेब त्यांच्या नवऱ्याला म्हणाल्या,

“हा विनोदच आहे हे औषध फारच वेगळे लागते आहे. त्याची चव इतकी कडू नव्हती. मला नवल वाटते, ती अशी का लागते आहे?”

सर जोसेफ गुरगुरला, “हे औषध तयार करणारे फार बेपर्वा लोक असतात. वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या प्रकारे औषधे बनवतात.”

हॉगीन बाईसाहेब संशयाने म्हणाली, “मला वाटते, असेच झाले असेल.”

“असेच झाले आहे. दुसरे काय होणार?”

“शानबद्दल त्या माणसाने काही शोधून काढले का?”

“हो. त्याने मला माझे पैसे परत केले.”

“तो कोण होता?”

“त्याने सांगितले नाही. हर्क्युल पायरो हा गुन्हेगाराच्या फार जवळचा माणूस आहे. पण तू काळजी करू नकोस.”

“तो मजेशीर छोटासा माणूस आहे, नाही का?”

सर जोसेफने अंग थोडेसे शहारवले व जणू काही पायरो त्याच्या उजव्या खांद्यामागे उभा असल्यासारखी नजर टाकली. तो तिथे आहे असे नेहमीच त्याला वाटत आले होते. तो म्हणाला, ”तो छोटासा बदमाश माणूस आहे.”

त्याने स्वतःशीच विचार केला,

“ग्रेटा गेली उडत! एखाद्या सोन्यासारख्या सुंदर बाईसाठी मी माझे आयुष्य धोक्यात घालणार नाही.”

## दहा

“ओहो!”

ॲमी कारनबीने अविश्वासाने दोनशे पौंडाच्या चेककडे पाहिले. ती ओरडली, “इमिली! इमिली! ऐक.”

“प्रिय मिस कारनबी, ही केस संपवण्यापूर्वी मला तुमच्या अयोग्य मार्गांने जमवलेल्या पैशांत काही पैशांची भर घालू दे.”

तुमचा

हर्क्युल पायरो.

इमिली कारनबी बोलली, “ तू फारच सुदैवी ठरलीस. आता तू कुठे असतीस, याचा विचार कर.”

ॲमी कारनबी पुटपुटली, “वोर्मवूड स्क्रब्स --- नाहीतर होलोवे? पण आता ते सर्व संपले --- नाही का, ऑगस्टस? आईबरोबर किंवा आईच्या मैत्रिणींबरोबर आता कात्री घेऊन बागेत फिरायला जायचे नाही.”

तिच्या डोळ्यात पश्चात्तापाची भावना रेंगाळली. तिने एक उसासा टाकला.

“प्रिय ऑगस्टस! हे दयापूर्ण दिसते आहे. तो इतका हुशार आहे --- एखादा त्याला काही शिकवू शकतो --- “

# THE LERNEAN HYDRA

# लर्नियन हायड्रा



हर्क्युल पायरोने समोर बसलेल्या माणसाकडे धीर देत पाहिले. डॉ चार्ल्स ओल्डफील्ड कदाचित चाळीशीचा असावा. त्याचे केस कानशीलांकडे थोडेसे करडे असून छान होते. निळ्या डोळ्यात दुःखाची छटा होती. तो डोके झुकवून बसला होता. त्याचे हावभाव थोडेसे अस्थिर होते. त्याला मुद्द्यावर यायला अवघड जात होते.

तो जरासे अडखळत बोलला,

“मिस्टर पायरो, मी एक विचित्र अशी विनंती करायला तुमच्याकडे आलो आहे. आणि आता इथे आलो आहे, तर सगळे काही सांगतो. कारण मला स्पष्टपणे दिसते आहे, की कोणीही त्याबाबतीत काही करू शकणार नाही.”

पायरो पुटपुटला, “तू माझे मत माझ्यावर सोडलेले बरे!”

ओल्डफील्ड अगदी हळू आवाजात म्हणाला, “मला माहिती नाही, मी असा विचार का केला --- “

तो उन्मळून पडला.

पायरोने त्याचे वाक्य पुरे केले, “कदाचित मी तुला मदत करू शकेन का? अरे मित्रा, कदाचित करू शकेन. मला तुझी समस्या सांग.”

ओल्डफील्ड सरळ झाला. पायरोला दिसले, की तो मनुष्य, किती दमलेला व चिंताग्रस्त आहे!

ओल्डफील्ड निराशेच्या सुरात म्हणाला, “असे बघा, पोलिसांकडे जाण्याने काही साध्य होणार नाही --- ते काही करू शकणार नाहीत --- आणि तरीही ते रोज अजून अजून वाईट होत चालले आहे. मला --- मला कळत नाही, की मी काय करू --- “

“काय वाईट होत चालले आहे?”

“मिस्टर पायरो, हे अगदी सोपे आहे, अफवा --- सुमारे एक वर्षांपूर्वी, माझी बायको वारली. त्यापूर्वी काही वर्षे ती अपंग झाली होती. ते म्हणतात, सर्वजण म्हणतात, की मी तिला मारले --- मी तिला विष दिले!”

पायरो बोलला, “ओहो, आणि तू तिला विष दिले होतेस का?”

डॉ चार्ल्स ओल्डफील्ड उडी मारून उभा राहिला.

पायरो म्हणाला, “शांत व्हा आणि बसा. मग आपण असे धरून चालू की तू तुझ्या बायकोला विष दिले नाहीस. मला वाटते तुझी प्रॅक्टीस गावाकडे चालते --- “

“हो. लोघबरो बाजारातील --- बर्कशायरमध्ये. ती अशा प्रकारची जागा आहे, जिथे लोक अफवा पसरवतात. पण हे इतक्या प्रमाणात होईल, याची मला काही कल्पना नव्हती.” त्याने त्याची खुर्ची थोडी पुढे ओढली. “मिस्टर पायरो, तुम्हाला कल्पना नाही, की मी कशामधून गेलो आहे. पहिल्यांदा मला काय चालले आहे, याची कल्पना नव्हती. मला लोक माझ्याशी फटकून वागत असल्याचे, लक्षात येऊ लागले. मला लोक टाळू लागले --- त्याकडे मी लक्ष दिले नाही --- मला वाटले मी बायकोला नुकतेच गमावल्यामुळे, मला असे वाटते आहे. मग ते अजून ठळक झाले.

माझ्याशी बोलायला लागू नये, म्हणून लोक रस्ता ओलांडून जाऊ लागले. माझी प्रॅक्टीस कमी होऊ लागली. मी जाईन तेथे मला कुजबुज ऐकू येऊ लागली. संशयी डोळे दिसू लागले. त्रासदायक जिभा त्यांचे विष ओकू लागल्या. मला एक दोन वाईट, बेकार पत्रे आली.”

तो थांबला व परत चालू केले,

“मी काय करू, ते मला समजेना. या संशयी, वाईट प्रकाराशी कसे भांडावे, ते मला कळेना. जे माझ्या तोंडावर कधीच बोलले जात नाही, ते खरे नसल्याचे, मी कसे सिद्ध करू? मी हतबल झालो. कोंडीत सापडलो. हळूहळू, क्रूरपणे मला संपवण्यात येऊ लागले.”

पायरोने विचारपूर्वक त्याचे डोके हलवले. तो म्हणाला,

“हो, अफवा या खरोखर नऊ डोक्यांच्या लर्ना येथील हायड्रासारख्या असतात. त्या नाहीशा करणे अवघड असते कारण एक डोके छाटले की त्या जागी दोन उगवतात.”

डॉ चार्ल्स ओल्डफील्ड म्हणाला, “ते असेच आहे. मी काही करू शकत नाही --- काही नाही. शेवटचा उपाय म्हणून मी तुमच्याकडे आलो आहे --- पण तुम्ही देखील काही करू शकाल, असे मला वाटत नाही.”

एक दोन मिनिटे पायरो स्तब्ध राहिला. मग तो बोलला,

“मला खात्री नाही. पण तुमच्या समस्येत मला रुची वाटते आहे. डॉ ओल्डफील्ड, या अनेक डोक्यांच्या राक्षसाला मारायचा मी प्रयत्न करेन. पण तत्पूर्वी मला अशी कुजबुज सुरु होण्याआधीची परिस्थिती विशद करा. तुम्ही म्हणता, तुमची बायको सुमारे वर्षापूर्वी वारली. मृत्यूचे कारण काय होते?”

“पोटाचा अल्सर.”

“पोस्टमार्टेम, शवपरीक्षण, झाले होते का?”

“नाही. तिला पोटाचे दुखणे खूप काळ होते.”

पायरोने मान हलवली.

पोटाची आग होणे आणि आर्सेनिक देऊन झालेली विषबाधा यांची लक्षणे साधारण सारखी असतात --- अलीकडे हे सर्वांना माहिती असते. गेल्या दहा वर्षात, निदान चार खुनाच्या केसेसमध्ये बळीला पोटाचा विकार असल्याच्या शिफारसपत्रावर संशय न घेता पुरले गेले. तुमची बायको तुमच्यापेक्षा लहान होती की मोठी?”

“ती पाच वर्षांने मोठी होती.”

“तुमचे लग्न होऊन किती वर्षे झाली?

‘पंधरा वर्षे.”

“तिची काही संपत्ती होती का?”

"हो. ती चांगली पैसेवाली होती. तिने अंदाजे तीस हजार पौंड ठेवले होते."

चांगली मोठी रक्कम होती. ती तुम्हाला मिळाली का?"

"हो."

"तुमचे दोघांचे संबंध चांगले होते का?'

"खात्रीने."

"कधी भांडणे? काही कुरबुरी?"

चार्ल्स ओल्डफील्ड आढेवेढे घेत म्हणाला, "माझी बायको म्हणजे कठीण बाई होती. ती अपंग होती. तिला स्वतःच्या तब्येतीची फार काळजी वाटत असे. ती फार चिडचिड करत असे. तिला खूष ठेवणे अवघड होते. असे काही दिवस येत, की तिच्या मते, मी काहीच बरोबर करू शकत नसे."

पायरो मान डोलावून म्हणाला,

"ओहो, खरे आहे. मला त्या प्रकारची माणसे माहिती आहेत. तिच्याकडे दुर्लक्ष केले जाते, दखल घेतली जात नाही, यामुळे अशी माणसे तक्रार करत रहातात --- ती मेल्याशिवाय तिचा नवरा आनंदी होणार नाही, असा समज तिने करून घेतला असावा."

पायरोचे बोलणे किती खरे आहे, हे ओल्डफील्डचा चेहरा सांगत होता. तो हसून बोलला, “तुम्ही हे अगदी बरोबर सांगितलेत.”

पायरो बोलत राहिला, “तिच्याकडे बघायला दवाखान्यातील कुणी परिचारिका होती का? किंवा सहकारी? किंवा मनापासून तिला जीव लावणारी दाई?”

“एक सहकारी असणारी परिचारिका होती. ती खूप भावनाशील व क्षमता असलेली होती. मला वाटत नाही, की ती तिला काही बोलत असेल.”

“भावनाशील व क्षमता असलेल्या बायकाही देवदयेने तोंडाचा पट्टा चालवणाऱ्या असू शकतात --- आणि त्या नेहमीच शहाणपणे बोलतील, असे नाही. मला यात काही संशय नाही, की या नोकराणी सर्व नोकरांसारख्या व इतर माणसांसारख्याच बोलत असणार. गावातील तुमचे लोक मोठ्या आनंदाने सहभाग घेत असलेले प्रकरण सुरु व्हायला, या बायकांचे बोलणेच कारणीभूत असणार. आता मी तुम्हाला अजून एक गोष्ट विचारतो. ती बाई कोण आहे?”

डॉ ओल्डफील्ड रागाने म्हणाले, “मला काही कळत नाही.”

पायरो शांतपणे बोलला, “तुम्हाला सगळे कळते आहे. अशी कोण बाई आहे, जिच्याबरोबर तुमचे नाव जोडले जाते?”

डॉ ओल्डफील्ड उठून उभा राहिला. त्यांचा चेहरा कोरडा आणि कडक झाला होता. तो म्हणाला, “या केसमध्ये एक बाई आहे. मी त्यासाठी तुमचा एवढा वेळ घेतल्याबद्दल, मिस्टर पायरो, मला माफ करा.”

तो दाराकडे गेला.

हर्क्युल पायरो बोलला, “मला याचा खेद होतो. मला तुमच्या केसमध्ये स्वारस्य वाटू लागले आहे. मला तुम्हाला मदत करायला आवडेल. पण मला सगळे खरेखुरे सांगितल्याशिवाय मी काही करू शकणार नाही.”

“नाही --- “

डॉ ओल्डफील्ड थांबला व वळला.

“तुम्ही असा आग्रह का धरता, की या केसमध्ये एक बाई असणार?”

“अरे मित्रा, मला बायकांचा स्वभाव माहिती नसेल, असे तुला का वाटते?”

गावातील कुजबुज ही नेहमी स्त्री पुरुष संबंधावर आधारलेली असते. एखाद्या माणसाने उत्तर ध्रुवावर जाण्यासाठी किंवा

विधुरावस्थेची मजा घेण्यासाठी बायकोला विष दिले असेल, तर त्यात गावातील लोकांना काही मजा वाटत नाही. पण दुसऱ्या बाईबरोबर लग्न करण्यासाठी त्याने स्वतःच्या बायकोला विष दिल्याचे जर त्यांना समजले, तर मग कुजबुज सुरु होते व वाढत जाते. ही प्राथमिक मानसिकता आहे.

ओल्डफील्ड रागाने म्हणाला, “अफवा उठवणाऱ्या लोकांचे जथे काय विचार करतात, यासाठी काही मी जबाबदार नाही!”

“अर्थात तुम्ही नाही.”

पायरो बोलत राहिला, “तेव्हा तुम्ही परत इथे येऊन बसावे व मी तुम्हाला आता विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.”

सावकाशीने, मनाविरुद्ध ओल्डफील्ड त्याच्या जागेवर येऊन बसला.

चढलेल्या भुवयांनी तो म्हणाला, “मला वाटते, ते मिस मॉनक्रीफ, जीन मॉनक्रीफ या माझ्या औषधे तयार करून देणाऱ्या मुलीविषयी बोलत असतील. ती फार चांगली मुलगी आहे.”

“ती तुमच्याकडे किती दिवसांपासून काम करते आहे?”

“तीन वर्षे.”

“तुमच्या बायकोला ती आवडायची का?”

“अं --- तसे पाहिले, तर नाही. म्हणजे नाही, असेच काही नाही.”

ती तिचा हेवा करायची का?”

‘हे विचारणे चुकीचे आहे.”

पायरो हसला. तो बोलला,

“बायकांचा जळफळाट हा एका म्हणीसारखा असतो. पण मी तुम्हाला एक सांगतो. माझा हेवादाव्याबद्दलचा अनुभव असा आहे, कितीही ताणून तो मोठा केला, तरी त्यात थोडेफार तथ्य असतेच. असे एक वचन नाही का, की गिऱ्हाईक नेहमी बरोबर असते? तर तेच इथे नवरा बायकोमध्ये लागू आहे. कितीही लहानसा खरा पायाभूत आधार असो, ते नेहमी बरोबर असतात.”

डॉ ओल्डफील्ड जोराने म्हणाला, “हा वाह्यातपणा आहे. माझ्या बायकोला माहित नाही, असे काही मी कधीच जीन मॉनक्रीफला बोलतांना ऐकले नाही.”

पायरो पुढे वाकून बोलला. त्याचा आवाज जोरदार व घाई असलेला होता, “कदाचित, ते खरे असेल. पण त्याने मी जे म्हणालो, ते बदलत नाही. डॉ ओल्डफील्ड, मी माझ्याकडून या केससाठी सर्वतोपरी प्रयत्न करेन. पण मला तुमच्याकडून पारंपारिकता किंवा तुमच्या भावनाच्या पलीकडील, मोकळेपणे सांगितलेले, निखालस सत्य माहिती हवे. तुमची बायको

मरण्यापूर्वी काही काळ तुम्ही तिची काळजी करणे सोडून दिले होते, हे खरे आहे ना?"

ओल्डफील्ड एक दोन मिनिटे स्तब्ध होता. मग तो बोलला,

"हा व्यवसाय मला मारतो आहे. पण मला आशा ठेवली पाहिजे. मला का कुणास ठाऊक, पण असे वाटते आहे, की तुम्ही मला मदत कराल. मिस्टर पायरो, मी तुमच्याशी प्रामाणिक राहीन. मी तिची मनापासून काळजी करत नव्हतो. मला वाटते, मी तिचा चांगला नवरा होतो. पण मी खरे तर कधीच तिच्या प्रेमात नव्हतो."

"आणि ही जीन नावाची मुलगी?"

डॉक्टरला चांगलाच घाम फुटला. तो म्हणाला, "मी तिला पूर्वीच माझ्याबरोबर लग्न करायला सांगायला हवे होते. म्हणजे हे सर्व प्रकरण उद्भवलेच नसते."

पायरो त्याच्या खुर्चीत मागे सरकून बोलला, "म्हणजे शेवटी आपण खऱ्या परिस्थितीकडे आलो. अरे मित्रा, डॉक्टर ओल्डफील्ड, मी तुझी केस घेतो. पण हे लक्षात ठेव --- मी सतत सत्याच्या शोधात असतो."

ओल्डफील्ड कटूपणे बोलला, "मला निखळ सत्य कधी बोचकारणार नाही."

तो कां कू करत बोलला,

“मी सर्व विचार करूनच माझ्या कीर्तीला बट्टा लागणार नाही, याची काळजी घेतलेली आहे. जर मी कोणावर ठामपणे काही आरोप करू शकत असेन, तर मी ते करेनच. शेवटी कधीकधी मला असे वाटते --- इतर वेळी मी असा विचार करतो, की यामुळे गोष्टी अजूनच बिघडतील --- या गोष्टीला अजून प्रसिद्धी मिळेल आणि लोक म्हणू लागतील, ‘हे सिद्ध करता येणार नाही. पण कधीही आगीशिवाय धूर निघत नाही.’ “

त्याने पायरोकडे बघितले.

‘मला प्रामाणिकपणे सांगा, या दुःस्वप्नातून बाहेत पडायचा काही मार्ग आहे का?” पायरो म्हणाला, “असा रस्ता नेहमीच असतो.

## दोन

त्याच्या नोकराला पायरो म्हणाला, “जॉर्ज, आपण गावाला जातो आहोत.”

शांतपणे जॉर्ज म्हणाला, “खरेच का, सर?”

“आणि आपल्या प्रवासाचे उद्दिष्ट आहे, नऊ डोक्यांच्या राक्षसाला ठार मारणे.”

“सर, खरेच का? तो ग्रीक पुराणातील फसवा राक्षस?

“जॉर्ज, मला खराखुरा रक्त मास असलेला प्राणी म्हणायचे नाही.”

“सर, मला तुमचे बोलणे समजले नाही.”

“जर तो तसा असता, तर सोपे होते. पण हा अफवेचा उगम असलेला, स्पर्शाने पराभव करता येणार नाही असा असला, तरी नष्ट करता येणारच नाही असे नाही.”

“सर, ते खरेच आहे. कधीकधी एखादी गोष्ट कशी सुरु होते, ही जाणणे अवघड असते.”

“तेच तर.”

हर्क्युल पायरो डॉ ओल्डफील्डच्या घरी गेला नाही. त्याऐवजी तो स्थानिक खानावळीत गेला. तो आल्यापासूनच्या पहिल्या सकाळी त्याची मुलाखत जीन मॉनक्रीफशी झाली.

ती एक उंच मुलगी होती. तिचे केस सोनेरी होते. डोळे निळे असून स्थिर होते. कोणीतरी तिच्यावर पाळत ठेवल्यासारखे तिचे दिसणे सावधानतेचे होते.

ती बोलली, “म्हणजे डॉ ओल्डफील्ड तुमच्याकडे गेले तर -- - मला माहिती होते, की ते त्यासंबंधी विचार करत आहेत.”

तिच्या आवाजात जोर नव्हता.

पायरो म्हणाला, "आणि तुम्हाला ते पसंत नव्हते का?"

दोघांची नजरानजर झाली. ती थंडपणे बोलली, "तुम्ही काय करणार?"

पायरो शांतपणे म्हणाला, "अशी परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य असू शकते."

तिने रागाने शब्द फेकत म्हटले, "काय कौशल्य? तुम्ही कुजबुजणाऱ्या म्हाताऱ्याकोताऱ्यांकडे जाऊन त्यांना सांगणार आहात का, की तुम्ही असली कुजबुज थांबवली पाहिजे. हे बिचाऱ्या डॉ ओल्डफील्डसाठी वाईट आहे. त्या तुम्हाला उत्तर देतील, "अर्थात आम्ही अशा गोष्टींवर विश्वास ठेवत नाही." हाच सर्वात वाईट भाग आहे --- त्या असे म्हणणार नाहीत, "अरे माझ्या राजा, तुला हे कधी लक्षात आले नाही का, की मिसेस ओल्डफील्डचा मृत्यू जसा दिसतो, तसा नव्हता." नाही त्या असे म्हणतील, "अरे बाबा, आम्ही डॉ ओल्डफील्ड व त्याच्या बायकोसंबंधीच्या गोष्टीवर विश्वास ठेवत नाही. आमचा विश्वास आहे, तो असे काही करणार नाही. तरीही हे खरे आहे, की तो कदाचित तिच्याकडे नक्कीच दुर्लक्ष करत असे. आणि मला नाही वाटत, की त्याने अशा तरूण मुलीला दावाखान्यात औषधे तयार

करण्यासाठी ठेवावे, हे काही शहाणपणाचे नाही --- अर्थात मी काही असे म्हणत नाही, की त्यांच्यात काही नको ते संबंध होते. ओहो, नाही, माझी खात्री आहे की सर्व काही सुरळीत होते" त्या थांबतात. तिचा चेहरा चमकतो व श्वास भरभर होतो.

पायरो म्हणाला, "काय बोलले जाते, हे तुम्हाला नीट माहिती दिसते."

तिचे तोंड घट्ट बंद झाले. ती कटूपणे बोलली, "मला सर्व काही माहिती आहे."

"आणि यावर तुमचा उपाय काय आहे?"

जीन मॉनक्रीफ बोलली, "त्याच्याकरता हे सर्वात चांगले राहील, की येथील प्रॅक्टीस विकून दुसरीकडे कुठेतरी ती चालू करायची."

"तिथेही कशावरून ही गोष्ट त्याचा पाठलाग करणार नाही?"

तिने तिचे खांदे शहारवले.

"त्याने तेवढा धोका पत्करायला हवा."

पायरो एक दोन मिनिटे शांत राहिला व मग बोलला, "मिस मॉनक्रीफ, तुम्ही डॉ ओल्डफील्डबरोबर लग्न करणार आहात का?"

तिला त्या प्रश्नाचे आश्चर्य वाटले नाही. तिने थोडक्यात उत्तर दिले, "त्याने मला लग्नाबद्दल विचारले नाही."

"का नाही विचारले?'

तिचे निळे डोळे त्याच्या डोळ्यांना भेटले व क्षणभर फडफडले. मग ती बोलली, "कारण मी त्याला अडथळा केला."

"मोकळेपणे सांगितल्याबद्दल, तुमचे आभार मानावे तेवढे थोडे ठरतील."

"मी तुम्हाला पाहिजे तितक्या मोकळेपणे बोलू शकते. जेव्हा लोक असे बोलतात, की माझ्याबरोबर लग्न करण्यासाठी चार्ल्सने बायकोपासून सुटका करून घेतली. तेव्हा मला असे वाटते, की आम्ही लग्न केलेच, तर ही तोंडे बंद होतील. आणि जर आमच्या लग्नाचे काही नसेल, तर मूर्ख प्रकरण आपोआप निवळेल, अशी मला आशा आहे.

"पण तसे झाले नाही."

"नाही झाले."

पायरो म्हणाला, "नक्कीच, हे जरा विचित्र आहे."

जीन कटूपणे बोलली, "त्यांचे मनोरंजन होण्यासाठी त्यात फारसे काही नाही."

पायरोने विचारले, “तुम्हाला चार्ल्स ओल्डफील्डबरोबर लग्न करायचे आहे का?”

त्या मुलीने थंडपणे उत्तर दिले, “हो, करायचे आहे. त्याला भेटल्यापासून मला तसे वाटते आहे.”

“मग त्याच्या बायकोचे मरण हे तुमच्यासाठी चांगलेच फायदेशीर ठरले असेल, नाही का?”

जीन मॉनक्रीफ बोलली, “मिसेस ओल्डफील्ड विचित्रपणे अजिबात आल्हादक बाई नव्हती. खरे सांगायचे तर तिच्या मरणाने मी आनंदित झाले.”

पायरो म्हणाला, “तुम्ही खरेच मोकळेपणे बोलता.”

तिने तसेच फसवे हास्य केले.

पायरो बोलला, “मला एक सुचवायचे आहे.”

“काय?”

“इथे परिणामकारक मार्ग निवडायला हवेत. मी असे सुचवेन, की कोणीतरी --- शक्यतो तुम्ही गावाच्या कार्यालयाला कळवा.”

“तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“मला असे म्हणायचे आहे, की या गोष्टीची उकल करण्यासाठी, पुन्हा प्रेताचे शवविच्छेदन करा व माहिती मिळवा.”

ती त्याच्यापासून एक पाऊल मागे गेली. तिचे तोंड उघडे पडले होते पण मग बंद झाले. पायरो तिचे निरीक्षण करत होता.

शेवटी तो म्हणाला, “कसे काय बाईसाहेब?”

जीन मॉनक्रीफ शांतपणे बोलली, “मला हे पसंत नाही.”

“पण का नाही? मृत्यूचे नैसर्गिक कारण समजले, की सर्व तोंडे गप्प होतील, नाही का?”

“जर तसा पुरावा मिळाला, तर!”

“बाईसाहेब, तुम्ही काय सुचवत आहात, हे तुम्हाला समजते आहे का?”

जीन मॉनक्रीफ अधीरपणे बोलली,

“मी काय बोलते आहे, हे मला चांगले समजते आहे. तुम्हाला अर्सेनिक विषबाधा झाली, असे वाटते आहे. पण इतर विषेही आहेत --- उदाहरणार्थ वनस्पतीपासून मिळवलेले अल्कलॉइड! जरी ती दिली गेली असली, तरी आता वर्षभराने त्याचे अवशेष मिळणे अवघड आहे. आणि हे करणारे लोक कसे आहेत, ते मी ओळखून आहे. ते असेही म्हणू शकतील, की मृत्यूचे कारण कळू शकत नाही --- मग जिभा जास्तच वळवळू लागतील.”

एक दोन मिनिटे पायरो शांत राहिला व नंतर बोलला, “तुमच्या मते गावातील बोलण्यात सर्वात जास्त हटवादी कोण आहे?”

त्या स्त्रीने विचार केला. मग ती म्हणाली, “मला वाटते, म्हातारी लीथेरन त्या कंपूतील सर्वात लबाड स्त्री आहे.”

”ओहो! शक्य असेल तर, तुम्ही मला तिची ओळख सहज पद्धतीने करून द्याल का?”

‘ते तेवढे सोपे नाही. या सर्व म्हाताऱ्या सकाळच्या वेळी खरेदी करत असतात. मुख्य रस्त्याने चाललो, की आपले काम होईल.”

जीनने म्ह्टले, तसेच झाले. टपाल कार्यालयाबाहेर जीन थांबली व एका उंच, बारीक मध्यमवयीन बाईशी बोलू लागली. तिचे नाक लांब होते व डोळे तीक्ष्णपणे चौकस होते.

“मिस लीथेरन, शुभ प्रभात.”

“शुभ प्रभात, मिस जीन. आज छान दिवस आहे, नाही का?”

जीनचे तीक्ष्ण डोळे चौकसपणे तिच्या मैत्रिणीवर फिरले. ती बोलली, “मला इथे काही दिवस रहायला आलेल्या मिस्टर पायरो यांची तुमच्याशी ओळख करून देऊ दे.”

## तीन

केकचा तुकडा मोडत व चहाचा कप गुडघ्यावर तोलत, पायरोने त्या बाईशी ओळख करून घेतली. मिस लीथेरनने दयाळूपणे त्याला चहाबद्दल विचारले. आणि मग हा छोटासा

परदेशी पाहुणा इथे काय करतो आहे, या दृष्टीने त्याच्याकडे बघू लागली.

त्याने तिची उत्सुकता वाढवत, हातांनी प्रत्युत्तर दिले. तो पुढे वाकला.

तो म्हणाला, "ओहो मिस लीथेरन, माझ्या दृष्टीने तुम्ही फारच हुशार आहात. तुम्हाला माझे गुपित कळले असेल." त्याने हळू आवाजात म्हटले, "मी गावाच्या मुख्य माणसाकडून येथे आलो आहे, हे तुमच्या माझ्यातच ठेवा."

मिस लीथेरन गोंधळली --- अजूनच उत्सुक झाली ---

"गावाच्या मुख्य माणसाकडून? बिचाऱ्या मिसेस ओल्डफील्डबद्दल तर बोलायचे नाही ना?"

पायरोने बऱ्याच वेळा त्याची मान हलवली.

"अं --- त्याचे काय आहे --- " एवढे बोलून मिस लीथेरन तिच्या आनंदी भावनांचा एकंदर आवाका घेण्यासाठी थांबली.

पायरो म्हणाला, "तुम्हाला माहिती आहे, हे नाजूक प्रकरण आहे. प्रेत उकरून तपासणी करण्याची जरुरी आहे का, याचा अहवाल देण्यासाठी मला सांगण्यात आले आहे."

मिस लीथेरन उद्गारली, "तुम्ही त्या बिचारीला उकरून परत वर काढणार आहात का? किती भयानक!"

जर ती ‘किती भयानक’ ऐवजी, ‘किती छान’ असे म्हणाली असती, तर ते तिच्या आवाजाच्या स्वराला शोभले असते.

“मिस लीथेरन, तुमचे काय मत आहे?”

“मिस्टर पायरो, अर्थात याबद्दल खूप बोलबाला आहे. पण मी त्याकडे दुर्लक्ष करते. त्यावर इतकी व्यर्थ चर्चा चालू आहे. हे झाल्यापासून, डॉ ओल्डफील्ड फार विचित्र वागू लागला आहे. पण मी आधी खूप वेळा म्हणाले त्याप्रमाणे, त्याला गुन्हेगार ठरवण्यात काही अर्थ नाही. हे केवळ दुःख असू शकेल. मात्र तो व त्याची बायको, यांचे काही फार प्रेम होते, अशातला भाग नाही. ते मला अगदी खात्रीपूर्वक रीत्या माहिती आहे. मिसेस ओल्डफील्डबरोबर तीन चार वर्षे असलेली व तिच्या मरणापर्यंत टिकलेली दाई हॅरीसन हिने हे कबूल केलेले आहे. तिने मला काही सांगितले, असे नाही. पण तिच्या वागण्यावरून आपल्याला निष्कर्ष काढता येतोच की, नाही का?”

पायरो दुःखाने बोलला, “एखाद्याला त्याबद्दल शंकेला जागा रहाणे शक्यच नाही.”

“हो ना. अर्थात मला माहिती आहे, मिस्टर पायरो, जर तुम्ही प्रेत उकरून काढलेत, तर तुम्हालाही कळेल.”

पायरो म्हणाला, “बरोबर, तेव्हा आपल्याला समजेल.”

मिस लीथेरन आनंदाने उत्तेजित होऊन नाक उडवत बोलली, "अर्थात यापूर्वीही अशा केसेस झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, आर्मस्ट्रॉंग आणि तो दुसरा माणूस --- मला त्याचे नाव आठवत नाही --- आणि क्रीपेन, अर्थात मला नेहमी इथेलचे नवल वाटते की तो त्याच्याबरोबर होता की नाही. जीन मॉनक्रीफ ही एक चांगली मुलगी आहे, माझी खात्री आहे --- मी असे म्हणणार नाही की तिने त्याला नादी लावले --- पण पुरुष बायकांच्या बाबतीत जरा वेडेच असतात. आणि अर्थात त्यांची जोडी जमवली गेली!"

पायरो काही बोलला नाही. चौकशीच्या पुढील संभाषणचा ओघ चालू ठेवण्यासाठी, त्याने तिच्याकडे निरागसपणे पाहिले. तिच्या बोलण्यात अर्थात हा शब्द किती वेळा आला, हे आठवून, आतून त्याचे मनोरंजन होत होते.

"आणि अर्थात प्रेताचे विच्छेदन करून इतके काही बाहेर येईल, नाही का? नोकर चाकर --- त्यांना नेहमी खूप माहिती असते, नाही का? आणि त्यांना वावड्या उठवण्यापासून परावृत्त करणे, हे अर्थात अशक्य आहे, नाही का? ओल्डफील्डकडील त्या दाईला नंतर लगेच काढले गेले --- मला नेहमी वाटते ते जरा चमत्कारिकच झाले --- विशेषतः अलीकडील दिवसांमध्ये, चांगली नोकर मंडळी

मिळतात कुठे? असे दिसते की जणू डॉ ओल्डफील्डला भीती वाटली, की हिला काही समजले तर!”

पायरो गंभीरपणे बोलला, “चौकशी होण्याची खरेच जरुरी असावी, असे दिसते आहे.”

मिस लीथेरनने विरोध असल्यासारखा शहारा दिला.

ती म्हणाली, “त्या कल्पनेनेही एखादा शहारेल. आमचे लहानसे शांत गाव --- एकदम वर्तमानपत्रातील बातम्यांनी प्रसिद्ध झाले.”

“त्यामुळे तुम्ही घाबरून गेलात का?”

“मी जुन्या वळणाची असल्याने थोडीशी घाबरले.”

“आणि तुम्ही म्हणता तशा त्या फक्त गावगप्पा होत्या!”

“पण मला मुद्दाम होऊन ते सांगायचे नव्हते. असे बघा, मला मात्र ते खरे असावे, असे वाटते --- त्या म्हणीप्रमाणे, आगीशिवाय धूर नाही.”

पायरो म्हणाला, “मला स्वतःलाही असेच वाटत होते.”

तो उठला.

“बाईसाहेब, मी तुमचे बोलणे विश्वासार्ह धरतो.”

‘ओहो, अर्थात! मी यातील एक अक्षरदेखील कुणाला सांगणार नाही.”

पायरोने हसून रजा घेतली.

दरवाज्याशी त्याने त्याच्या हातात कोट व टोपी देणाऱ्या नोकराणीला सांगितले, “मी इथे मिसेस ओल्डफील्डच्या मृत्यूची चौकशी करायला आलो होतो. पण तुम्ही ही गोष्ट तुमच्याजवळच ठेवलीत, तर मी तुमचा आभारी होईन.

मिस लीथेरनच्या हातातोल छोटेसे झाड छत्री ठेवायचा स्टँडमध्ये जवळजवळ पडले. तिने जोरजोरात श्वासोच्छवास घेतला.

“ओहो सर, मग डॉक्टरांनी तिला आत घेतले का?”

“असा विचार काही वेळ तुम्ही केला, नाही का?”

“सर, ती मी नव्हते. ती बिट्रीस होती. मिसेस ओल्डफील्ड वारल्या, तेव्हा ती तिथे होती.”

पायरोने अतीनाट्यपूर्ण शब्द जाणूनबुजून वापरले, “आणि तिला वाटले की तिथे काही अनैतिक, दुष्ट बेत केला गेलेला आहे?”

ते छोटेसे झाड उत्तेजित होऊन हलू लागले.

“हो. तिला तसेच वाटले. आणि ती म्हणाली, तिथे असलेल्या दाईलाही असेच वाटले. त्या दाईला मिसेस ओल्डफील्डचा खूप लळा होता. त्यामुळे ती वारल्यावर दाई खूप दुःखी झाली होती. बिट्रीस नेहमी म्हणत असे, की कसे दाई हॅरीसनला त्यासंबंधी काही माहिती होते, कारण त्यानंतर ती डॉ ओल्डफील्डचा फारच दुस्वास करू लागली. काहीतरी कारण असल्याशिवाय ती असे करणार नाही, नाही का?”

“दाई हॅरीसन आता कुठे आहे?”

‘आता ती मिस ब्रिस्टोकडे कामाला असते --- गावाच्या खालील बाजूस शेवटी. त्या घराला खांब आणि अंगण आहे, त्यामुळे ते लगेच सापडते.”

## चार

नंतर थोड्याच वेळात हर्क्युल पायरो अशा एका बाईसमोर बसला होता, की जिला इतर कुणाहीपेक्षा या वावड्या उठणाऱ्या प्रकरणाबद्दल जास्त माहिती होते. दाई हॅरीसन ही साधारण चाळीशीची बाई, अजूनही सुंदर दिसत होती. तिचा चेहरा मॅडोनासारखा शांत, निवांत होता. डोळे काळेभोर व भावदर्शी होते. तिने त्याचे म्हणणे शांतपणे, लक्ष देऊन, ऐकून घेतले. मग ती

सावकाशीने बोलली, “हो. मला माहिती आहे की, याबद्दल वाईटपणे नको ते बोलले जाते आहे. ते थांबवण्यासाठी मी मला जमेल, तेवढे केले. पण ते निराशादायक ठरले. तुम्हाला माहिती आहे, लोकांना असल्या बातम्या चघळायला आवडतात.”

पायरो म्हणाला, “पण असल्या वावड्या उठायचे काहीतरी कारण असेलच, नाही का?”

तिचे दुःखी हावभाव वाढल्याचे त्याच्या लक्षात आले. पण तिने फक्त गोंधळून गेल्यासारखे तिचे डोके हलवले.

पायरोने सुचवले, “कदाचित डॉ ओल्डफील्ड व त्याच्या बायकोचे नीटसे जमत नसेल आणि त्यामुळे अशा अफवा उठायला सुरवात झाली असेल का?”

तिने तिचे डोके ठरवल्यासारखे हलवले.

“ओहो, नाही. डॉ ओल्डफील्ड खूपच दयाळु होता आणि बायकोच्या बाबतीत फार शांत होता.”

“त्याला खरोखर तिचा लळा होता का?”

ती कां कू करू लागली.

“नाही --- मी असे म्हणू शकणार नाही. मिसेस ओल्डफील्ड खूप कठीण बाई होती. तिला खूष करणे अवघड होते. तिला कोणी

सहानुभूती दाखवावी व लक्ष द्यावे म्हणून ती सतत काही ना काही मागण्या करत असे. त्यांना नेहमीच न्याय मिळे, असे नाही.”

पायरो बोलला, “म्हणजे तिने स्वतःचे स्तोम माजवून ठेवले होते?”

त्या दाईने डोके हलवले.

“हो --- तिचा श्वासाचा वाईट वास हा सर्वस्वी तिच्या स्वतःच्या कल्पनाशक्तीचा भाग होता

पायरो थंडपणे बोलला, ”आणि तरीही --- ती मेली --- “

“ओहो, मला माहिती आहे --- माहिती आहे --- “

त्याने क्षणभर तिचे निरीक्षण केले. तिचे त्रासलेले गोंधळलेपण! खात्री नसणारे तिचे धपापलेपण!

तो म्हणाला, “मला वाटते --- खात्रीपूर्वक वाटते --- की हे अफवांचे प्रकरण कसे सुरु झाले, हे तुम्हाला चांगले माहिती आहे.

दाई हॅरीसन लाजली. ती म्हणाली, “ठीक आहे. कदाचित, मी तर्क करू शकते. मला वाटते, जिने हे अफवांचे प्रकरण सुरु केले, ती बेट्रीस असावी. तिच्या डोक्यात हे कुठून शिरले, हे मला वाटते, मी सांगू शकेन.”

“हो का?”

दाई हॅरीसन जरा बिनबुडाची गोष्ट बोलली,

“असे बघा, मी हे उडत उडत ऐकले --- डॉ ओल्डफील्ड व मिस मॉनक्रीफमधील संभाषणाचा तुकडा --- आणि माझी खात्री आहे, की बेट्रीसनेदेखील ते ऐकले.”

“ते संभाषण काय होते?”

दाई हॅरीसन जणू काही तिच्या स्मरणशक्तीची चाचपणी करण्यासाठी मिनिटभर थांबली व मग बोलली, “हे मिसेस ओल्डफील्ड शेवटचा धक्का बसून मेली, त्याआधी तीन आठवडे घडले. ते जेवायच्या खोलीत बसले होते. मी जिन्यावरून खाली येत होते, तेव्हा मी जीन मॉनक्रीफचे बोलणे ऐकले,

‘अजून किती वेळ लागेल? मला जास्त थांबणे शक्य होणार नाही.”

आणि डॉक्टरांनी उत्तर दिले,

“प्रिये, मी शपथपूर्वक सांगतो, आता फार वेळ नाही.”

ती परत म्हणाली,

“मला हे थांबणे अशक्य झाले आहे. हे सर्व नीट पार पडेल, असे तुला वाटते ना?”

आणि तो म्हणाला, “अर्थात. काहीही गैरप्रकार होणार नाही. पुढच्या वर्षी यावेळी आपण लग्न केलेले असेल.”

ती थांबली.

“मिस्टर पायरो, त्याच वेळेस मला पहिली चुणूक मिळाली, की डॉ ओल्डफील्ड व मिस मॉनक्रीफ यांच्यात काहीतरी चालू आहे. अर्थात तो तिची स्तुती करतो व ते दोघे चांगले मित्र आहेत, पण त्याहून जास्त काही नसल्याचे मला माहिती होते. मी जिन्याने परत वर गेले. मला चांगलाच धक्का बसला होता --- मला स्वयंपाकघराचे दार उघडे दिसले. मला वाटले, की बेट्रीसनेदेखील ते ऐकले असणार. आणि तुम्हाला कळेल नाही का, की ज्या प्रकारे ते बोलत होते, ते दोन अर्थांनी घेता आले असते, नाही का? त्याचा अर्थ कदाचित एवढाच असेल, की डॉक्टरांना हे माहिती होते, की त्यांची बायको आजारी असून फार जगणार नाही आणि मला यात काही संशय वाटत नव्हता, की त्यांच्या मनात तसेच असावे. पण बेट्रीससारख्यांना ते वेगळे वाटले असेल. ते असे वाटले असेल, की डॉक्टर आणि जीन मॉनक्रीफ --- हे दोघे --- नक्कीच मिसेस ओल्डफील्डला मारायचा बेत करत आहेत.”

“पण तुम्हाला तसे वाटले नाही?”

“नाही --- अर्थातच नाही --- “

पायरोने तिच्याकडे शोधक नजरेने पाहिले. तो बोलला, “दाई हॅरीसन, तुम्हाला मला न सांगितलेले असे अजून काही माहिती आहे का?”

ती लाजली व आक्रमकपणे म्हणाली, “नाही. नाही. खात्रीने नाही. अजून काय असणार?”

“मला माहिती नाही. पण मला वाटते, अजून काही असू शकेल --- अजून काही?”

तिने मान हलवली. ती जुनी त्रासिक छटा तिच्या चेहऱ्यावर परत आली.

हर्क्युल पायरो म्हणाला, “हे शक्य आहे की कदाचित गावाचा मुख्य मिसेस ओल्डफील्डच्या शवविच्छेदनाची मागणी करेल!”

“नको. नको.” दाई हॅरीसन घाबरून गेली. “काय भयंकर गोष्ट आहे!”

“तुम्हाला हे दयनीय वाटते का?”

“मला हे फारच भयंकर वाटते. याने लोक काय बोलू लागतील, याचा विचार करा. हे डॉ ओल्डफील्डसाठी अतिशय वाईट --- फार वाईट ठरेल.”

“ती गोष्ट त्याच्यासाठी कदाचित चांगली ठरू शकेल, असे तुम्हाला वाटत नाही का?”

“तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

पायरो बोलला, “जर तो निरपराध असेल, तर ते सिद्ध होईल.”

त्याला जाणवले की ही गोष्ट दाई हॅरीसनच्या जिव्हारी लागली. त्याने तिला गोंधळून, भुवया वर चढवलेले पाहिले. आणि मग हळूहळू ती परत होती तशी झाली.

तिने एक खोल श्वास घेऊन त्याच्याकडे पाहिले.

ती साधेपणे म्हणाली, “मी याचा कधी विचार केला नव्हता. अर्थात एवढीच गोष्ट करता येऊ शकते.”

जमिनीवर कुणी चालत आल्याचा आवाज आला. दाई हॅरीसनने उडी मारली.

“या माझ्या मालकीणबाई, मिस ब्रिस्टो येत आहेत. ती तिच्या विश्रांतीमधून उठली आहे. तिचा चहा आणण्यापूर्वी, मला तिला हात धरून आरामशीरपणे आणले पाहिजे. मग मला तिला घेऊन फिरायला जायचे आहे. मिस्टर पायरो, हो, मला तुमचे बरोबर वाटते. शवविच्छेदन केल्याने एकदाचा या प्रकरणाचा निकाल लागेल. डॉ ओल्डफील्डसंबंधीच्या सर्व वावड्या नाहीशा होतील.”

तिने पायरोशी हातमिळवणी केली व ती घाईने खोलीबाहेर पडली.

# पाच

हर्क्युल पायरो चालत टपाल कार्यालयात गेला व लंडनला फोन लावला. पलीकडील आवाज पोरकट व वाईट होता.

“प्रिय पायरो, तुला या गोष्टीत नाक खुपसलेच पाहिजे का? तुझी खात्री आहे का, की ही आपल्यासाठीची केस आहे? या गावातील अफवा ---सहसा यातून काहीच निष्पन्न होत नाही. काहीच नाही.”

पायरो म्हणाला, “ही विशेष केस आहे.”

“ओहो, ठीक आहे --- तू जर असे म्हणत असशील तर तसे. तुला तू बरोबर असण्याची दमवणूक करणारी सवय आहे व तुला माहिती आहे, जर ही समस्या फालतू निघाली, तर आम्ही तुझ्यावर नाखूष होऊ.”

पायरो स्वतःशी हसला. तो पुटपुटला, “नाही, पण मी खूष असेन.”

“काय म्हणतो आहेस? ऐकू येत नाही.”

“काही नाही. काहीही नाही.”

त्याने फोन बंद केला.

तो तेथील खिडकीत डोकावून मोठ्या मवाळ आवाजात म्हणाला, “कृपया मला डॉ ओल्डफील्डकडील आधीची नोकराणी, बिट्रीस ही आता कुठे रहाते, ते समजू शकेल का?”

“बिट्रीस किंग? तेव्हापासून तिच्या दोन जागा आहेत. ती सध्या बँकेवरील मिसेस मार्लेकडे असते.

पायरोने तिचे आभार मानले. दोन पोस्टकार्डे, स्टँप व एक स्थानिक कुंडी असे सामान विकत घेतले. हे करतांना त्याने मुद्दाम होऊन वारलेल्या मिसेस ओल्डफील्डचा विषय काढला. तेथील बाईच्या चेहऱ्यावर हा काहीतरी नको तो प्रश्न असून तो टाळण्याचे भाव आल्याचे, पायरोच्या लक्षात आले. ती म्हणाली,

“ते अचानक झाले, नाही का? त्याबद्दल नंतर बऱ्याच वावड्या उठत होत्या, त्या तुम्ही ऐकल्या असतील.”

तिने स्वारस्य दाखवत विचारले,

“कदाचित त्यासाठीच तुम्ही “बिट्रीस किंगबद्दल विचारत असाल. तिला तेथील कामावरून तडकाफडकी काढून टाकले ते आम्हा सर्वांना जरा विचित्रच वाटले. काहीजणांना वाटले की तिला काही माहिती असेल --- आणि असेलही. तिने काही बऱ्यापैकी मोठ्या बातम्या फोडल्या होत्या.”

बिट्रीस किंग एक बुटकी, लबाड दिसणारी मुलगी होती. तिच्या नाक आणि घशाच्या मध्ये एक गाठ होती. ती भावनारहित व मूर्ख दिसत होती. पण एखाद्याच्या अपेक्षेपेक्षा, तिचे डोळे बुद्धिमान दिसत होते. पण असे वाटत होते की हिच्याकडून काहीही कळणार नाही. ती परतपरत तेच सांगत होती,

“मला कशाबद्दल काहीही माहिती नाही --- तिथे काय झाले, हे मी का सांगू? --- . डॉ ओल्डफील्ड व मिसेस ओल्डफील्ड यांच्यातील संभाषण मी चोरून ऐकले, म्हणजे तुम्ही काय म्हणत आहात, ते मला समजत नाही. मी दाराआड काय बोलणे चालले आहे ते ऐकणाऱ्यातील नव्हे. आणि मी तसे केले असे म्हणण्याचा तुम्हाला काही अधिकार नाही. मला काही माहित नाही.”

पायरो म्हणाला, “तुम्ही आर्सेनिक हे विष दिले गेल्याबद्दल काही ऐकले का?”

त्या वाईट स्वभावाच्या मुलीच्या चेहऱ्यावर झटपट टाळता येणारी रुची तरळून गेली. ती बोलली, “म्हणजे त्या औषधाच्या बाटलीत ते होते तर!”

“कुठली औषधाची बाटली?”

बिट्रीस म्हणाली, “मिसेस ओल्डफील्डसाठी मिस मॉनक्रीफने बनवलेल्या औषधाची बाटली. ती दाई फार उदास झाली होती.

मला ते दिसत होते. तिने त्याची चव घेतली. वास घेतला. आणि नंतर ते मोरीत फेकून दिले व बाटली नळाच्या पाण्याने भरून ठेवली. ते औषधही पांढरे, पाण्यासारखेच होते. आणि एकदा मिस मॉनक्रीफने मिसेस ओल्डफील्डसाठी चहाची किटली नेली, तेव्हा दाईने ती परत आणली व ती म्हणाली तो चहा उकळत्या पाण्यात केला नव्हता. त्यामुळे तिने तो परत केला. पण असा आपला माझा समज झाला. ती दाईची त्यावेळची काही कारवाई होती --- पण मला माहिती नाही –-- ते त्यापेक्षा काही जास्त असेल."

पायरोने मान हलवली व बोलला, "तुला मिस मॉनक्रीफ आवडायची का?"

"मला तिचे काय पडले होते? --- पण ती जरा थंड आणि अंतर राखून वागणारीच होती. अर्थात मला माहिती आहे, त्याप्रमाणे ती डॉक्टरांशी अगदी गोड होती. ती त्यांच्याकडे कसे पहात असे, ते तुम्ही बघायला हवे होते."

परत पायरोने मान हलवली. तो खानावळीत परत गेला.

तिथे त्याने जॉर्जला काही सूचना दिल्या.

# सहा

गावाच्या मुख्य कार्यालयातील अहवाल विश्लेषक, डॉ अलान गारशियाने त्याचे हात चोळले पायरोकडे बघून डोळा मारला. तो बोलला, “मिस्टर पायरो, ठीक आहे. मला वाटते, हे तुम्ही म्हणालात, तसेच आहे. तुमचे नेहमीच बरोबर असते.”

पायरो म्हणाला, “तू खूप दयाळु आहेस.”

“तुम्ही असे कसे काय ठरवलेत? गावगप्पांमधून?”

“तू म्हणतोस तसे --- वळवळणाऱ्या जिभांनी रंगवलेल्या गावगप्पांमधून!”

दुसऱ्या दिवशी पायरोने परत लोघबरो बाजारात चक्कर मारली.

तो बाजार मधमाशीच्या पोळ्यासारखा गजबजलेला होता. प्रेत उकरून काढल्यापासून, तिथे फारच गर्दी झाली होती.

आता शवविच्छेद्नाचा अहवाल फुटला होता. लोकांची उत्कंठा शिगेला पोचली होती.

पायरो खानावळीत सुमारे तासभर होता. त्याने स्टेक, किडनी व पुडिंगचे भरपेट जेवण केले होते. त्याला निरोप मिळाला, की बाईसाहेब त्याची वाट बघत आहेत.

ती दाई हॅरीसन होती. तिचा चेहरा पांढरा पडला होता व कसनुसा दिसत होता.

ती सरळ पायरोकडे आली. “मिस्टर पायरो, हे खरे आहे का? असे खरेच घडले होते का?”

त्याने तिला हळूवारपणे खुर्चीत बसवले.

“हो, मरायला जेवढे लागते, त्याहून कितीतरी अधिक आर्सेनिक सापडले.”

दाई हॅरीसन किंचाळली, “मला असे कधीच वाटले नाही. क्षणभरदेखील मला कधी असे वाटले नाही --- “एवढे बोलून तिचा बांध फुटला.

पायरो सभ्यपणे बोलला, “सत्य उजेडात येणारच होते, नाही का?”

ती हुंदके देत होती.

“आता ते त्याला फाशी देतील का?”

पायरो म्हणाला, “अजून बरेच काही सिद्ध व्हायचे आहे. संधी --- विष मिळवणे --- हे घडवून आणणारे वाहन!”

“मिस्टर पायरो, पण समजा त्याला याबद्दल काहीच माहिती नसेल तर --- काहीच माहिती नसेल तर!”

पायरो खांदे शहारवत बोलला, “तर मग त्याला निर्दोषी म्हणून सोडून देण्यात येईल.

दाई हॅरीसन सावकाशीने बोलली, “तिथे काही पाणी मुरते आहे --- मला वाटते --- मी तुम्हाला हे यापूर्वीच सांगायला हवे होते --- पण त्यात काही दम आहे, असे मला वाटले नाही. ते विचित्र होते.”

पायरो म्हणाला, “त्यात काही गोम असल्याचे मला माहिती होते. आता तुम्ही मला ते सांगितलेत, तर बरे होईल.”

“ते फार काही नाही. ते एवढेच आहे की एक दिवस मी काही कारणाने दवाखान्यात गेले, तेव्हा जीन मॉनक्रीफ काही भलतेच करत होती --- काही भलतेच!”

“हो का?”

“हे इतके मूर्खपणाचे वाटेल. ती तिचा पावडरचा गुलाबी डबा भरत होती.”

“बर --- “

“पण ती तो तोंडाला लावायच्या पावडरने भरत नव्हती --- कपाटातील एका विषाच्या बाटलीतून ती त्यात काहीतरी ओतत होती. जेव्हा तिने मला पाहिले, तेव्हा तिने तो डबा बंद करून पटकन तिच्या पर्समध्ये टाकला --- आणि बाटली परत कपाटात

ठेऊन दिली, म्हणजे ती कसली होती ते मला कळू नये. मी असे सांगायचे धाडस करते, की यात काही अर्थ नसेलही --- पण आता मला जेव्हा माहिती झाले, की मिसेस ओल्डफील्डला विष दिले गेले होते --- “ आणि ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

पायरो म्हणाला, “तुम्ही मला माफ कराल?”

तो बाहेर गेला व त्याने बर्कशायर पोलिसांमधील गुप्तहेर सार्जंट ग्रे ला फोन केला.

पायरो परत आला व तो आणि दाई हॅरीसन शांतपणे बसून राहिले.

पायरो लाल केसांच्या मुलीचा चेहरा बघत होता आणि एक स्पष्ट कडक आवाज असे म्हणतांना ऐकत होता, “मला हे मान्य नाही.” जीन मॉनक्रीफला शवविच्छेदन नको होते. तिने पटेल असे काही कारण दिले होते. पण खरे काय घडले, ते राहिलेच. सक्षम मुलगी --- चटपटीत --- व सतत कुरकुर करणाऱ्या बायकोबरोबर बांधला गेलेला, ती प्रेम करत असलेला माणूस, जो सहज अनेक वर्षे जगला असता. कारण दाई हॅरीसनच्या मते, तिला मिस मॉनक्रीफशी काहीच देणेघेणे नव्हते.

हर्क्युल पायरोने सुस्कारा टाकला.

दाई हॅरीसन म्हणाली, “तुम्ही काय विचार करत आहात?”

पायरो उत्तरला, “दयनीय गोष्टी --- “

दाई हॅरीसन म्हणाली, “त्याला काही माहिती होते, यावर माझा जराही विश्वास नाही.”

पायरो बोलला, “नाही, माझी खात्री आहे, त्याचा काही दोष नाही.”

दार उघडून गुप्तहेर सार्जंट ग्रे आत आला. त्याच्या हातात रेशमी रुमालाने झाकलेले काही होते. त्याने ते उलगडून काळजीपूर्वक खाली ठेवले. ती पावडरची गुलाबी डबी होती.

दाई हॅरीसन म्हणाली, “हीच ती मी बघितलेली डबी.”

ग्रे बोलला, “ही मिस मॉनक्रीफच्या कपाटाच्या खणात रुमालात बांधून ठेवलेली, मागे सारलेली सापडली. त्यावर काही ठसे सापडले नाहीत. मी हे सर्व काळजीपूर्वक करतो आहे.”

रुमाल त्याच्या हातात घेऊन, त्याने स्प्रिंग दाबली. ती डबी उघडली. तो म्हणाला, “ही तोंडाला लावायची पावडर नाही.”

त्याने त्यात बोट बुडवून काळजीपूर्वक चव घेतली.

“खास काही चव नाही.”

पायरो म्हणाला, “पांढऱ्या आर्सेनिकची चव लागत नाही.”

ग्रे म्हणाला, “मी याची झटपट परीक्षा करतो.” त्याने दाई हॅरीसनकडे पाहिले. “तुम्ही हे शपथेवर सांगता का, की ही तीच ती डबी आहे?”

“हो. माझी खात्री आहे. मिसेस ओल्डफील्डच्या मृत्यूपूर्वी आठवडाभर, मी दवाखान्यात मिस मॉनक्रीफच्या हातात ही पाहिली होती.”

सार्जंट ग्रे ने सुस्कारा टाकला. त्याने पायरोकडे बघून मान हलवली. पायरोने घंटी वाजवली. तो बोलला, ‘माझ्या नोकराला कृपया आत पाठवा.”

चांगला, शहाणा, अडथळा न आणत कामे करणारा नोकर जॉर्ज आत आला व त्याच्या मालकाकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले.

पायरो म्हणाला,

“मिस हॅरीसन, सुमारे वर्षापूर्वी तुम्ही ही डबी मिस मॉनक्रीफच्या हातात पाहिली होती? तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटेल, की ही डबी फक्त काही आठवड्यांपूर्वी, मेसर्स वूलवर्थ यांच्याकडून विकली गेली होती. आणि अजून सांगायचे म्हणजे, या प्रकारच्या रंगाची डबी विकणे फक्त तीन महिन्यांपूर्वी सुरु झाले होते?”

दाई हॅरीसन अवाक झाली. ती पायरोकडे मोठ्या गोल, काळ्या डोळ्यांनी बघत राहिली.

पायरो म्हणाला, “जॉर्ज, तू यापूर्वी असली डबी बघितली होतीस?”

जॉर्ज पुढे आला. “हो सर, मी मेसर्स वूलवर्थ या दुकानातून १८ तारखेच्या शुक्रवारी या दाई हॅरीसनला ती खरेदी करतांना बघितले होते. तुमच्या सूचनेप्रमाणे मी या बाईचा पाठलाग केला. तिने पहिल्या दिवशी डारनिंग्टनला जाणारी बस घेतली. आणि मी म्हटल्याप्रमाणे ही डबी खरेदी केली व ती तिच्याबरोबर घरी नेली. त्याच दिवशी नंतर, ती मिस मॉनक्रीफ रहाते, त्या घरी गेली. तिथे तिच्या झोपायच्या खोलीतील कपाटाच्या खणात अगदी मागे लपवून ठेवली. मला दाराच्या फटीतून हे सर्व नीट दिसले. आपल्याला कुणीही पाहिले नाही, या संभ्रमात ती बाहेर पडली. मी असे म्हणू शकतो, की ती पहात होती आणि इथे कुणीच घराचे पुढचे दार कुलुपबंद करत नाही.”

पायरो दाई हॅरीसनला कडक, विषारी आवाजात म्हणाला, “तुम्ही याचे स्पष्टीकरण देऊ शकाल का? मला वाटते नाही. ती मेसर्स वूलवर्थमधून बाहेर पडली, तेव्हा त्या खोक्यात आर्सेनिक नव्हते. पण ती जेव्हा मिस ब्रिस्टोच्या घरातून बाहेर पडली, तेव्हा

होते.” त्याने मवाळपणे पुढे म्हटले, “हा तुमचा मूर्खपणा झाला, की तुम्ही तुमच्याजवळ आर्सेनिक ठेवलेत.”

दाई हॅरीसनने तिच्या हाताच्या ओंजळीत तिचा चेहरा लपवला. ती दबलेल्या आवाजात बोलली, “हे खरे आहे --- हे सगळे खरे आहे. आणि हे सगळे निष्कारण --- उगीच --- मी वेडी झाले होते.”

## सात

जीन मॉनक्रीफ बोलली,

“मिस्टर पायरो, तुम्ही मला क्षमा केली पाहिजे. मी तुमच्यावर इतकी रागावले होते --- फारच रागावले होते. मला वाटत होते, तुम्ही सगळा घोळ करत आहात.”

पायरो हसून म्हणाला,

“लर्नियन हायड्राच्या जुना गोष्टींप्रमाणे, मी अशी सुरवात करतो. प्रत्येक वेळी त्याचे एक डोके कापले, की तिथे दोन डोकी उगवत. तशाच सुरवातीला अफवा पसरल्या व वाढल्या. पण तुम्ही माझे प्रसिद्ध हर्क्युलससारखे काम पाहिले असेल. मी पहिल्यांदा --- मूळ डोक्याकडे पोचलो. या अफवांना कोणी सुरवात केली? मला हे शोधून काढायला फारसा वेळ लागला नाही, की हे सर्व सुरु

करणारी दाई हॅरीसन आहे. मी तिला भेटायला गेलो. तिने ती फार सज्जन असल्याचा आव आणला --- बुद्धिमान आणि भावनाशील! पण लगेचच तिने एक चूक केली --- तिने तुमच्यात व डॉ ओल्डफील्डमध्ये झालेले संभाषण परतपरत मला सांगितले. तुम्ही बघता आहात, की ते सगळे खोटे होते. मानसशास्त्रीय दृष्ट्या ते तसे होणे संभवत नव्हते. जर तुम्ही आणि डॉ ओल्डफील्ड यांनी मिसेस ओल्डफील्डला मारायचा बेत आखला असता, तर खूप बुद्धिमान व समतोल डोक्याच्या तुमच्यासारख्या माणसांनी, ते उघडे दार असलेल्या खोलीत, कुणालाही जिन्यावरून किंवा स्वयंपाकघरातून ऐकू जाईल अशा स्थितीत केले नसते. शिवाय जे शब्द बोलल्याचे सांगितले गेले, ते तुमच्या मनस्थितीला पोषक वाटत नव्हते. ते वेगळ्या प्रकारच्या वयस्क बाईचे शब्द होते. ते शब्द दाई हॅरीसनचे वाटत होते. तिने ते अशा परिस्थितीत वापरले होते.

“आतापर्यंत मला हे प्रकरण साधे वाटत होते. मला वाटते, दाई हॅरीसन बरीच तरुण व अजूनही सुंदर असल्याने --- गेली तीन वर्षे तिला डॉक्टरांबद्दल आपुलकी व प्रेम वाटत होते. सहानुभूतीपूर्ण रीतीने व खुबीने ती मालकिणीची सेवा करत असल्यामुळे, डॉक्टर तिचे ऋणाईत असून तिच्यावर खूष होते. तिला वाटत होते की बहुधा मिसेस ओल्डफील्ड वारल्यावर डॉक्टर तिला लग्नाबद्दल

विचारतील. त्याऐवजी तिला मिसेस ओल्डफील्डच्या मृत्युनंतर कळले, की डॉक्टर तुमच्या प्रेमात आहेत. त्यामुळे सरळसरळ मनात खुन्नस बाळगून, तिने अफवा उठवायला सुरवात केली, की डॉक्टर ओल्डफील्डने बायकोला विष दिले.

“तर अशा तऱ्हेने मी प्रथम तर्क लढवत गेलो. ही एका हेवा करणाऱ्या व अफवा पसरवणाऱ्या बाईची केस होती. पण आगीशिवाय धूर नाही, ही म्हण मला विशेषत्वाने परतपरत आठवली. मला वाटू लागले की दाई हॅरीसनने अफवा पसरवण्याशिवाय अजून काही केले असले पाहिजे. तिने सांगितलेल्या काही ठराविक गोष्टींची माझ्या मनात घंटी वाजू लागली. तिने मला सांगितले, की मिसेस ओल्डफील्डचा आजार हा मुख्यत्वे काल्पनिक होता. खरे तर तिला फारशा वेदना होत नसत. डॉक्टर ओल्डफील्डला मात्र त्यांच्या बायकोच्या आजाराच्या खऱ्या परीस्थितीबद्दल माहिती होते. त्याला तिचा मृत्यु झाला त्याचे आश्चर्य वाटले नाही.

तिच्या मृत्युपूर्वी काही दिवस त्याने दुसऱ्या एका डॉक्टरला बोलावले होते. आणि त्याला तिच्या आजाराचे गांभीर्य कळून चुकले होते. अंदाजाने मी शवविच्छेद्नाची सूचना केली --- तिच्यातील शहाणणाने दाई हॅरीसन पहिल्यांदा शवविच्छेद्नाच्या

कल्पनेने घाबरली. नंतर लगेच तिच्यातील हेव्याने व जळफळाटाने डोके वर काढले. त्याना आर्सेनिक सापडू दे. तिच्यावर संशय घेतला जाणार नाही. डॉक्टर व जीन मॉनक्रीफ यांच्यावर त्याचे खापर फुटेल, असा प्रयत्न तिने केला.

"एकच आशा होती, ती म्हणजे दाई हॅरीसनला स्वतःला स्वतःच्याच जाळ्यात गुंतवायचे. जीन मॉनक्रीफ या गुन्ह्यात अडकावी, म्हणून दाई हॅरीसन नक्की प्रयत्न करणार, यांबद्दल मला खात्री होती. मी माझा विश्वासू नोकर जॉर्जला सूचना दिली --- ती त्याला ओळखत नसल्याने तो त्याचे काम बिनबोभाट करू शकत होता. त्याला मी तिचा जवळून पाठलाग करायला सांगितले होते याचा शेवट चांगला झाला."

जीन मॉनक्रीफ म्हणाली, "तुम्ही नवलपूर्ण आहात."

डॉक्टर ओल्डफील्ड आत आला. तो म्हणाला, "हो, खरच, मी तुमचे कितीही आभार मानले, तरी ते कमीच ठरतील. मी किती मूर्खासारखा, आंधळेपणे वागलो!"

पायरोने चौकसपणे विचारले, "बाईसाहेब, तुम्हीदेखील आंधळ्या होतात का?"

जीन मॉनक्रीफ हळूवारपणे बोलली, “मी फारच काळजीत होते. असे बघा, कपाटातील विषांमध्ये आर्सेनिक असणे --- हे काही जमत नाही, नाही का?”

ओल्डफील्ड ओरडला, “जीन, तू नीट विचार करू शकत नाहीस का --- ?”

“नाही. नाही. तू नाही. मी काय विचार केला, तर मिसेस ओल्डफील्डला कुठल्या ना कुठल्या प्रकारे ते दिले गेले --- आणि ती ते का घेत होती, तर ती आजारी पडून, तिला सहानुभूती मिळावी म्हणून --- आणि तिने अविचारीपणे त्याचा मोठा डोस घेतला. पण मी घाबरत होते, की शवविच्छेदन केल्याने, आर्सेनिक सापडले, की ते अशी काही गोष्ट समजून घेणार नाहीत आणि अशा निर्णयावर येण्याची घाई करतील, की तू ते केलेस. म्हणून मी आर्सेनिक नाहीसे झाल्याचे कधी म्हणाले नाही. मी उलट ते प्रकरण दुर्लक्षित ठेवले होते. पण शेवटची संशयी व्यक्ती दाई हॅरीसन ठरली.”

ओल्डफील्ड बोलला, “ती इतकी सभ्य स्त्रीसुलभ भावना असणारी मॅडोनासारखी बाई होती.”

पायरो दुःखाने बोलला,

“बहुधा ती चांगली बायको व आई ठरली असती --- पण तिच्या भावना तिच्यासाठी जरा जास्त होत्या.” त्याने सुस्कारा टाकला आणि श्वास रोधून पुटपुटला, “हे दयनीय आहे.”

मग तो मध्यमवयीन आनंदी माणसाकडे व त्याच्या समोरील उत्सुक चेहऱ्याच्या मुलीकडे बघून हसला. तो स्वतःशी बोलला, “ते त्यांच्यावर पडलेल्या सावलीतून उन्हात आले --- आणि मी --- मी आता हर्क्युलसचे दुसरे साहस केले.”

# THE ARCADIAN DEER
# आर्केडीयन हरिणी



हर्क्युल पायरोने त्याचे पाऊल उबदार करायचा प्रयत्न केला.

त्याच्या मिशांच्या टोकांवरील बर्फाचे कण त्याने बोटांवर फुंकर मारून उडवून लावले.

दारावर टकटक करून, नोकराणी आत आली. ती सावकाश श्वास घेणारी, गावाकडील जाडसर मुलगी होती. तिला हर्क्युल

पायरोबद्दल खूप कुतूहल होते. असे असू शकेल, की तिने यापूर्वी त्याच्यासारखे कुणी पाहिले नव्हते.

तिने विचारले, “तुम्ही फोन केला होता का?”

“हो. तुम्ही कृपया शेकोटी पेटवाल का?”

ती बाहेर जाऊन, कागद व काड्या घेऊन, लगेच परत आली. ती मोठ्या व्हिक्टोरियन काळातील शेकोटीपुढे वाकली व विस्तव पेटवू लागली.

हर्क्युल पायरोने त्याचे हात पाय हलवून उबदार करणे व बोटांवर फुंकर मारणे चालू ठेवले.

तो चिडला होता. त्याची मोटार --- महागडी मेसॅरो ग्रॅट्झ --- तो जशी अपेक्षा करत होता, त्या परिपूर्णतेने चालत नव्हती. भरपूर पगार घेणाऱ्या गाडीचा चालकाला पण ती व्यवस्थित चालू ठेवणे जमत नव्हते. बर्फ पडायला लागला की एक दीड मैल धावून, ती कुठल्याही आतल्या रस्त्यावर बंद पडायची. पायरोला त्याचे नेहमीचे झकपक बूट घालून, नदी शेजारील हार्टी डेले या गावापर्यंत चालत जावे लागे. हार्टी डेले हे असे गाव होते, की जिथे उन्हाळ्यात चांगली चहलपहल असायची पण हिवाळ्यात सर्व ठप्प होऊन जायचे.

पाहुणा आल्यामुळे ब्लॅक स्वान नावाच्या गॅरेजच्या मालकाच्या कपाळावर आठी पडली. तो स्पष्टपणे सांगत होता, की स्थानिक गॅरेजमधून गाडी मिळू शकेल व त्यामुळे पाहुण्याला त्याचा प्रवास चालू ठेवता येईल.

हर्क्युल पायरोने ही सूचना धुडकावून लावली. त्याची लॅटीन काटकसर पश्चात्ताप करायला लावणारी होती. गाडी भाड्याने घ्यायची? त्याच्याकडे आधीच गाडी होती --- मोठी गाडी --- महागडी गाडी. फक्त त्यातून आणि परत गावात जाण्यासाठी इतर कशातूनही प्रवास न करण्याचे त्याने ठरवले होते. कुठल्याही परिस्थितीत, जरी दुरुस्ती लवकर करून मिळाली, तरी तो दुसऱ्या दिवशी सकाळच्या आत या बर्फातून जाणार नव्हता. त्याने शेकोटी असलेल्या खोलीची व जेवणाची मागणी केली. सुस्कारा टाकत मालकाने त्याला खोली दाखवली. शेकोटी पेटवण्यासाठी नोकराणीला पाठवले. मग तो जेवणाच्या समस्येवर बायकोबरोबर चर्चा करण्यासाठी गेला.

तासाभराने त्याचा पाय उबदार शेकोटीकडे करून, पायरो शांतपणे त्याने नुकतेच घेतलेल्या जेवणावर विचार करत होता. हे खरे होते की स्टेक कडक व कुर्च्यांनी भरलेला होता, ब्रुसेल्सचे मोड फार लांब, फिकट व खात्रीने पाणीदार होते. बटाटे दगडासारखे

कडक होते. नंतर आलेल्या शिजवलेल्या सफरचंदाबद्दल व कस्टर्डबद्दल फारसे काही बोलण्यासारखे नव्हते. चीज कडक होते आणि बिस्कीट मऊ होते. तथापि पायरोने लपलपणाऱ्या ज्वाळांकडे डौलाने बघत आणि कपामधील कॉफी नावाच्या चिखलमय पेयाचे घुटके घेत, विचार केला, की हा कप रिकामा करण्यापेक्षा भरलेले ठेऊन देणे जास्त बरे ठरेल. त्याचे चामड्याचे बूट घालून बर्फाळ गल्ल्या तुडवल्यानंतर शेकोटीसमोर बसणे म्हणजे स्वर्गच होता!

दारावर टकटक झाली आणि नोकराणी अवतरली.

"सर, कृपया, गॅरेजचा माणूस इथे तुम्हाला भेटायला आला आहे."

पायरो मित्रत्वाने उत्तरला, "त्याला येऊ दे."

तो मुलगी हसली व गेली. पायरोने दयाळुपणे विचार केला, 'ती आता तिच्या मित्रांना त्याच्याबद्दल जे सांगेल, हे हिवाळ्यातील अनेक दिवस त्याची करमणूक करेल.'

दारावर परत एक थाप बसली --- वेगळ्या प्रकारची --- पायरो म्हणाला, "आत या."

त्याने मान्यता देत समोर येऊन सहजपणे चिडून बघणाऱ्या तरुण माणसाकडे पाहिले. तो त्याची टोपी हाताने फिरवत होता.

त्याने विचार केला, मनुष्यमात्रातील आतापर्यंत त्याने पाहिलेल्या देखणेपणाचा तो उत्कृष्ट नमुना होता. बाहेरून ग्रीक देवासारखा दिसणारा तो एक साधा तरुण मनुष्य होता.

तो तरुण मनुष्य घोगऱ्या आवाजात म्हणाला, "सर, गाडीबद्दल, आम्ही गाडी आणली आहे. आम्हाला त्रास झाला. तासभर आम्ही खटपट करत होतो."

पायरोने विचारले, "काय त्रास होता?"

तो तरुण माणूस तांत्रिक खोलात शिरला. पायरो ते ऐकत नव्हता. दुरुस्त झालेल्या गाडीची त्याने स्तुती केली. त्याला वाटले गाडीच्या इंजिनच्या आसपास भरपूर उंदीर असणार. त्याने मान्यता देत स्वतःशी म्हटले, "हो. ग्रीक देव --- आर्केडीयाचा धनगर."

तो तरुण मनुष्य अचानक थांबला. त्यानंतर सेकंदभर पायरोच्या भुवया आक्रसल्या गेल्या. त्याची पहिली प्रतिक्रिया रसग्रहणात्मक होती आणि दुसरी मानसिक. वर बघतांना त्याचे डोळे चौकसपणे बारीक झाले. तो बोलला,

"मला कळले. मला समजले. तो थांबून म्हणाला, "तू आता जे बोललास, ते माझ्या गाडीच्या चालकाने मला आधीच सांगितले आहे."

त्याने दुसऱ्याच्या गालावर आलेले हास्य पाहिले. उदासीनतेने त्याची बोटे टोपी पकडतांना पायरोने पाहिली.

तरुण मनुष्य चाचरत बोलला, “हो ओ --- स अ र, मला माहिती आहे.”

पायरो मऊपणे बोलला, “पण तुला असे वाटले का, की तू पण येऊन ते सांगावेस?”

“हो ओ --- स अ र, मला वाटले ते बरे होईल.”

पायरो बोलला, “ही तुझी टोकाची कर्तव्यतत्परता झाली. मी आभारी आहे.”

जाण्यापूर्वीचे हळू पण बिनचूक स्वर आले. तरीही तो जातो आहे असे त्याला वाटले नाही. आणि त्याचे बरोबर ठरले तरुण मनुष्य हलला नाही.

त्याची बोटे आक्षेपार्हपणे त्याची टोपी चुरडत होती. तो अजून खालच्या पट्टीत व लाजऱ्या आवाजात बोलला, “स अ र, मला मा आ फ करा. पण हे खरे आहे, नाही का? तुम्ही गुप्तहेर आहात. तुम्ही मिस्टर हर्क्युल पायरो आहात ना?” त्याने फार काळजीपूर्वक नावाचा उच्चार केला.

तरुण माणसाच्या चेहऱ्यावर लाली पसरली. तो म्हणाला, “मी वर्तमानपत्रात तुमच्याबद्दल वाचले होते.”

“हो का?’

आता तो मुलगा लालीलाल झाला. त्याच्या डोळ्यात विनवणीवजा दुःख दिसू लागले --- पायरो त्याच्या मदतीला आला. तो हळूवारपणे बोलला, “अरे, बोल. तुला काय विचारायचे आहे?”

आता शब्द घाईने बाहेर पडले.

“सर, तुम्हाला हा माझा फार उद्धटपणा वाटेल. पण ही तुम्ही इकडे आल्याची संधी --- ही चुकवणे फार वाईट ठरेल. तुम्ही केलेल्या भन्नाट गोष्टी वर्तमानपत्रात वाचल्यावर, मी तुम्हाला विचारू शकतो, नाही का? त्याचा तुम्हाला काही त्रास होणार नाही ना?”

पायरोने डोके हलवले. तो म्हणाला, “तुला काही बाबतीत माझी मदत हवी आहे का?”

दुसऱ्याने मान हलवली. तो खर्जातील लाजऱ्या आवाजात बोलला, “ते एका तरुण स्त्रीबद्दल आहे --- जर तुम्ही तिला माझ्यासाठी शोधू शकलात तर!”

“तिला शोधायचे? म्हणजे ती नाहीशी झाली आहे का?”

“हो. बरोबर, सर.”

पायरो त्याच्या खुर्चीत बसून कडकपणे म्हणाला,

“कदाचित मी तुला मदत करू शकतो. पण योग्य म्हणजे तू पोलिसांकडे जावेस. हे त्यांचे काम आहे आणि त्यांच्याकडे माझ्यापेक्षा जास्त साधनसामग्री व मनुष्यबळ असते.”

मुलाने त्याच्या पायांची वळवळ केली. तो हिंपुटी होत म्हणाला, “मी ते करू शकतो. पण ते तसे नाही आहे. हे सांगायलाही तसे फार विशेष असे आहे.”

पायरोने त्याच्याकडे रोखून पाहिले. मग त्याने खुर्चीकडे बोट दाखवले.

“अरे मित्रा, बस --- तुझे नाव काय?”

“विलीअमसन सर, टेड विलीअमसन.”

“बस, टेड. आणि मला त्याबद्दल सर्व काही सांग.”

“सर, आभारी आहे.” त्याने खुर्ची पुढे ओढली आणि काळजीपूर्वक रीत्या त्या खुर्चीच्या कडेवर बसला. त्याच्या डोळ्यात अजून कुत्र्यासारखे विनवणी केल्याचे भाव होते.

पायरो शांतपणे बोलला, “मला सांग.”

टेड विलीअमसनने एक खोल श्वास घेतला.

“तर, असे बघा. ते असे झाले. मी तिला फक्त एकदाच पाहिले. मला तिचे नाव किंवा काहीही माहिती नव्हते. पण ही सगळी विचित्र गोष्ट आहे. आणि माझे पत्र आणि सगळे परत आले.”

पायरो बोलला, “सुरवातीपासून सांग. घाई करू नकोस. कायकाय झाले ते सर्व सांग.”

“हो सर. तर कदाचित तुम्हाला ग्रासलॉन माहिती असेल. पूल ओलांडल्यावर नदीकाठी असलेले मोठे घर?”

‘मला काही माहिती नाही.”

‘ते सर जॉर्ज सँडरफिल्ड यांच्या मालकीचे आहे. ते उन्हाळयात ते शनिवार रविवारसाठी व मेजवान्यांच्या वेळी वापरतात. साधारणपणे सगळा आनंदी माहोल असतो. नट्या वगैरे येतात. तर गेल्या जूनमध्ये --- फोन चालत नव्हता आणि त्यांनी मला काय झाले आहे ते विचारायला पाठवले.”

पायरोने मान हलवली.

“त्यामुळे मी गेलो. तो सभ्य माणूस पाहुण्यांबरोबर नदीवर होता. स्वयंपाकी बाहेर होता आणि त्याचा पुरुष नोकर बोटीवर सर्वांना पेय पुरवण्यासाठी गेला होता. घरात ही मुलगी एकटी होती --- ती एका पाहुण्याची नोकराणी होती. तिने मला घरात घेऊन, फोन कुठे आहे, ते दाखवले. मी त्यावर काम करत असतांना ती

तिथेच उभी राहिली. मग आम्ही बोलू लागलो --- तिने सांगितले की तिचे नाव नीता होते आणि ती तिथे रहाणाऱ्या रशियन नर्तकीची नोकराणी होती."

तिचे नागरिकत्व कुठले होते? इंग्लिश?"

'नाही, सर. बहुधा मला वाटते, फ्रेंच. तिचे उच्चार मजेशीर होते. पण ती इंग्लिश बरोबर बोलत होती. ती --- ती मित्रत्वाने वागत होती. मी तिला विचारले, की आज रात्री ती माझ्याबरोबर सिनेमाला येईल का. ती म्हणाली तिच्या मालकीणबाईंना तिची गरज असेल. पण नंतर ती म्हणाली दुपारी लवकर ती घरातून बाहेर पडू शकेल कारण ते नदीवरून उशीरापर्यंत परत येणार नव्हते. तेव्हा शेवटी न विचारता [ आणि मला त्याबद्दल पोतेही मिळाले. ] असे ठरले, की मी दुपारचा वेळ राखून ठेवावा. मग आम्ही नदीच्या कडेने फिरायला गेलो."

तो थांबला. त्याच्या ओठांवर हास्य तरळले. त्याचे डोळे स्वप्नाळू झाले.

पायरो म्हणाला, "आणि ती सुंदर होती?"

"तुम्ही पाहिलेल्या सर्व मुलींमध्ये ती सुंदर होती. तिचे केस सोनेरी होते. ते दोन्ही बाजूंना पंखासारखे पसरले होते --- तिचा

स्वभाव आनंदी होता. मी --- मी तर तिच्या प्रेमातच पडलो. सर, मी खोटे बोलत नाही.''

पायरोने मान हलवली. तरुण मनुष्य पुढे सांगू लागला,

''ती म्हणाली तिची मालकीण पंधरा दिवसानी परत येईल. तेव्हा परत भेटायचे आम्ही ठरवले.'' तो थांबला. ''पण ती कधीच आली नाही. मी तिने सांगितलेल्या जागी थांबून राहिलो. पण तिचा काही पत्ता नव्हता. शेवटी मी धीर करून त्या घरी गेलो व तिच्याबद्दल विचारले. तिथे ती रशियन बाई व तिची नोकराणीदेखील रहात असल्याचे ते म्हणाले. त्याना मी तिला बोलवायला सांगितल्यावर, ती आली. पण जी आली, ती नीता नव्हतीच. ती एक काळी मांजरीसारखी दिसणारी मुलगी होती --- तीन धीट मुलींमधील ती एक होती. ते तिला मेरी म्हणत होते. ''तुला मला भेटायचे होते?'' ती लाजण्याचे ढोंग करत म्हणाली. तिने मला दचकलले पाहिले असावे. मी तिला विचारले, की ती रशियन स्त्रीची नोकराणी होती का. ती हसली व म्हणाली, मागच्या नोकराणीला अचानक काढून टाकण्यात आले. ''काढून टाकले? का?'' मी बोललो. तिने खांदे शहारवल्यासारखे केले व तिचे हात पसरून ती म्हणाली, ''मी तिथे नव्हते.''

“सर, मला त्यामुळे धक्का बसला. त्यावेळी मला काही बोलायला सुचले नाही. पण नंतर मी धीर गोळा केला व परत त्या मेरीला भेटून, मला नीताचा पत्ता द्यायला सांगितला. मी सांगितलेले तिने केले, तर मी तिला एक भेट देण्याचे कबूल केले --- ती दयाळूपणे ते करायला तयार झाली. तिने मला उत्तर लंडनमधील एक पत्ता आणून दिला. मी नीताला पत्र लिहिले. पण काही दिवसांनी ते परत आले. ‘या पत्त्यावर सापडले नाही’ असा शिक्का त्यावर होता.

टेड विलीअमसन थांबला. त्याचे खोल, निळे, स्थिर डोळे पायरोकडे बघत होते. तो म्हणाला,

“असे बघा, सर काहीतरीच झाले. ही काही पोलीसांसाठीची केस नाही. पण मी तिला शोधत राहिलो. आणि ते कसे करावे, ते मला कळेना. तुम्ही माझ्यासाठी तिला शोधाल का?” त्याचा रंग चढला. पण मी गरीब आहे. मी तुम्हाला फक्त पाच --- किंवा दहा पौंडही देऊ शकतो.”

पायरो शांतपणे बोलला,

“या क्षणी आपण पैशांबद्दल बोलायला नको. पहिल्यांदा या मुद्द्यावर लक्ष दे. ही मुलगी --- नीता --- तिला तुझे नाव आणि तू कुठे काम करतोस, ते माहिती होते का?”

“हो, सर.”

“तिला हवे असेल, तर ती तुझ्याशी संपर्क साधू शकत होती?”

टेड अधिक हळू आवाजात बोलला, “हो, सर.”

“मग तुला असे वाटत नाही का --- कदाचित --- “

टेड विलीअमसन मध्येच बोलला, “म्हणजे सर, तुम्हाला असे म्हणायचे आहे, की मी तिच्या प्रेमात पडलो. पण ती नाही. कदाचित एका अर्थी ते खरेही असेल --- पण तिला मी आवडत होतो --- तिला मी आवडत होतो. तिच्यासाठी ही काही क्षणाची मजा नव्हती --- आणि सर, मी असा विचार करतो, या सर्वाचे काही कारण असेल. सर, तुम्ही बघाल, की ती मोठ्या विनोदी गर्दीत मिसळली होती. तिला कदाचित काही त्रास असेल. मी काय म्हणतो आहे, ते कदाचित तुम्हाला कळत असेल.”

“तुला असे म्हणायचे आहे की तिला मूल होणार असेल? तुझे मूल?

“माझे नाही, सर.” टेड लाजला. तसे आमच्यात काही घडले नव्हते”

पायरोने त्याच्याकडे विचारपूर्वक बघितले आणि तो पुटपुटला, “तू जे सुचवतो आहेस, ते खरे असले तर --- तरीही तू तिला शोधू इच्छितोस?”

टेडचा चेहरा लाल झाला. तो म्हणाला, “हो. तरीही. आणि त्याबद्दल मी ठाम आहे. जर ती तयार असेल, तर मला तिच्याशी लग्न करायचे आहे. मग ती कशाही संकटात अडकलेली का असेना! सर, तुम्ही माझ्याकरता, तिला शोधाल का?”

पायरो हसला. तो स्वतःशी बोलल्यासारखे, पुटपुटला, ‘सोन्याच्या पंखासारखे केस’ हो. हे हर्क्युलसचे तिसरे साहस आहे --- जर मला बरोबर आठवत असेल, तर ते आर्केडीयात --- “

## दोन

टेडने कष्टपूर्वक नाव व पत्ता लिहिलेल्या कागदाकडे हर्क्युल पायरोने विचारपूर्वक बघितले.

मिस व्हॅलेट्टा, १७, वरची रेन प्रयु गल्ली, नं १५

या पत्त्यावर काही मिळेल का, याचे त्याला आश्चर्य वाटत होते. त्याला वाटत होते मिळणार नाही. पण टेड त्याला एवढीच मदत करू शकत होता.

१७, वरची रेन प्रयु गल्ली, हा अंधारी पण चांगला रस्ता होता. पायरोच्या टकटकीनंतर एका उदास डोळयांच्या बळकट बाईने दार उघडले.

“मिस व्हॅलेट्टा?”

“ती तर बऱ्याच काळापूर्वी येथून गेली.”

दार बंद होणार, तेवढ्यात पायरोने घराची एक पायरी चढली.

“तुम्ही कदाचित मला तिचा पत्ता देऊ शकाल?”

“सांगता येत नाही. माझी खात्री आहे, तिने तो ठेवलेला नाही.”

“ती कधी गेली?”

‘मागील उन्हाळयात.”

“नक्की कधी, ते तुम्ही सांगू शकाल का?”

पायरोच्या उजव्या हातातील दोन नाणी सहजतेने एकमेकांना घसपटून त्याचा बारीकसा पण तीक्ष्ण आवाज आला.

उदास डोळयांची बाई जादूसारखी मऊसूत झाली. ती आपोआप दयाळु व आनंदी झाली.

“हे बघा, मला नक्की तुम्हाला मदत करायला आवडेल. मी आठवते. ऑगस्ट, नाही त्यापूर्वी --- जुलै --- हो, जुलै. बरोबर तो जुलै असावा. पहिला आठवडा असावा. मला वाटते, ती परत इटालीला गेली. ती घाईत होती.”

“म्हणजे ती इटालियन होती तर?”

“बरोबर, सर.”

“आणि एके काळी ती रशियन नर्तकीची नोकराणी होती, हो ना?”

“हो. सेमोलीना का असेच काहीसे त्या बाईचे नाव होते. या भागातील थिएटरमध्ये तिचा नाच झाला होता आणि तिला अमाप प्रसिद्धी मिळाली होती. ती नाचात अग्रगणी होती.”

पायरो बोलला, “तुम्हाला माहिती आहे का, की मिस व्हॅलेट्टाने नोकरी का सोडली?”

बोलण्यापूर्वी त्या बाईने आढेवेढे घेतले. “मला खात्री नाही. मी सांगू शकत नाही.”

“तिला काढून टाकले गेले का?”

“मला वाटते, तिथे काहीसे भांडण झाले होते. पण तुम्हाला सांगते, मिस व्हॅलेट्टाने ते फार मनावर घेतले नाही. तो गोष्टी सोडून देणारी नव्हती. पण तिला त्याचा राग आला होता. तिचा स्वभाव दुष्ट होता. --- खरी इटालियन --- तिचे काळे डोळे असे तीक्ष्ण होते, की जणू तिला तुमच्या अंगात चाकू खुपसायचा आहे. ती अशा मनस्थितीत असतांना, मी तिला छेडले नसते.”

“आणि तुम्हाला खात्री आहे, की तुम्हाला तिचा आताचा पत्ता माहिती नाही?”

दोन नाणी परत एकमेकांना घसपटून गेली. त्यामुळे तिला माहिती सांगायला थोडी उत्तेजना मिळाली. तिचे उत्तर खरेखुरे वाटले. “माझी इच्छा आहे की मला तो माहिती हवा होता. तसे असते, तर मला आनंद झाला असता. पण --- ती घाईत गेली, त्यामुळे!

पायरो स्वतःशी विचारपूर्वक बोलला, “हो, असे आहे तर -“

## तीन

एका येऊ घातलेल्या बॅले नृत्याच्या सुशोभनाच्या तयारीत गुंतलेला, अँब्रोसे व्हँडेल याने त्यापासून परावृत्त होऊन, अगदी सहजपणे माहिती दिली.

सँडरफिल्ड? जॉर्ज सँडरफिल्ड? फार वाईट मनुष्य! पैशात लोळणारा! तो विचित्र असल्याचे बोलले जात असे. काळाकुट्ट घोडा! एका नर्तकीशी प्रकरण? पण अर्थात माझा आवडता --- त्याची कॅटरीनाशी भानगड चालू होती. कॅटरीना सामोशेनका. तुम्ही तिला नक्की पाहिले असेल. ओहो, माझी आवडती --- फारच नाजूक व सुंदर गात्रे असलेली --- ट्युलेलाची हंसीनी --- तुम्ही नक्कीच तिला पाहिले असेल? माझी शोभा! डेब्युसीची किंवा मेनची दुसरी अशी गोष्ट, की शिकारीचे सावज बनलेली हरिणी? ती

मायकेल नोव्हगीनबरोबर नाचत होती. तो देखील देखणा आहे, नाही का?”

“आणि ती जॉर्ज सँडरफिल्डची मैत्रिण होती?”

“हो. ती त्याच्याबरोबर त्याच्या नदीशेजारील घरी शनिवार रविवार घालवत असे. मला वाटते, तो मोठ्या मेजवान्या देत असे.”

“माझ्या प्रिय, तुला हे शक्य होईल का, की तू माझी मिसेस सँडरफिल्डशी ओळख करून देशील?”

“पण माझ्या प्रिय, तिच्याशी ओळख करून द्यायला, ती आता इथे नसते. ती अचानक पॅरीस का कुठेतरी गेली. ते म्हणतात, की ती बोल्शेव्हिक हेर की कायसे होती --- पण माझा काही यावर विश्वास नाही. तुला माहिती आहे, लोकांना असल्या गोष्टी चघळायला आवडते. कॅटरीना नेहमी ढोंग करत असे, की ती गोरी रशियन आहे --- तिचे वडील राजा वा राजपुत्र होते --- नेहमीची गोष्ट! ती यापेक्षा बरी असू शकली असती.” व्हँडेल थांबला व परत त्याच्या आवडत्या स्वतःच्या विषयाकडे वळला. “आता मी म्हणत होतो, तसे जर तुम्हाला बाथशेबाचा उत्साह हवा असेल, तर तुम्हाला पुरातन रीतीरिवाजांमध्ये बुडून जायला पाहिजे. मी ते असे व्यक्त --- “

आता त्याच्या आवडत्या स्वतःच्या विषयात तो बोलत राहिला.

## चार

सर जॉर्ज सँडरफिल्डबरोबर पायरो मुलाखत ठरवू शकला पण तिची सुरवात काही फार खास अशी झाली नाही.

अँब्रोसे व्हँडेल त्याला काळा घोडा म्हणत असे, तो थोडासा आजारी होता. सर जॉर्ज राठ काळ्याभोर केसांचा व मासल मानेचा बुटका मनुष्य होता.

तो बोलला, “मिस्टर पायरो, मी तुमच्यासाठी काय करू? अरेच्चा, मला वाटते, आपण पूर्वी भेटलेलो नाही.”

“नाही आपण भेटलो नाही.”

“ठीक आहे. हे काय चालू आहे? मला खूप उत्सुकता आहे.”

“ओहो, हे फार साधे आहे --- फक्त माहितीची गोष्ट.”

दुसरा अवघड हसू हसला.

“मी तुम्हाला काही आतून मूर्ख असलेल्यांची नावे सांगू का? मला माहिती नव्हते की तुम्हाला पैशात रस आहे.”

“आधीच काही कमी प्रकरणे चालू नाहीत. हा एका विशिष्ट बाईचा प्रश्न आहे.”

“ओहो, एक बाई! सर जॉर्ज सँडरफिल्ड त्याच्या खुर्चीत मागे वाकून आराम करू लागला. तो सहजपणे बोलत होता.

पायरो म्हणाला, “मला वाटते कॅटरीना सामोशेनकाशी तुमची ओळख करून दिली गेली असेल.

सँडरफिल्ड हसला. “हो. जादूभरा प्राणी. तिने लंडन सोडले, हे दयनीय आहे.”

“तिने लंडन का सोडले?”

माझ्या प्रिय मित्रा, “मला माहिती नाही. मला वाटते, तू व्यवस्थापक मंडळींशी बोल. तुम्हाला माहिती असेल, ती मनस्वी आहे. रशियन लोक असेच असतात. मला खेद आहे, की मी तुला मदत करू शकत नाही. मला ती आता कुठे आहे हे अजिबात माहिती नाही. मी तिच्याशी काही संपर्क ठेवला नाही.”

तो उठून उभा राहिला, तेव्हा त्याच्या स्वरात तिच्या जाण्याचे दुःख दिसले.

पायरो म्हणाला, “पण मी जिच्याबद्दल माहिती मिळवायला उत्सुक आहे, ती सामोशेनका बाई नाही आहे.”

“ती नाही का?”

“नाही. मी तिच्या नोकराणीला शोधतो आहे.”

“तिच्या नोकराणीला? सँडरफिल्डने त्याच्याकडे रोखून पाहिले.

पायरो बोलला, “तुम्हाला कदाचित तिची नोकराणी आठवत असेल?”

परत सँडरफिल्ड अस्वस्थ झाला. तो लाजल्यासारखे करत म्हणाला,

“देवा रे, मला कसे काय माहिती असेल? अर्थात तिच्याकडे एक होती --- काहीशी वाईट असे मी म्हणेन. फुशारक्या मारणारी व नको तिथे नाक खुपसणारी अशी ती मुलगी होती. जर तुमच्या जागी मी असतो, तर अशा मुलीवर मी विश्वास ठेवला नसता. ती खोटारडी मुलगी आहे.”

पायरो पुटपुटला, “म्हणजे तुम्हाला तिच्याबद्दल बरीच माहिती दिसते?”

सँडरफिल्ड घाईने म्हणाला, “खरे तर हे आपले माझे मत आहे, एवढेच. ---- मला तिचे नावही आठवत नाही. बहुधा मेरी किंवा असेच काही --- नाही. मला वाटते, तिला शोधण्यासाठी मी तुम्हाला काही मदत करू शकणार नाही. मला माफ करा.”

पायरो हळूवारपणे बोलला,

“मला त्या भागातील थिएटरकडून तिचे नाव आधीच मिळालेले आहे --- आणि पत्तादेखील. पण सर जॉर्ज, मी म्हणतो आहे ती नोकराणी मेरीच्या पूर्वी मिस सामोशेनकाबरोबर होती. मी मिस व्हॅलेट्टाबद्दल बोलतो आहे.”

सँडरफिल्ड बघत राहिला. तो म्हणाला, “मला ती अजिबात आठवत नाही. लहानशी, डोळ्यात वाईट भाव असलेली, काळी मुलगी.”

पायरो म्हणाला, “मी म्हणतो आहे तो मुलगी मागील जूनमध्ये ग्रासलॉन येथील तुमच्या घरात होती.”

सँडरफिल्ड रागाने म्हणाला, “मी एवढेच म्हणू शकतो, की मला ती आठवत नाही. तिच्याबरोबर कुणी नोकराणी असल्याचे मला आठवत नाही. मला वाटते, तुम्ही काहीतरी चूक करत आहात.”

पायरोने त्याचे डोके हलवले. तो चूक करतो आहे, असे त्याला वाटत नव्हते.

## पाच

मेरी हेलीनने पटकन पायरोकडे छोट्या बुद्धिमान डोळ्यांनी पाहिले. आणि तितक्याच वेगाने परत दुसरीकडे नजर वळवली. ती

मऊ सुरात म्हणाली, "मिस्टर, पण मला पक्के आठवते. जूनच्या शेवटच्या आठवड्यात, मी सामोशेनका बाईंकडे कामाला होते. त्यांची आधीची नोकराणी घाईने निघून गेली होती."

"ती का सोडून गेली, त्याबद्दल तुला काही समजले का?"

"ती अचानक गेली, एवढेच मला समजले. काही आजार वगैरे असेल --- बाईसाहेब काही बोलल्या नाहीत."

पायरो बोलला, "तुला तुझ्या मालकीणीशी जमवून घ्यायला त्रास पडला?"

त्या मुलीने खांदे शहारवले. "तिची मनस्थिती बदलत असायची ती पाळीपाळीने हसे व शोक करे. कधीकधी ती फार आनंदी असे. नर्तकी बायका अशाच मनस्वी असतात."

"आणि सर जॉर्ज?"

मुलीने सजगपणे वर पाहिले. तिच्या डोळयात नकोशी चमक आली.

'ओहो, सर जॉर्ज सँडरफिल्ड? तुम्हाला त्यांच्याबद्दल जाणून घ्यायचे आहे का? खरे तर तुम्हाला हेच जाणून घ्यायचे असावे. दुसरा नुसता बहाणा होता? सर जॉर्ज, मी तुम्हाला त्यांच्याबद्दल काही वेगळयाच गोष्टी सांगू शकते. नक्कीच सांगू शकते."

पायरो मध्येच बोलला, "त्याची काही गरज नाही."

तिने त्याच्याकडे अवाक होऊन रोखून पाहिले. तिच्या डोळ्यात रागीट नाराजी दिसत होती.

## सहा

“मी नेहमी म्हणतो की अलेक्सीस पाव्हलोवीच, तुला सर्व काही ठाऊक असते.”

हर्क्युल पायरो फार स्तुती करायच्या आवाजात, हे पुटपुटला.

तो स्वतःशीच विचार करत होता, की त्याचे हर्क्युलसचे तिसरे साहस त्याच्यासाठी प्रवासाची व कल्पनेपेक्षा जास्त लोकांची मुलाखत घेण्याची गरज निर्माण करते आहे. हे एका नर्तकीच्या नोकराणीचे नाहीसे होण्याचे प्रकरण एक लांबलचक व फार अवघड समस्या ठरू लागली होती. प्रत्येक पुरावा तपासायला गेल्यावर त्यातून काही निष्पन्न होत नव्हते.

कलाविश्वात काय चालले आहे, हे आपल्याला माहिती आहे, असे गर्वाने सांगणारा पॅरीसमधील सॅमोव्हर हॉटेलचां मालक, उमराव अलेक्सीस पाव्हलोवीच याच्याकडे या संध्याकाळी पायरो आला होता.

खोट्या समाधानाचे हसू हसत, त्याने मान हलवली. “हो. हो. माझ्या मित्रा, मला माहिती आहे. मला नेहमीच माहिती असते ती

छोटीशी प्रसिद्ध नर्तकी, सामोशेनका कुठे गेली, हे तू मला विचारणार.” त्याने त्याच्या बोटांच्या टोकांचे चुंबन घेतले. “काय विस्तव --- काय दूर सारणे! ती कुठल्या कुठे गेली असेल. ती तिच्या काळातील अग्रगण्य नर्तिका होती --- आणि अचानक सर्व संपले. ती निघून गेली --- जगाच्या शेवटापर्यंत आणि लगेच, आहा! अगदी लगेच --- सर्वजण तिला विसरले.”

पायरोने विचारले, “त्यानंतर ती कुठे गेली?

“स्विझर्लंडमध्ये. व्हॅग्रे लेस आल्प्स इथे. ज्यांना थोडासा कोरडा खोकला आहे आणि जे बारीक बारीक होत चालले आहेत, ते तिथे जातात. ती मरेल, हो, ती मरेल. हे अटळ असल्याचा तिचा विश्वास आहे. ती नक्कीच मरेल.”

दुःखमय वातावरण मोडण्यासाठी पायरो खोकला. त्याला माहिती हवी होती. “तुला तिच्याकडे असलेली नोकराणी जराही आठवत नाही? तिचे नाव व्हॅलेट्टा होते?”

“व्हॅलेट्टा? व्हॅलेट्टा? मला तिला एकदा बघितल्याचे आठवले --- जेव्हा मी स्टेशनवर कॅटरीना लंडनला जात असताना तिचा निरोप घ्यायला गेलो होतो. ती पिसाची असून इटालियन होती, नाही का? हो माझी खात्री आहे, ती इटालियन होती आणि पिसाहून आली होती.”

हर्क्युल पायरोने एक सुस्कारा टाकला. तो म्हणाला, “असे असेल तर मला पिसाला गेले पाहिजे.”

## सात

हर्क्युल पायरो पिसामधील कँपो सांटो इथे उभा होता आणि स्मशानाकडे बघत होता.

म्हणजे इथे त्याचा शोध संपणार होता --- इथे या पृथ्वीच्या नम्र पृष्ठभागावर --- आतल्या आत कुण्या आनंदी प्राण्याने त्याचे मन ढवळून काढले. ही साध्या इंग्लिश कृतीची कल्पना होती. हा कदाचित विचित्र अद्भुतरम्यतेचा शेवट होता का? त्याने त्या मंतरलेल्या जूनच्या दुपारी पाहिले होते आणि त्या मुलीची आठवण त्याच्या सदैव स्मरणात रहाणार होती. विरुद्ध राष्ट्रीयत्वाचे ताण, वेगळ्या सामाजिक स्तरांचे ताण, आभास होण्याचे ताण हे सर्व नाहीसे होण्याची वेळ जवळ आली होती.

पायरोने त्याची मान दुःखाने हलवली. मागे व्हॅलेट्टाच्या कुटुंबाशी संभाषण झाले होते, तिथे त्याचे मन गेले. शेतकरीण आईचा मोठा चेहरा, दुःखमय असा उंचावलेला वडीलांचा चेहरा व गडद, कडक ओठांची बहीण.

“हे अचानक झाले, मिस्टर, फार अचानक झाले. जरी गेली काही वर्षे तिचे दुखणे मधूनमधून डोके वर काढे, तरी --- डॉक्टरने आम्हाला काही पर्याय दिला नव्हता. ते म्हणाले होते ॲपेंडीक्सची शस्त्रक्रिया ताबडतोब केली पाहिजे. ते तिला दवाखान्यात घेऊन गेले व तिथे --- सर --- स --- तिला भूल दिली आणि ती मेली. तिला शुद्ध कधीच आली नाही.”

आई सूं सूं करत होती. “जरी तिचे दुखणे मधूनमधून डोके वर काढे, तरी बिअन्का नेहमीच एक शहाणी मुलगी होती.ती इतक्या तरुणपणी मरावी, हे खूप क्लेशकारक होते --- “

पायरोने स्वतःशी परत म्हटले, “तरुणपणी मरावी --- ”

फार विश्वासाने गुप्त गोष्ट पायरोला सांगितलेल्या त्या तरुणासाठी हा निरोप होता. ‘ती तुझ्यासाठी नव्हती, माझ्या मित्रा, ती तरुणपणीच मेली.’

त्याचा शोध संपला --- इथे झुकणाऱ्या उंच मनोऱ्याच्या सावलीत आकाशाखाली फिकट पांढरी फुले आनंद व जीवनेच्छा दाखवत, उमलू लागली होती.

हा शेवटचा निर्णय बंडखोरपणे कबूल करायला बहरणारा वसंत ऋतु भाग पाडत होता का? की ते दुसरे काही होते? त्याच्या मेंदूमागे चाललेले काही शब्द --- म्हणी --- नावे? हा शेवट काही

चांगला झाला नाही. एकमेकात सहजपणे गुंतलेले, अटळ असे काही असावे का?

पायरोने सुस्कारा टाकला. सर्व शंका फेडण्यासाठी त्याला अजून एक प्रवास करावा लागणार होता. त्याला व्हॅग्रे लेस आल्प्स इथे जावे लागणार होते.

## आठ

त्याने विचार केला, इथे खरोखर जगाचा अंत झाला. हे बर्फाचे कडे --- विखुरलेल्या झोपड्या आणि प्रत्येक ठिकाणी सावकाशीने येणाऱ्या मृत्यूशी झुंज देत रहाणारी अचल माणसेच माणसे!

तर शेवटी तो कॅटरीना सामोशेनकाकडे आला. जेव्हा त्याने तिला ठळक लाल डाग असलेल्या खप्पड गालांनी झोपलेले पाहिले व तिचे बारीक, लांब आणि अशक्त हात पाहिले, त्याला काही आठवले. त्याला तिचे नाव आठवत नव्हते. पण त्याने तिचा नाच पाहिला होता --- आणि तो त्या कलेचा सुंदर आविष्कार पाहून, भान विसरून गेला होता.

त्याला मायकेल नोव्हगीन आठवत होता. अँब्रोसे व्हँडेलच्या डोक्याने निर्माण केलेल्या वाईट, धक्कादायक आणि असामान्य जंगलात तो शिकारी उड्या मारत होता, बागडत होता. त्याला

आठवत होते, त्या सोनेरी सुंदर प्राण्याच्या डोक्यावर शिंगे होती, चमकणारे ब्रॉंझचे पाय होते व मागचे पाय दिलखेचक रीत्या हवेत उडल्यासारखे वाटत होते. त्याला तिचा शेवटचा आचकाही आठवत होता. तिला गोळी लागून ती जखमी झाली होती. आणि मायकेल नोव्हगीन घाबरून, शिकार केलेल्या तिचे शरीर हातात घेऊन उभा होता.

कॅटरीना सामोशेनका त्याच्याकडे थोड्या कुतुहलाने पहात होती. ती म्हणाली, “मी तुला यापूर्वी कधीच पाहिले नाही, नाही का? तुझे माझ्याकडे काय काम आहे?”

पायरो तिच्यापुढे थोडा वाकला. “बाईसाहेब, पहिल्यांदा मी तुमचे आभार मानतो. तुमच्या कलाविष्काराने, माझी संध्याकाळ सुंदर झाली.”

ती क्षीणपणे हसली.

“पण बाईसाहेब, आता मी इथे कामासाठी आलो आहे. मी बराच काळ तुमच्या एका नोकराणीला शोधत होतो --- तिचे नाव नीता होते.”

“नीता?”

तिने त्याच्याकडे रोखून बघितले. तिचे डोळे धक्का बसल्यासारखे मोठे होते. ती बोलली, “तुम्हाला नीताबद्दल काय माहिती आहे?”

“मी तुम्हाला सांगेन.”

त्याची गाडी बंद पडली व तो तिथे बोटांनी त्याची टोपी फिरवत असलेल्या टेड विलीअमसनला भेटला. त्याने कसे चाचरत त्याचे प्रेम आणि दुःख व्यक्त केले. तिने हे लक्ष देऊन ऐकले.

त्याचे सांगून झाल्यावर ती बोलली, “हे हृदयस्पर्शी आहे. फारच हृदयस्पर्शी आहे --- “

पायरोने मान हलवली. तो म्हणाला, “हो. ही ग्रीसमधील आर्केडीयाची गोष्ट आहे, नाही का? तुम्ही मला या मुलीबद्दल काय सांगू शकता?”

कॅटरीना सामोशेनकाने एक सुस्कारा टाकला.

“माझ्याकडे एक नोकराणी होती --- ज्युआनीता. ती छान होती, हो --- मोकळ्या मनाची होती. अशा देवाच्या आवडत्या लोकांचे होते, तेच तिचे झाले. ती तरुण असतानाच वारली.”

ते पायरोचे शब्द होते --- अंतिम शब्द --- बदलता न येणारे शब्द --- आता त्याने ते परत म्हटले --- आणि तरीही तो आग्रह करत होता. त्याने विचारले, “ती वारली का?”

“हो. ती वारली.”

पायरो मिनिटभर स्तब्ध राहिला व मग बोलला, “मला एक गोष्ट कळत नाही. मी जॉर्ज सँडरफिल्डला तुमच्या या नोकराणीबद्दल विचारले आणि तो घाबरलेला वाटला. ते का बरे?”

त्या नर्तकीच्या चेहऱ्यावर वीट आल्याचे पुसट भाव होते.

“तुम्ही आताच माझ्या नोकराणीचा उल्लेख केलात. मला वाटले, तुम्ही मेरी म्हणत आहात. ज्युआनीता गेल्यावर ती आली. मला वाटते तिने त्याच्याविषयी काही शोधून काढले व त्याला ब्लॅकमेल करायचा प्रयत्न केला. ती फार वाईट मुलगी होती --- चौकस, नेहमी दुसऱ्यांचे खण व पत्रे उघडणारी!”

पायरो पुटपुटला, “मग ते स्पष्ट झाले.”

तो एक मिनिट थांबून परत बोलू लागला, “ज्युआनीताचे दुसरे नाव व्हॅलेट्टा असून ती ॲपेंडीक्सच्या शस्त्रक्रियेदरम्यान पिसा येथे वारली. बरोबर?”

नर्तकीने तिचे डोके लवविले. त्यापूर्वी तिने थोडेसे कुणाच्या लक्षात येणार नाही इतपत कां कू केले पण पायरोच्या चाणाक्ष नजरेतून ते सुटले नाही. “हो. ते बरोबर आहे --- “

पायरो ध्यानस्थपणे म्हणाला, "आणि तरीही एक लहानसा मुद्दा आहे --- तिचे लोक तिच्याविषयी बोलले. पण ज्युआनीता म्हणून नव्हे तर बिअन्का म्हणून बोलले."

कॅटरीनाने तिचे बारीक खांदे शहारवले. ती म्हणाली, "बिअन्का --- ज्युआनीता, त्याने काय फरक पडतो? मला वाटते तिचे खरे नाव "बिअन्का होते पण तिला वाटले असावे की ज्युआनीता हे नाव जास्त अद्भुतरम्य आहे त्यामुळे तिने स्वतःला लोकांनी त्या नावाने हाक मारावी असे ठरवले."

तो थांबून, आवाज बदलून म्हणाला, "ओहो, तुम्ही असा विचार करता का? माझे वेगळे स्पष्टीकरण आहे."

"ते काय आहे?'

"टेड विलीअमसनने बघितलेल्या मुलीचे केस सोनेरी पंखांसारखे असल्याचे तो म्हणाला."

तो अजून पुढे वाकला व त्याचे बोट त्याने कॅटरीनाच्या उसळणाऱ्या केसांच्या दोन लाटांसारख्या बटांना लावले.

"सोनेरी पंख, सोनेरी शिंगे? ते तुम्ही बघाल तसे दिसते. जसे कुणाला तुम्ही राक्षसासारख्या दिसता, तर कुणाला देवदूतीसारख्या! तुम्ही कोणीही एक असाल. किंवा ती घाबरलेल्या हरिणीची फक्त सोनेरी शिंगे असतील का?"

कॅटरीना पुटपुटली, “घाबरलेली हरिणी --- “ तिचा सूर निराशेचा होता.

पायरो बोलला,

““टेड विलीअमसनच्या सगळया वर्णनाने मला चटका लावला --- त्याने माझ्या मनात असे आले --- तुमच्या चमचमत्या ब्रॉंझच्या पायांनी जंगलातून नाचणाऱ्या ते काहीतरी तुम्ही होतात. बाईसाहेब, मला काय वाटले, ते सांगू का? मला वाटले, की तुमच्याकडे आठवडाभर नोकराणी नव्हती. तेव्हा तुम्ही एकट्याच ग्रासलँडला गेलात. कारण “बिअन्का व्हॅलेट्टा इटालीला परतली होती आणि तुम्हाला अजून नवीन नोकराणी मिळाली नव्हती. तेव्हापासून तुम्हाला झालेला आजार डोके वर काढत होता. त्यामुळे एक दिवस इतर सगळेजण नदीवर गेले, तेव्हा तुम्ही घरीच राहिलात. दार वाजले आणि तुम्ही बघायला उठलात --- तुम्ही काय पाहिलेत, ते मी सांगू का? तुम्ही मुलासारखा साधा व देवासारखा देखणा असा एक तरुण मनुष्य पाहिलात. आणि तुम्ही त्याच्यासाठी एक मुलगी बोलावलीत --- ज्युआनीता नव्हे --- पण कुणी वेषांतर केलेली, अनोळखी --- आणि काही तास तुम्ही त्याच्याबरोबर आर्केडीयामध्ये हिंडलात --- “

तिथे खूप वेळ सन्नाटा पसरला. नंतर कॅटरीनाने खालच्या घोगऱ्या आवाजात म्हटले, “एका बाबतीत तरी मी तुमच्याशी खरे बोलले. मी तुम्हाला गोष्टीचा योग्य शेवट दिला. नीता तरूण असतानाच मरणार.”

हर्क्युल पायरो बदलला. त्याने टेबलावर हात ठेवला. तो अचानक “ओहो, नाही.” तो गद्यात, रुक्षपणे व रुचीहीनतेने म्हणाला, “ते गरजेचे नाही. तुम्ही मरायची गरज नाही. तुम्ही आयुष्यासाठी झगडा. तुम्ही किंवा इतर कोणी, ते करू शकत नाही का?”

तिने निराशेने, दुःखाने तिचे डोके हलवले --- “माझ्यासाठी काय आयुष्य उरले आहे?

“रंगमंचावरचे आयुष्य नाही हे समजले. पण विचार करा. अजून दुसरे आयुष्य आहे. बाईसाहेब आता प्रामाणिकपणे सांगा, तुमचे वडील खरोखर राजा, राजपुत्र किंवा सैन्यप्रमुख होते का?”

ती अचानक हसली आही बोलली, “ते लेनिनग्राडमध्ये लॉरी चालवत असत!”

“छान! आणि तुम्ही गावाकडील गॅरेजमध्ये काम करणाऱ्याशी लग्न का केले नाही? आणि देवासारखी सुंदर व तुमच्यासारखी पायात नृत्यकला असणारी मुले जन्माला का घातली नाहीत?

कॅटरीनाने तिचा श्वास रोधून धरला.

“पण ही सर्व कल्पना अफलातून आहे!”

पायरो स्वसमाधानाने म्हणाला, “तथापि माझा विश्वास आहे, की हे खरे होणार आहे.”

# THE ERYMANTHIAN BOAR
# इरायमँथियन डुक्कर



***[ग्रीसमधील दक्षिणेकडील पर्वतरांगांमधील सर्वोच्च शिखर म्हणजे इरायमँथियन शिखर होय.]***

## एक

हर्क्युलसच्या चौथ्या साहसाची पूर्तता करण्यासाठी हर्क्युल पायरो स्विझर्लंडला आला होता. तिथे असल्याचा फायदा घेऊन

पायरो त्याला माहिती नसलेल्या काही ठिकाणांना भेटी द्यायचे ठरवत होता.

त्याने काही दिवस चॅमोनिक्समध्ये घालवले. एक दोन दिवस मॉन्ट्रेक्स मध्ये रेंगाळला आणि मग अनेक मित्रांनी खूप वाखाणलेल्या अँडेरमॅटला गेला.

पण अँडेरमॅटला त्याला फार त्रास झाला. ते एका दरीच्या कडेला, बर्फाळ शिखरांच्या डोंगररांगांमध्ये होते. त्याला प्रचंड थंडीमुळे तिथे श्वास घ्यायला त्रास होत होता.

हर्क्युल पायरो स्वतःशी बोलला, “इथे रहाणे अशक्य आहे. त्याच वेळेस त्याला लोखंडी दोरीच्या सहाय्याने बनवलेली केबल रेल्वे दिसली. “यातून जाणे नक्कीच ठीक राहील.”

त्या मार्गात पहिले स्टेशन लेस अव्हीन्स होते. मग कैरोचेट आणि शेवटचे, समुद्रसपाटीपासून दहा हजार फूट उंच असलेले, रॉचर्स नेग्ज होते.

पायरोने एवढ्या उंचावर जायचा विचार केलेला नव्हता. लेस अव्हीन्सपर्यंत जाणे त्याच्यासाठी ठीक राहील, असा विचार त्याने केला.

पण हे जाणे, त्याच्या आयुष्याचा मोठा भाग बनून राहील, असा विचार त्याने कधीच केला नव्हता. ती केबल गाडी सुरु झाली

तेव्हा तिकीट तपासनीसाने पायरोला त्याचे तिकीट मागितले. ते तपासून, त्याला भीतीदायक चिमट्याने भोक पाडून, वाकून, परत दिले. त्याच वेळेस त्याने पायरोच्या हातात एक कागदाचा कपटा सरकवला.

पायरोच्या भुवया वर गेल्या. त्याने घाई न करता, साधेपणे तो कपटा सरळ केला. ती घाईघाईने, पेन्सिलीने लिहिलेली चिठ्ठी होती. ती अशी होतीः

या मिशा ओळखण्यात चूक करणे शक्य नाही. माझ्या मित्रा, मी तुला सलाम करतो. जर तुझी इच्छा असेल, तर मला तुझी खूप मदत होईल. तू नक्कीच सॅलीच्या भानगडीबद्दल वाचले असशील. खुनी --- मारासॉड --- हा त्याच्या टोळीच्या साथीदारांबरोबर --- जगातील सर्व ठिकाणे सोडून ---रॉचर्स नेग्ज इथे, सभा घेणार असल्याचे वृत्त आहे. अर्थात हे खोटेही असू शकेल --- पण आमची माहिती विश्वासार्ह आहे --- नेहमी कोणीतरी रडणारे असतेच, नाही का? त्यामुळे माझ्या मित्रा, तू दक्ष रहा. त्या ठिकाणी असलेल्या इन्स्पेक्टर ड्राउटच्या संपर्कात रहा. तो चांगला माणूस आहे. पण हर्क्युल पायरोच्या तोडीचे चातुर्य त्याच्याकडे असल्याचे ढोंग तो करू शकणार नाही. माझ्या मित्रा, हे महत्वाचे आहे, मारासॉडला जिवंत पकडणे गरजेचे आहे. तो मनुष्य नाही --- तो

जंगली डुक्कंर आहे आजमितीस जिवंत असलेला सर्वात धोकादायक खुनी आहे. मी अँडेरमॅटला तुझ्याशी बोलायचा धोका घेऊ शकत नाही. कारण आपल्याला कुणी बघेल आणि तुला या मोहिमेत भाग न घेता फक्त प्रवासी म्हणून फिरायचे असेल, तरी तुला तशी मोकळीक राहील.

तुझा जुना मित्र,

लेमेनटेउल

पायरोने विचारपूर्वक त्याच्या मिशा कुरवाळल्या. हो, खरेच, त्याच्या मिशांच्या बाबतीत चूक होणे शक्य नव्हते. आता हे काय नवीन आव्हान पुढे उभे ठाकले? त्याने वर्तमानपत्रात सॅलीच्या भानगडीबद्दल वाचले होते --- थंड रक्ताने एका प्रसिद्ध पारशी पुस्तकाच्या दुकानदाराचा खून केलेला सॅली! पोलिसांना खुन्याची ओळख होती. मारासॉड हा रेसकोर्स टोळीचा सभासद होता. इतर अनेक हत्या त्याने केलेल्या होत्या. पण यावेळेस, त्याचा गुन्हा पूर्णपणे ओळखला गेला होता. तो बहुधा फ्रान्सबाहेर गेला होता. युरोपमधील प्रत्येक देशातील पोलीस त्याच्या शोधात होते.

तर अशा तऱ्हेने मारासॉड रॉचर्स नेग्ज इथे, सभा घेणार असल्याचे वृत्त होते ---

हर्क्युल पायरोने त्याचे डोके सावकाश हलवले. तो गोंधळला होता. कारण रॉचर्स नेग्ज इथे वर्षभर बर्फ असे. तिथे एक हॉटेल होते. पण दरीवरील अरुंद सपाट जागी रेल्वेची केबल गाडी उभी रहात असे त्यामार्फतच फक्त जगाशी त्या हॉटेलचा संपर्क होई. जूनमध्ये ते हॉटेल उघडे. पण जुलै ऑगस्टपर्यंत कोणी तिथे येत नसे. त्याचे आत शिरायचे वा बाहेर पडायचे दरवाजे अडचणीचे होते. जर माणूस तिथे फसला तर पिंजऱ्यात अडकल्यासारखी त्याचे अवस्था होई. गुन्हेगारांच्या सभेसाठी असली जागा शोधणे, हे नावीन्यपूर्ण होते.

आणि तरी लेमेनटेउल म्हणाला त्याप्रमाणे, त्याची माहिती विश्वासार्ह असू शकेल. हर्क्युल पायरोला स्विस पोलीस कमिशनरबद्दल आदर होता. तो त्याच्यावर अवलंबून रहावे, असा चांगला होता.

कुठल्या कारणाने मारासॉडने त्याची सभा अशी संस्कृतीपासून दूर ठेवली होती, कोण जाणे!

पायरोने एक सुस्कारा टाकला. त्याच्या सुट्टीच्या कार्यक्रमात एखाद्या दुष्ट गुन्हेगाराला शोधणे बसत नव्हते. आरामखुर्चीत बसून विचार करणे त्याला जास्त पसंत होते. डोंगरदऱ्यातून रानटी डुक्कराला शोधणे म्हणजे स्वतःला सापळयात अडकवून घेणे होते.

रानटी डुक्कर --- हा लेमेनटेउलने वापरलेला शब्द होता. हा जरा विचित्र प्रसंग होता ---

तो स्वतःशी पुटपुटला, “हर्क्युलसचे चौथे साहस. इरायमँथियन डुक्कर?”

शांतपणे, जादापणाचा आव न आणता, त्याने त्याच्या सहप्रवाश्यांकडे पाहिले.

त्याच्या समोरील जागेवर एक अमेरिकन प्रवासी बसला होता. त्याच्या कपड्यांवरून आणि एकंदर बाह्याकृतीवरून, तो मैत्रीपूर्ण वाटत होता. बाहेरील निसर्गसौदर्यात गुंग झालेला तो नवखा व साधासुधा वाटत होता. त्याच्या हातातील प्रवासाच्या मार्गदर्शक पुस्तकावरून, तो लहान गावातून युरोपमध्ये पहिल्यांदाच आलेला अमेरिकन दिसत होता. पुढील एकदोन मिनिटात पायरोने त्याच्याशी बोलायचे ठरवले. त्याचे निरर्थक तरसल्यासारखे हावभाव काही चुकीचा अर्थ लाऊ शकत नव्हते.

डब्याच्या दुसऱ्या बाजूला एक उंच व वेगळाच दिसणारा, करड्या केसांचा व वाकड्या नाकाचा माणूस जर्मन पुस्तक वाचत बसला होता. त्याची चपळ बोटे एखाद्या सर्जनसारखी किंवा संगीतकारासारखी होती.

अजून पुढे तशाच प्रकारची तीन माणसे बसली होती. त्यांचे पाय वाकलेले होते आणि ते घोड्यांच्या शर्यतीशी संबंधित असल्याचे काही अवर्णनीय अशा पद्धतीने सुचवत होते. ते पत्ते खेळत होते. कदाचित आता ते एका परक्या इसमाला खेळायला बोलावत होते. पहिल्यांदा तो पाहुणा जिंकत गेला. पण नंतर त्याचे नशीब फिरले.

त्या तीन माणसात वेगळे काही दिसत नव्हते. फक्त ते बसलेली जागा जरा वेगळी होती.

एखाद्याने त्यांना सभेसाठी जाताना कुठल्याही गाडीत पाहिले असते. पण रिकाम्या केबल गाडीने जाणे --- नाही!

गाडीत एक बाई होती. ती उंच व काळी व सुंदर भावनामय चेहऱ्याची होती. पण ती विचित्रपणे गोठून काहीच भाव दर्शवत नव्हती. ती कुणाकडे बघत नव्हती. खालील बाजूस असणाऱ्या दरीकडे ती रोखून बघत होती.

पायरोने अपेक्षा केल्याप्रमाणे, आता तो त्या अमेरीकनाशी बोलू लागला. त्याचे नाव श्च्वार्टत्झ असल्याचे तो म्हणाला. त्याची ही पहिली युरोप सहल होती. सृष्टीसौदर्य फार छान असल्याचे तो म्हणाला. चिलॉनचा किल्ला त्याला खूप आवडल्याचे तो म्हणाला. त्याला पॅरीस हे शहर फारसे आवडले

नाही. अती स्तुती केले गेलेले! तो फॉलीज बर्गर्स, लूव्ह व नोट्रे डॅम इथे गेला --- पण यापैकी कुठेच हॉट जाझ हा संगीताचा प्रकार बरोबर वाजवला जात नसल्याचे तो बोलला. चॅम्प लायसिज त्याला चांगले वाटले. तेथील उसळणारी दिवे लागलेली कारंजी त्याला विशेष आवडली. कैरोचेटला किंवा लेस अव्हीन्सला कोणीच उतरले नाही. सर्वांना त्या केबल गाडीने रॉचर्स नेग्ज इथेच उतरायचे असावे.

मिस्टर श्च्वार्टत्झने त्याचे कारण सांगितले. त्याला नेहमी सर्वात उंच बर्फाच्या डोंगरात जायची इच्छा होती. दहा हजार फूट म्हणजे चांगलेच उंच होते. इतक्या उंचीवर तुम्हाला साधे अंडेही नीट उकडता येत नाही, असे त्याने ऐकले होते.

त्याच्या निरागस मित्रत्वाच्या हृदयाने त्याने डब्याच्या दुसऱ्या टोकाला बसलेल्या उंच करड्या केसांच्या माणसालाही संभाषणात ओढले. पण तो माणूस थंडपणे त्याच्या नाकावर क्लिप असलेल्या चष्म्यातून फक्त बघत राहिला व परत त्याचे पुस्तक वाचू लागला.

नंतर मिस्टर श्च्वार्टत्झने काळ्या बाईबरोबर जागा बदलली. असे केल्याने, तिला जास्त चांगले दृष्य दिसत असल्याचे तो म्हणाला.

तिला इंग्लिश कळत होते की नाही कुणास ठाऊक! तसेही तिने फक्त तिचे डोके हलवले व तिच्या कोटाच्या कॉलरमध्ये ती अजून बुडाली.

मिस्टर श्च्वार्टत्झ पायरोजवळ पुटपुटले,

“तिच्याकडे बघणारे कोणी नसतांना एकट्या बाईने प्रवास करणे, थोडे चुकीचे वाटते, नाही का? प्रवास करणाऱ्या बाईकडे लक्ष देणारे कुणीतरी हवे.”

वेगवेगळया खंडात भेटलेल्या काही अमेरिकन स्त्रियांना आठवून पायरोने मान्य केले.

मिस्टर श्च्वार्टत्झ यांनी सुस्कारा टाकला. त्याना जग शत्रूसारखे भासले. आणि त्यांचे तपकिरी डोळे नक्कीच बोलले, की सगळीकडे थोडे मित्रत्व दाखवण्यास, काही हरकत नसावी.

## दोन

जगापासून इतक्या एकाकी, जगाबाहेर किंवा जगाच्या वर ते हॉटेल होते. विशेष प्रकारचा कोट व चामड्याचे बूट घातलेल्या हॉटेलच्या व्यवस्थापकाने, आमचे स्वागत केले. तो एक चालीरीती पाळणारा, नम्र व देखणा, मोठा माणूस होता.

“या ऋतुमध्ये इतक्या लवकर --- गरम पाण्याची व्यवस्था कोलमडलेली होती --- सर्व गोष्टी जरा विस्कटलेल्याच होत्या. पण तो त्याला करता येईल तेवढी खटपट करत होता हॉटेलमध्ये अजून पुरेसे नोकरही नव्हते. अचानक एवढे पाहुणे आलेले पाहून तो गडबडून गेला.

पायरोला असे वाटले, की ही व्यावसायिकता पुढे आली. पण या शहरी पुढच्या बाजूमागे काही उदास करणारे चिंतेचे सावट आहे. हा माणूस त्याच्या सर्व सहजपणामागे कसले तरी दुःख लपवून आहे.

लांबवर खोल दरी दिसणाऱ्या मोठ्या खोलीत जेवण देण्यात आले. गुस्ताव्ह नावाचा एकाकी नोकर कसबी व हुशार होता. तो इकडेतिकडे धावून काय पदार्थ घ्यावेत याचा सल्ला देत होता व त्याच्याकडे असलेल्या मद्यांची नावे सांगत होता. एका टेबलावर घोड्यांच्या शर्यतीचे तीन प्रेमी बसले होते. ते फ्रेंचमध्ये बोलून हसत होते. त्यांचे आवाज वाढत होते.

चांगला जोसेफ! छोट्या डेनिसचे काय? माझ्या मित्रा, तुला तो ऑटेउलचा आपल्याला पाडणारा जुना डुक्कर छाप घोडा आठवतो का?”

ते सर्व हृदयद्रावकपणे विसंगत --- कुठेही --- पण मजेत चाललेले होते.

सुंदर चेहरा असलेली बाई एकटीच कोपऱ्यातील टेबलावर बसली होती. ती कुणाकडेही बघत नव्हती.

नंतर पायरो जेव्हा बाहेर मोकळ्यावर बसला होता, तेव्हा व्यवस्थापक आला व काही खासगी बोलू लागला.

"तुम्ही हॉटेलचे परीक्षण फार कडकपणे करू नका. आता आमचा नेहमीचा हंगाम नाही. इथे जुलैच्या शेवटापर्यंत कोणीच येत नाही. आपण त्या बाईला कदाचित पाहिले असेल. ती नेहमी याच वेळेस येते. इथे चढतांना तिचा नवरा तीन वर्षांपूर्वी मेला. ते दोघे खूप धार्मिक प्रवृत्तीचे होते. ते एका धार्मिक यात्रेला आले होते. तो पलीकडे बसलेला वयाने मोठा माणूस व्हिएन्नाचा प्रसिद्ध डॉक्टर, कार्ल लुट्झ होता. तो म्हणाला होता, की तो इथे शांततेसाठी व विश्रांतीसाठी आलेला आहे.

पायरोने कबूल केले, "हो, इथे खरेच शांती आहे. आणि ते तिथे बसलेले तिघे?" त्याने त्या तिघांकडे निर्देश करून विचारले. "तुम्हाला काय वाटते, ते देखील शांतीसाठी आले आहेत?"

व्यवस्थापकाने त्याचे खांदे शहारवले. त्याच्या डोळ्यात दुःखी भाव प्रगटला. तो निरर्थकपणे बोलला,

"ओहो, ते प्रवासी आहेत. त्यांना नेहमी नवनवीन अनुभव हवे असतात --- येथील उंची ही एकमेव भावना इथे आहे."

पायरोने विचार केला, ही काही फार सुखद भावना नाही. तो त्याच्या जोरात धडधडणाऱ्या हृदयाबद्दल जागरूक होता. बालवर्गातील कविता सहजपणे त्याच्या ओठांवर आली.

***उंच उंच आकाशात***

***ताऱ्यांच्या प्रकाशात***

श्चवार्टत्झ बाहेर आला. पायरोला बघून त्याचे डोळे चकाकले. तो लगेच त्याच्याकडे आला.

मी त्या डॉक्टरशी बोलत होतो. तो आधुनिक असल्याचा आव आणत इंग्लिश बोलतो. तो ज्यू आहे --- नाझींनी त्याला ऑस्ट्रीयाबाहेर काढले. मला वाटते ते लोक जरा चक्रम आहेत. हा डॉक्टर लुझ चांगला मोठा माणूस आहे. मला वाटते, नसांचा विशेषज्ञ --- मानसोपचारतज्ञ ---तसल्या काही प्रकारचा."

ती बाई खिडकीतून बाहेर गर्वात उभ्या असलेल्या डोंगरशिखरांकडे बघत होती, तिच्याकडे त्याचे लक्ष गेले. तो खालच्या आवाजात बोलला,

"मला वेटरकडून तिचे नाव कळले. ते ग्रँडीयर आहे. तिचा नवरा इथे चढतांना मेला. म्हणून ती इथे येते. भावनामय होऊन तो

बोलला, “आपल्याला याबद्दल काहीतरी करायला पाहिजे --- तिला फिरायला घेऊन जाण्याचा प्रयत्न करायला पाहिजे, नाही का?”

हर्क्युल पायरो म्हणाला,

“जर मी तुझ्या जागी असतो, तर मी असा प्रयत्न केला नसता.”

पण मिस्टर श्चवार्टत्झ यांचा मनमिळाऊपणा मागे हटणारा नव्हता.

पायरोने त्याला तिच्याबरोबर ओळख वाढवतांना पाहिले. मग ते फारशी खंत न बाळगता, एकमेकांपासून कसे दूर गेले, ते देखील पाहिले. ती बाई श्चवार्टत्झपेक्षा उंच होती. तिचे डोके मागे झुकलेले होते आणि तिचे हावभाव थंड आणि मनाई करणारे होते.

ती काय म्हणाली, ते त्याने ऐकले नाही पण श्चवार्टत्झ दुःखी होऊन परत आला.

तो शहाणपणे बोलला, “काही खरे नाही. मला समजले की आपण सगळी माणसे एकत्र असलो, तरी आपण एकमेकांबरोबर सलोख्याचे संबंध प्रस्थापित करायला पाहिजेतच, असे नाही. तुम्हाला पटते आहे का? मिस्टर पायरो, तुम्हाला माहिती आहे का, की मला तुमचे पहिले नाव माहिती नाही?”

पायरो म्हणाला, “माझे नाव पोरीयर असून मी लयॉनचा रेशीम व्यापारी आहे.”

.”मी तुम्हाला माझे कार्ड देतो. मिस्टर पोरीयर, जर तुम्ही कधी फाऊन्टन स्प्रिंगला आलात, तर नक्की तुमचे स्वागत होईल.”

पायरोने कार्ड घेतले व खिशात ठेवले. तो पुटपुटला,

“अरेरे, माझ्याकडे माझे कार्ड आता नाही आहे --- “

त्या रात्री जेव्हा तो झोपायला गेला, तेव्हा पायरोने, लेमेनटेउलचे पत्र, नीट घडी करून पाकिटात ठेवण्यापूर्वी, काळजीपूर्वक वाचले. अंथरुणावर पडल्या पडल्या तो स्वतःशी बोलला,

‘हे विचित्र आहे --- मला नवल वाटते जर --- “

## तीन

त्या गुस्ताव्ह नावाच्या वेटरने पायरोसाठी न्याहारी व कॉफी आणली. तो कॉफीबद्दल माफी मागत होता.

“मिस्टर इतक्या उंचीला कॉफी गरम ठेवणे मुश्कील आहे. तुम्ही समजू शकाल. ती वाईट रीतीने लवकर निवते.”

पायरो पुटपुटला, “निसर्गाच्या अशा लहरी आपण सांभाळून घ्यायला हव्यात.”

गुस्ताव्ह पुटपुटला, “महाशय, आपण तत्वज्ञ आहात.”

तो दाराशी गेला, पण खोली सोडण्याऐवजी, त्याने बाहेत एक नजर टाकली. मग दार लाऊन तो पलंगाच्या कडेला आला. तो म्हणाला,

“मिस्टर हर्क्युल पायरो, मी पोलीस इन्स्पेक्टर, ड्रोउट आहे.”

पायरो उद्गारला, “ओहो, मला आधीपासून संशय येत होता.”

ड्रोउटने त्याचा आवाज खाली आणत म्हटले,

“मिस्टर पायरो, एक फार विचित्र गोष्ट घडली आहे. केबल गाडीला अपघात झाला आहे.”

पायरो उठून बसत म्हणाला, “अपघात? कुठल्या प्रकारचा अपघात?”

“कोणी जखमी झाले नाही. तो रात्री झाला. तो कदाचित नैसर्गिक कारणाने झाला असावा --- एक लहानशा बर्फाच्या वादळामुळे खडक खाली घसरले. पण माणसांची फौज कामासाठी तयार होती. एखाद्याला माहिती नसेल. परिणामस्वरूप, आता दुरुस्तीला बरेच दिवस लागतील. मधल्या काळात आपण इथे जगापासून अलग पडलो आहोत. हंगामाच्या इतक्या लवकर खरे

तर बर्फ घट्ट असतो. आता आपल्याला खालील गावाशी संपर्क साधणे अशक्य आहे.”

पायरो उठून बसत बोलला, “हे फार रुचीपूर्ण आहे.”

इन्स्पेक्टरने मान हलवली. तो म्हणाला, “म्हणजे आपल्या कमिशनरची माहिती बरोबर होती. तुम्हाला माहिती आहे का, इथे मारासॉडची सभा आहे. त्याने खात्री केली आहे, की त्यात काही व्यत्यय येणार नाही.”

पायरो अधीरपणे ओरडला, “पण हे छान झाले आहे.”

इन्स्पेक्टर ड्रोउटने त्याचे हात हवेत उडवले. तो म्हणाला, “मला कबूल केले पाहिजे, यात काही अर्थ नाही. पण खरे तर आहे. तुम्हाला माहिती आहे, हा मारासॉड एककल्ली मनुष्य आहे. मला वाटते, तो वेडा आहे.”

पायरो म्हणाला, “वेडा माणूस आणि खुनी!”

ड्रोउट बोलला, “मी काही करमणूक करत नाही आहे. पण तसे आहे खरे!”

पायरो सावकाशीने बोलला, “पण जर त्याची सभा इथे, बर्फामध्ये जगाच्या सर्वात वर असेल, तर असे असले पाहिजे की मारासॉड इथे आधीच आलेला असेल. कारण आता तर संवाद साधला जाऊ शकत नाही.”

ड्रोउट शांतपणे बोलला, “मला माहिती आहे.”

दोघेजण एक मिनिट शांत राहिले. मग पायरोने विचारले, “डॉ लुट्झ? तो मारासॉड असेल का?”

ड्रोउटने मान हलवली.

“मला तसे वाटत नाही. डॉ लुट्झ खरा आहे --- मी वर्तमानपत्रात त्याचे फोटो पाहिले आहेत --- प्रसिद्ध आणि चांगल्या कीर्तीचा माणूस! या फोटोंशी त्याचे साम्य दिसते.”

पायरो पुटपुटला, “जर मारासॉड वेषांतर केलेला कलाकार असेल, तर तो त्याचे सोंग उत्तम वठवू शकेल.”

“हो, पण तो? मी तो वेषांतर करण्याबद्दल प्रसिद्ध असल्याचे कधी ऐकले नाही. त्याच्याकडे सापाच्या लबाडीची हुशारी नाही. तो भयानक रानटी डुक्कर आहे. तो रागाने वेडापिसा होतो.”

पायरो म्हणाला, “तेच ते --- “

ड्रोउटने लगेच कबूल केले.

“हो. हो. तो लपूनछपून वावरतो. त्यामुळे त्याला वेषांतर करणे भाग आहे. त्यामुळे तो कदाचित --- खरे तर नक्कीच --- वेषांतर करून असणार.”

“तुमच्याकडे त्याचे वर्णन आहे?”

दुसऱ्याने खांदे शहारवले.

“अंदाजे आहे. आज मला त्याचा हुबेहूब फोटो व मापे मिळणार होती. आता मला एवढेच माहिती आहे, की तो साधारण तिशीचा, मध्यम उंचीचा काळा माणूस आहे. जन्मखुणा वगैरे काही माहिती नाहीत.”

पायरोने त्याचे खांदे शहारवले.

“हे तर कुणाचेही वर्णन असू शकेल. तो अमेरिकन श्चवार्टत्झ, त्याचे काय?”

“मो तुम्हाला तेच विचारणार होतो. तुम्ही त्याच्याबरोबर बोलला आहात. आणि तुम्ही स्वतः इंग्लिश असून, अमेरिकन लोकांबरोबर राहिलेले आहात. त्याच्याकडे साध्या पद्धतीने पाहिले, तर तर तो सामान्य अमेरिकन प्रवासी वाटतो. त्याचा पासपोर्ट ठीक आहे. हे कदाचित विचित्र आहे, की त्याने फिरण्यासाठी या जागेची निवड करावी --- पण प्रवासाच्या बाबतीत अमेरिकन्स विचित्र असतात. तुम्हाला काय वाटते?

पायरोने गोंधळून त्याची मान हलवली. तो म्हणाला,

“वरवर पहाता तो निरुपद्रवी व जरा जास्त मित्रत्वाचा आव आणणारा वाटतो. तो कदाचित कंटाळवाणा असू शकेल, पण धोकादायक नाही. पण इथे अजून तीन पाहुणे आहेत.”

इनस्पेक्टरने मान हलवली. अचानक तो उत्सुक झाला.

“आपण ज्यांना शोधतो आहेत, तसे ते दिसतात. मी शपथेवर सांगतो. मिस्टर पायरो, काही झाले तरी ते तिघे मारासॉडची माणसे आहेत. त्यांच्याकडे बघितल्यावर ते रेसकोर्सवरील टग्या लोकांसारखे दिसतात. आणि या तिघांपैकी एकजण खुद्द मारासॉड असू शकेल.”

पायरो विचार करून त्या तिघांचे चेहरे आठवू लागला.

एक चेहरा रुंद होता. त्याच्या भुवया ओघळलेल्या असून गाल गोबरे होते. लोभी पशूसारखा त्याचा चेहरा होता. एकजण बारीक व मवाळ होता. त्याचा चेहरा तीक्ष्णपणे अरुंद असून डोळे मलूल होते. तिसरा बेकरीमधील आत सारण भरलेल्या चपट्या पदार्थांसारख्या चेहऱ्याचा असून थोडा नखरेल होता.

हो. तिघांपैकी एक मारासॉड असू शकत होता. पण तसे असेल, तर एक प्रश्न नक्कीच उठत होता, की का? मारासॉड आणि त्याच्या टोळीतील दोन लोक एकत्रपणे डोंगर चढून, स्वतःला उंदराच्या पिंजऱ्यात का अडकवून घेतील? त्यांची सभा त्याना नक्कीच एखाद्या सुरक्षित ठिकाणी घेता आली असती. हॉटेल --- रेल्वे स्टेशन --- गर्दीचे थिएटर --- सार्वजनिक उद्यान असे सर्व खूप

प्रमाणात असलेल्या जागी, घेता आली असती --- पण इथे, जगाच्या सर्वात वर, बर्फच बर्फ पसरलेल्या जागी नाही.

अशा तऱ्हेचे काही तो इन्स्पेक्टर ड्रोउटला सांगायचा प्रयत्न करत होता व ते त्याला पुरेसे पटलेही.

“हो, हे मस्त आहे, पण यात काही अर्थ वाटत नाही.”

“जर ही सभा असेल, तर ते एकत्र प्रवास का करत आहेत? नाही, खरेच, याला काही अर्थ नाही.”

ड्रोउट काळजीयुक्त चेहऱ्याने म्हणाला. “तर मग आपल्याला आपला दुसरा अंदाज तपासून बघायला हवा. हे तिघे मारासॉडच्या टोळीतील असून ते मारासॉडला भेटायला आलेले आहेत. मग मारासॉड कुठला आहे?”

पायरोने विचारले, “हॉटेलच्या नोकरांचे काय?”

ड्रोउटने त्याचे खांदे शहारवले.

“तिथे कुणी नोकर नाही आहेत. तिथे एक म्हातारी बाई आहे. ती स्वयंपाक करते. तिचा नवरा, जॅक व ती असे दोघे इथे, मला वाटते, गेली पन्नास वर्षे आहेत. तेथील वेटरची जागा मी घेतली आहे, एवढेच.”

पायरो म्हणाला, “व्यवस्थापकाला अर्थात तू कोण आहेस, हे माहिती आहे, बरोबर?”

“नक्कीच! त्याच्या सहकार्याशिवाय हे झाले नसते.”

पायरो म्हणाला, “एक गोष्ट तुझ्या लक्षात आली का की तो काळजीत दिसतो आहे?”

या शेऱ्याने ड्रोउट चमकला. तो विचारपूर्वक बोलला, “हो. ते खरे आहे.”

“असे असेल की पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे तो काळजीत असेल.”

“पण तुला ते त्यापेक्षा काही जास्त असेल, असे वाटते का? तुला असे म्हणायचे आहे का, की त्याला काहीतरी माहिती आहे.”

“हो, मलाही असे वाटले.”

ड्रोउट दुःखाने बोलला, “मला नवल वाटते.”

तो थांबला व चालू पडला.

“तुला त्याच्या मनातले जाणून घेता येईल का?”

पायरोने त्याचे डोके नकारार्थी हलवले व म्हणाला,

“ते बरे होईल. मला वाटते, त्याला आपल्याबद्दल संशय येता कामा नये. फक्त त्याच्यावर लक्ष ठेव, एवढेच.”

ड्रोउटने मान हलवली. तो दाराकडे वळला.

“मिस्टर पायरो, तुम्हाला काही सूचना करायच्या नाहीत? मला तुमची कीर्ती माहिती आहे. या आपल्या देशात मी तुझे नाव ऐकले आहे.”

पायरो गोंधळून म्हणाला, “या क्षणी मी काही सुचवू शकत नाही. इथे सभा ठेवण्याचे कारण मला अजून उमगलेले नाही. खरे तर मुळात सभा घ्यायची गरजच काय?”

ड्रोउट स्पष्टपणे बोलला, “पैसा.”

तो गरीब बिचारा सॅली लुबाडला गेला आणि त्याचा खूनही झाला, नाही का?”

“हो, त्याच्याकडे बरेच पैसे होते. ते नाहीसे झाले.”

‘आणि ही सभा ते वाटून घेण्यासाठी असावी.”

“हे बरोबर वाटते.”

पायरोने असमाधानाने त्याची मान हलवली. तो हळू बोलला,

“हो, पण इथे का? गुन्हेगारांच्या सभेसाठी ही शक्य तेवढी वाईट जागा आहे. पण या जागी कुणी कदाचित कुण्या बाईला भेटायला येऊ शकेल.”

ड्रोउटने उत्सुकतेने एक पाऊल पुढे टाकले. तो उद्दीपित होऊन म्हणाला,

तुला असे वाटते? --- ”

पायरो म्हणाला, “मला वाटते, ती ग्रँडीयर बाई फार सुंदर आहे. तिच्यासाठी कुणीही दहा हजार फूट चढून येऊ शकेल --- म्हणजे तिने जर असे सुचवले असेल, तर!”

ड्रोउट म्हणाला, “हे रुचीपूर्ण आहे. मला तिचा या केसशी काही संबंध असेल, असे वाटत नाही. पण शेवटी ती इथे गेली अनेक वर्षे येते आहे.”

पायरो सभ्यपणे बोलला, “हो --- आणि त्यामुळे तिच्या इथे येण्यावर कुणी काही ताशेरे झाडणार नाही. नाहीतर रॉचर्स नेग्ज ही जागा का निवडली गेली असती?”

ड्रोउट उद्दीपित होऊन म्हणाला, “मिस्टर पायरो, तुमची कल्पना चांगली आहे. मी त्या दृष्टीकोनातून बघतो.”

## चार

काही न घडता दिवस गेला. सुदैवाने हॉटेलमध्ये भरपूर सामान होते. व्यवस्थापकाने सांगितले, की चिंतेचे काही कारण नाही. स्वयंपाकाची काही काळजी नाही.

पायरोने डॉ कार्ल लुट्झशी बातचीत करायचा प्रयत्न केला. पण त्याला वाईट पद्धतीने डावलले गेले. डॉक्टरने स्पष्ट केले की मानसशास्त्र हा त्याचा व्यवसायपूर्व भाग आहे आणि तो कुणा सोम्यागोम्याबरोबर त्याविषयी चर्चा करणार नाही. तो कोपऱ्यात बसून अर्धजागृतीविषयी मोठे जर्मन पुस्तक वाचत होता व त्यावर भरपूर सटीप व मुद्देसूद टिपणे काढत होता.

पायरो बाहेर पडला व निरुद्देशपणे भटारखान्याभोवती फेऱ्या मारत बसला. तिथे ज्याच्याबद्दल संशय वाटेल, असा वाईट स्वभावाचा म्हातारा माणूस जॅक होता. त्याच्याशी पायरो बोलू लागला. त्याची स्वयंपाक करणारी बायको आली. नशीबाने तिने पायरोला स्पष्ट केले, तिथे गोठवलेल्या अन्नाचा प्रचंड साठा होता. पण ती स्वतः त्याबद्दल फार विचार करत नव्हती. ते फार महाग होते आणि त्यात काय पोषणमूल्ये असणार होती? देवाच्या कृपेने कोणाला अशा गोठवलेल्या अन्नावर जगायची पाळी येऊ नये.

शेवटी संभाषण हॉटेलमधील नोकरमंडळींवर घसरले. जुलैच्या सुरवातीला नोकराणी व जास्तीचे वेटर्स येतात. पण पुढच्या तीन आठवड्यांसाठी तिथे कुणी असणार नव्हते. बहुधा लोक येतात, जेवतात व परत जातात. ती, जॅक आणि एक नोकर एवढे सहज सांभाळू शकतात.

पायरोने विचारले, “गुस्ताव्ह येण्यापूर्वी इथे एक नोकर आधीच होता, नाही का?”

“खरे तर होता. पण तो फार चांगला नव्हता. त्याच्याकडे काही अनुभव, कसब व नीटनेटकेपणा नव्हता.”

गुस्ताव्ह येण्यापूर्वी किती काळ तो इथे होता?”

“फक्त काही दिवस. आठवड्यापेक्षाही कमी. आपोआप त्याला काढले गेले. आम्हाला नवल वाटले नाही. ते होणारच होते.”

पायरोने विचारले, “त्याने काही तक्रार केली नाही का?”

“नाही. तो शांतपणे गेला. शेवटी तो कसली अपेक्षा करणार? हे चांगल्या दर्जाचे हॉटेल आहे. गिऱ्हाईकांना इथे चांगली सेवा मिळायला हवी.”

पायरोने मान हलवली व विचारले, “तो कुठे गेला?”

“म्हणजे तो रॉबर्ट तुम्ही म्हणता आहात का? नक्कीच तो जिथून आला होता, त्या हॉटेलात गेला असेल.”

“तो केबल गाडीने गेला का?”

तिने त्याच्याकडे चौकसपणे पाहिले.

“नक्कीच. इथू जाण्याचे दुसरे काय साधन असू शकत होते?”

पायरोने विचारले, “कोणी त्याला जातांना पाहिले का?”

ते दोघे पायरोकडे बघू लागले.

“तुम्हाला असे वाटते आहे का, त्याच्यासारख्या जनावराला बघायला कोणी गेले असेल --- आणि त्याला मोठा निरोप समारंभ दिला असेल? प्रत्येकाला स्वतःचे काम पुरेसे असते.”

पायरो म्हणाला, “बरोबर.”

त्याच्या डोक्यावरील इमारतीकडे बघत, तो सावकाश चालत लांब गेला. ते मोठे हॉटेल होते --- आता त्याची फक्त एकच बाजू उघडी होती. दुसऱ्या बाजूला खूप खोल्या होत्या. त्या पूर्णपणे बंद होत्या. त्यात कोणी शिरू शकत नव्हते ---

तो हॉटेलच्या कोपऱ्याशी आला आणि पत्ते खेळणाऱ्या त्या तिघांपैकी एकाच्या अंगावरुन घाईने गेला. चेहरा तीक्ष्णपणे अरुंद व डोळे मलूल असलेला असा तो होता. ते डोळे काही भावाशिवाय पायरोकडे बघत होते. त्याचे ओठ थोडे विलग झाले आणि दुष्ट घोड्यासारखे त्याचे दात दिसू लागले.

पायरो त्याला ओलांडून पुढे गेला. त्याच्यापुढे एक आकृती होती --- ती उंच व डौलदार ग्रँडीयर बाई होती.

त्याने त्याचा वेग थोडा वाढवला आणि तिला गाठून म्हणाला,

"केबल गाडीला झालेला अपघात दुःखःदायक आहे. मला वाटते, त्यामुळे तुमची काही गैरसोय झाली नसेल, नाही का?"

ती म्हणाली, "त्याचा माझ्याशी काही संबंध नाही."

तिचा आवाज --- शक्य तेवढा खोल --- खर्जातील होता. तिने पायरोकडे पाहिले नाही. तिने दिशा बदलली व ती कडेच्या लहान दाराने हॉटेलमध्ये शिरली.

## पाच

हर्क्युल पायरो लवकर झोपी गेला. मध्यरात्रीनंतर काही वेळाने तो जागा झाला.

कोणीतरी कुलुपाशी खटपट करत होते.

तो उठून बसला. दिवा लावला. त्याच वेळेस कुलूप उघडून दार सताड उघडले गेले. तिथे पत्ते खेळणारी तीन माणसे उभी होती. पायरोला वाटले, ते थोडे प्यायलेले आहेत. त्यांचे चेहरे मूर्ख व दुसऱ्याला इजा करण्याची इच्छा असलेले वाटत होते. त्याला शस्त्राचे पाते चकाकताना दिसले.

एक मोठा जाड माणूस पुढे आला व गुरगुरल्यासारखे बोलू लागला.

“गुप्तचराचे पवित्र डुक्कर! छट्!”

तो वाफ अंगावर आल्यासारखा शिवराळ भाषेत ओरडत होता. अंथरुणात झोपलेल्या काही संरक्षण नसलेल्या माणसाच्या दिशेने ते तिघे अगदी ठरवून कूच करू लागले.

“आम्ही त्याला भोसकू, चला रे, ए छोट्या घोड्यानो. आपण त्या गुप्तचराचा चेहरा उघडा पाडू. आज रात्री तो काही पहिला नसेल.”

ते सावकाश, मनात हेतू धरून आले. त्यांच्या शस्त्रांची पाती चकाकताना दिसली ---

आणि मग एक आवाज महागर्जना करत ओरडला, “त्यांना अडकवा.”

ते विशिष्ट कपडे केलेल्या, पट्ट्यांचा पायजमा घालून दारात उभ्या असलेल्या श्च्वार्टत्झभोवती फिरू लागले. त्याच्या हातात पिस्तुल होते.

“लोकहो, त्यांना पकडा. मी नेमबाजीत अव्वल आहे.”

त्याने चाप ओढला --- एक गोळी मोठ्या माणसाच्या कानातून गेली आणि खिडकीच्या लाकूडकामात जाऊन धडकली.

.हातांच्या तीन जोड्या झटकन चवताळून उठल्या.

श्च्वार्टत्झ बोलला, “मिस्टर पायरो, मी तुम्हाला त्रास देऊ का?”

एका झटक्यात पायरो अंथरुणाबाहेर पडला. त्याने चकाकणारी शस्त्रे गोळा केली. आणि ते तिघे शस्त्रहीन असल्याची खात्री करून, त्या तिघांवर चालून गेला.

श्च्वार्टत्झ म्हणाला, “आता तू चालायला लाग. पॅसेजमध्ये एक मोठे कपाट आहे. त्यात खिडकी नाही. ते नुसतेच आहे.”

त्याने त्या तिघांना चालवत नेले व त्यांना आत ढकलून किल्ली फिरवली. तो पायरोकडे वळला. त्याच्या आवाजात आनंदी भावना होत्या.

जर त्याना लगेच इंगा दाखवला नसता तर? मिस्टर पायरो, तुम्हाला माहिती आहे का, मी बरोबर बंदूक घेऊन जाणार म्हणून, फाऊन्टन स्प्रिंग्सचे लोक मला हसले. ते म्हणाले, “तुला काय वाटते, तू कुठे चालला आहेस? जंगलात का? ठीक आहे सर, मी म्हणेन, मला हसा. पण त्यांनी कधी अशी कुरूप गुंडांची टोळी बघितली नसेल, नाही का?”

पायरो म्हणाला, “प्रिय मिस्टर श्च्वार्टत्झ, तुम्ही अगदी ऐन वेळी आलात. नाहीतर ते रंगमंचावरचे नाटक ठरले असते. तुमचे माझ्यावर खूप उपकार झाले.”

“त्याचे एवढे काही नाही. आपण येथून कोठे जायचे? आपण या लोकांना पोलिसांच्या हवाली करायला हवे. पण ते तर आपण करू शकत नाही. ही निरगाठ बसलेली समस्या आहे. आपण व्यवस्थापकाकडे तक्रार करू शकतो.”

‘ओहो, व्यवस्थापक! मला वाटते प्रथम आपण वेटर गुस्ताव्हचा सल्ला घेऊ --- गुस्ताव्ह उर्फ इन्स्पेक्टर ड्रोउट. पण हो --- वेटर गुस्ताव्ह हा खरेच एक गुप्तहेर आहे.”

श्च्वार्टत्झ त्याच्याकडे बघत राहिला.

“म्हणूनच त्यांनी हे केले.”

“म्हणूनच कोणी काय केले?

”या गुंडांच्या यादीत तुम्ही दुसरे आहात. त्यांनी गुस्ताव्हला आधीच भोसकले आहे.”

“काय?”

“माझ्याबरोबर या. डॉक्टर सध्या त्याची शुश्रुषा करत आहेत.”

ड्रोउटची सर्वात वरच्या मजल्यावरील खोली लहान होती. गाऊन घातलेले डॉ लुट्झ जखमी माणसाच्या चेहऱ्याला मलमपट्टी करत होते.

हे दोघे आत शिरल्यावर त्यानी मान वळवून बघितले.

“ओहो, तुम्ही आहात, मिस्टर श्च्वार्टत्झ. हा नसता उद्योग आहे. ती किती हलकट माणसे आहेत! ते अमानुष राक्षसच आहेत.”

ड्रोउट अजूनही क्षीणपणे कण्हत होता.

श्च्वार्टत्झने विचारले, “अजून तो धोकादायक परिस्थितीत आहे का?”

“तुमच्या म्हणण्याचा अर्थ तसा असेल, तर तो आता मरणार नाही. पण त्याने बोलता कामा नये --- त्याने उद्दीपित होता कामा नये. मी जखमांना मलमपट्टी केली आहे. आता सेप्टिक होण्याची भीती नाही.”

ती तीन माणसे एकत्र खोलीबाहेर पडली. श्च्वार्टत्झ पायरोला म्हणाला,

‘तू गुस्ताव्ह पोलीस ऑफिसर असल्याचे म्हणालास का?”

पायरोने मान हलवली.

‘पण तो वर रॉचर्स नेग्जला काय करत होता?”

“तो एका धोकादायक गुन्हेगाराचा मागोवा घेत होता.”

थोडक्या शब्दात पायरोने परिस्थिती समजावून सांगितली.

डॉ लुट्झ म्हणाले, “मारासॉड? मी या केसबद्दल वर्तमानपत्रात वाचले होते. मला त्या माणसाला भेटायला आवडेल. त्यात काही असामान्यपणा आहे. मला त्याच्या लहानपणीची हकीगत माहिती करून घ्यायला हवी.”

पायरो बोलला, “माझ्यासाठी, तो या मिनिटाला कुठे आहे, हे जाणून घ्यायला मला आवडेल.”

श्च्वार्टत्झ म्हणाला, “आपण ज्या तिघांना कपाटात कोंडले त्यातील एक तो नाही का?”

पायरो असमाधानी आवाजात म्हणाला, “ते शक्य आहे --- हो, पण माझी खात्री नाही --- मला एक कल्पना सुचली आहे --- “

तो गालीच्याकडे बघतांना ओरडला. गालीचा हलक्या पिवळसर रंगाचा असून, त्यावर गडद गंजलेल्या तपकिरी रंगाचे फरांटे होते.

पायरो म्हणाला, “पाऊलखुणा --- या इथून चालल्याच्या पाऊलखुणा आहेत. त्या हॉटेलच्या वापरल्या न जाणाऱ्या भागापासून आलेल्या आहेत व रक्तात भिजलेल्या आहेत. ये --- आपल्याला घाई केली पाहिजे!”

ते त्याच्यामागे काळोख्या, धुळकट पॅसेजमधून एका हलणाऱ्या दारातून निघाले. ते कोपऱ्यावरून वळले. अजूनही ते गालीच्यावरील पाऊलखुणांचा मागोवा घेत चालले होते. त्या पार एका अर्धवट उघड्या दारापर्यंत गेलेल्या होत्या.

पायरो दार ढकलून आत शिरला.

त्याने जोरात एक भीतीदायक किंकाळी मारली.

ती झोपायची खोली होती. पलंग आत ढकललेले होते व टेबलावर एका ट्रेमध्ये काही अन्न पडले होते.

फरशीवर मध्यभागी एका माणसाचे प्रेत पडले होते. तो साधारण मध्यम उंचीचा होता आणि त्याच्यावर रानटी, पशुतुल्य अविश्वसनीय हल्ला झाल्याचे दिसत होते. त्याच्या हातावर डझनभर जखमा होत्या. छाती, डोके व चेहरा यांचा माराने जवळजवळ भुगा झाल्याचे दिसत होते.

श्च्वार्टत्झने देखील एक किंकाळी मारली व त्या प्रेताकडे बघवेना, म्हणून तोंड फिरवले.

डॉ लुट्झ यांच्या तोंडून जर्मनमध्ये एक किंकाळी बाहेर पडली.

श्च्वार्टत्झ हळू आवाजात बोलला, “हा कोण आहे? कोणाला माहिती आहे का?”

पायरो म्हणाला, “मला वाटते, तो रॉबर्ट नावाचा फारसा हुशार नसलेला येथील वेटर होता --- “

लुट्झ जवळ गेला व प्रेतावर वाकून पाहिले. त्याने बोटाने निर्देश केला. मृत माणसाच्या छातीला एक कागद टोचून ठेवलेला होता. त्यावर शाईने काही लिहिले होते.

मारासॉड आता कुणालाही मारू शकणार नाही --- त्याच्या मित्रांना लुटूदेखील शकणार नाही!

श्च्वार्टत्झ उद्गारला, “मारासॉड? म्हणजे हा मारासॉड आहे. पण या एकाकी ठिकाणी त्याला कुणी आणले? आणि तुम्ही त्याचे नाव रॉबर्ट का म्हणालात?

पायरो बोलला,

“तो इथे वेटरचे सोंग घेऊन वावरत होता --- आणि तसेही तो फार वाईट वेटर होता. इतका वाईट की त्याला जेव्हा काढून टाकले, तेव्हा कुणालाही आश्चर्य वाटले नाही. तो गेला पण बहुधा अँडरमॅटला परतला. पण कुणीच त्याला जाताना पाहिले नाही.”

लुट्झ त्याच्या थरथरणाऱ्या हळू आवाजात बोलला, “म्हणजे काय झाले, असे तुम्हाला वाटते?”

पायरो उत्तरला, “मला वाटते हॉटेल व्यवस्थापकाच्या चेहऱ्यावरील काही दुःखी भाव आपल्याला स्पष्टीकरण देऊन

जातात. मारासॉडने नक्कीच त्याचे मन वळवून, त्याला पैसे देऊन, अप्रामाणिकपणे त्याचे स्वतःचे काम करायला लावले असेल. हॉटेलच्या न वापरत्या भागात लपून बसायची परवानगी मिळवली असेल --- “

विचारपूर्वक तो पुढे म्हणाला, “पण व्यवस्थापक या बाबतीत आनंदी नव्हता. ओहो, तो अजिबातच आनंदी नव्हता.”

“आणि मारासॉड तिथे रहातो आहे, हे व्यवस्थापक सोडून कुणालाच माहिती नसणार, नाही का?”

“असेच दिसते आहे. हे शक्य आहे.”

डॉ लुट्झ म्हणाला, “पण त्याला का मारले गेले? आणि कुणी मारले?”

श्च्वार्टत्झ ओरडला,

“ते सोपे आहे. त्याने त्याच्या टोळीबरोबर पैसे वाटून घेणे अपेक्षित होते. पण त्याने ते केले नाही. त्याने त्यांना फसवले. लपून रहाण्यासाठी, तो इथे भलत्याच ठिकाणी आला. त्याला वाटले जगातील या इतक्या उंचीवर असलेल्या जागेचा ते विचारदेखील करणार नाहीत. पण कसे कुणास ठाऊक, त्याना ते समजले व ते इथे त्याच्या मागावर आले. त्याचा अंदाज चुकला.” त्याने बुटाच्या

टोकाने प्रेताला स्पर्श केला. “आणि त्यांनी त्याचे खाते --- अशा प्रकारे बंद करून टाकले.”

पायरो पुटपुटला, “हो, आपल्याला वाटत होते तशी सभा वगैरे काही नव्हती.”

डॉ लुट्झ चिडून म्हणाला, “हे का आणि कसे कदाचित रुचीपूर्ण असतील. पण मी आपल्या आताच्या परिस्थितीविषयी बोलू इच्छितो. इथे आपल्यासमोर एक मनुष्य मरून पडला आहे. माझ्या हातात एक आजारी मनुष्य आहे व माझ्याकडे पुरेशी साधनसामग्री नाही. आणि आपण जगापासून तोडलो गेलो आहोत. असे किती काळ चालणार?”

श्च्वार्टत्झ बोलला, “आणि आपल्याकडे कपाटात कोंडलेले तीन खुनी आहेत. यालाच मी एक प्रकारची रुचीपूर्ण परिस्थिती म्हणतो.”

डॉ लुट्झ म्हणाले, “आता आपण काय करायचे?”

पायरो बोलला, “पहिल्यांदा आपण व्यवस्थापकाकडे जाऊ. तो काही गुन्हेगार नाही. फक्त त्याला पैशांचा मोह पडला. तो भित्रा आहे. आपण त्याला सांगू, ते तो करेल. माझ्या चांगल्या मित्र जॅक व त्याची बायको कदाचित काही धागेदोरे देतील. मदत मिळेपर्यंत प्रथम आपण आपल्या तीन गुन्हेगारांना सुरक्षित जागी हलवायला

हवे. मला वाटते, मिस्टर श्च्वार्टत्झचे पिस्तुल काहीही बेत करायला उपयोगी ठरेल.

पायरो कडकपणे म्हणाला, "डॉक्टर, तुम्ही तुमच्या रूग्णासाठी शक्य ते सगळे कराल. आम्ही इतर सगळेजण कुठल्याही धोक्यावर लक्ष ठेऊन राहू. याहून जास्त आपण काही करू शकत नाही."

## सहा

तीन दिवसांनतर सकाळी हॉटेलसमोर, एक मेजवानीचे आयोजन करण्यात आलेले दिसले.

हर्क्युल पायरोने पुढचे दार उघडून, त्यांचे स्वागत केले. "या. या. माझ्या मित्रांनो, आत या."

पोलीस कमिशनर मिस्टर लेमेनटेउलने पायरोचे दोन्ही हात धरले.

"अरे माझ्या मित्रा, कुठल्या भावनांनी मी तुझे अभिनंदन करू? काय खोलवर ठसा उमटवणाऱ्या घटना! --- काय भावना तू त्यातून दाखवल्यास! आणि आम्ही आमच्या काळजीत, भीतीत --- काही न जाणता --- सगळ्या गोष्टींना घाबरत होतो. वायरशिवायचा फोन नाही, काही वार्तालाप नाही --- आरशाचा कोन बदलून सूर्यप्रकाश पाडणे, हा खरेच तुझ्या हुशारीचा कळस होता."

पायरो नम्रतेचा आव आणत म्हणाला, “नाही. नाही. शेवटी जेव्हा माणसाचे शोध संपतात, तेव्हा एखादा निसर्गाचा आश्रय घेतो. आकाशात सूर्य नेहमीच असतो.”

तर अशा तऱ्हेने हॉटेलात छोटीशी मेजवानी झाली. लेमेनटेउल म्हणाला,

“आपण अपेक्षित नव्हतो का? त्याचे हास्य काहीसे गंभीर होते.

पायरोही हसला. तो बोलला, “ पण नाही. असा विश्वास आहे, की अजून केबल गाडी दुरुस्त झाली नाही.”

लेमेनटेउल भावनातिरेकाने बोलला, “ओहो, आजचा दिवस खरेच मोठा छान दिवस आहे. तुला काय वाटते? तो खरेच मारासॉड होता का?”

‘तो मारासॉड होता, हे ठीक आहे. माझ्याबरोबर ये.”

ते वरच्या मजल्यावर गेले. श्च्वार्टत्झ गाऊनमध्ये बाहेर आला. तो त्यांच्याकडे निरखून बघत राहिला.

त्याने स्पष्टीकरण दिले, “मी आवाज ऐकले. काय झाले आहे?”

पायरो रुबाबात म्हणाला, “मदत आली आहे. मिस्टर माझ्याबरोबर या. हा खास क्षण आहे.”

तो वर जाण्यासाठी जिना चढू लागला.

श्च्वार्टत्झ म्हणाला, “तुम्ही वर ड्रोउटकडे चालला आहात का? तो कसा आहे?”

काल रात्री तो चांगला असल्याचे डॉ लुट्झ म्हणाले.

ते ड्रोउटच्या खोलीच्या दाराशी आले. पायरोने दार उघडले आणि तो म्हणाला, “हे बघ इथे तुझे रानटी डुक्कर आहे. त्याला जिवंत पकड आणि तो गिलोटीनला फसवणार नाही, याची काळजी घे.”

तो मनुष्य अजून अंथरुणात आहे. त्याच्या चेहऱ्याला मलमपट्टी केलेली आहे. पण त्याला हलता येण्यापूर्वी, पोलीस ऑफिसरनी त्याला हातात घेतले आहे.

श्च्वार्टत्झ घाबरून ओरडला, “पण तो गुस्ताव्ह वेटर --- तो इन्स्पेक्टर ड्रोउट आहे.”

“तो वेटर गुस्ताव्ह आहे --- ड्रोउट नाही.”

“तो गुस्ताव्ह आहे --- हो. पण तो ड्रोउट नाही. ड्रोउट पहिल्यांदा वेटर होता. वेटर रॉबर्टला हॉटेलच्या न वापरत्या भागात जेरबंद केले होते. त्याला त्याच रात्री जेव्हा माझ्यावर हल्ला केला गेला, तेव्हा मारासॉडने मारले.”

# सात

न्याहारीनंतर पायरोने घाबरलेल्या अमेरिकनला हळूवारपणे स्पष्ट केले

“तुला समजते आहे का, एखाद्याला माहिती असलेल्या अशा काही गोष्टी आहेत --- त्या त्याच्या व्यवसायामध्ये त्याला अगदी नक्की ठाऊक आहेत. उदाहरणार्थ, गुप्तहेर आणि खुनी यातील फरक! गुस्ताव्ह वेटर नसल्याचा संशय मला पहिल्या फटक्यातच आला होता. पण तो पोलीसही नव्हता. मी आयुष्यभर पोलिसांबरोबर राहिलेलो आहे आणि मला माहिती आहे. तो इतर कुणालाही तो गुप्तहेर असल्याची थाप मारू शकतो. पण पोलिसाला स्वतःलाच नाही.”

त्यामुळे मी एकदम सावधान झालो. त्या संध्याकाळी मी माझी कॉफी प्यायलो नाही. मी ती टाकून दिली. त्यादिवशी उशीरा माझ्या खोलीत एक माणूस आला. तो अशा विश्वासाने आला की तो शोधत असलेली खोली मादक द्रव्यसेवन करणाऱ्या माणसाची आहे. त्याने माझी खोली तपासली आणि त्याला माझ्या पाकिटात पत्र सापडले --- तिथे मी ते त्याच्यासाठीच ठेवले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी गुस्ताव्ह माझ्या खोलीत कॉफी घेऊन आला. त्याने मला नावाने हाय हॅलो केले आणि त्याचा अभिनय खूप

आत्मविश्वासाने केला. पण तो काळजीत होता --- फार काळजीत होता. काही कारणाने पोलीस त्याच्या मागावर होते. त्याना तो कुठे आहे, ते समजले होते. आणि ते त्याच्यासाठी मोठे संकट होते. त्यामुळे त्याचे सर्व बेत धुळीला मिळाले. तो पिंजऱ्यातील उंदरासारखा पकडला गेला.''

श्च्वार्टत्झ म्हणाला, ''तो अती मूर्ख इथे कशाला आला? का आला?''

पायरो थंडपणे बोलला,

'तुला वाटते तितके ते मूर्खपणाचे नाही. त्याला जगापासून दूर अशा एका निवांत जागेची आत्यंतिक गरज होती. तिथे तो ठराविक व्यक्तींना भेटू शकत होता. आणि तिथे काही घडणार होते.''

'कोण व्यक्ती?''

''डॉ लुट्झ''

''डॉ लुट्झ? तो देखील चक्रम आहे?''

''डॉ लुट्झ हा खराच डॉ लुट्झ आहे. पण तो नसांचा विशेष डॉक्टर नाही --- तो मानसोपचारतज्ञही नाही. माझ्या मित्रा, तो सर्जन आहे. तो गरीब आहे व त्याला त्याच्या देशातून हाकलून दिले आहे. एका माणसावर उपचार करण्यासाठी, त्याचे सर्जनचे कसब वापरून, रूग्णाचे दिसणे बदलण्यासाठी, त्याला मोठी रक्कम

देण्यात आली. म्हणून त्याला इथे मारासॉडला भेटावे लागले. रुग्ण गुन्हेगार असल्याची त्याला कदाचित कल्पना आली असेल. त्याने तर्क केला असेल की तो मनुष्य गुन्हेगार आहे, पण तरी त्याने तिकडे दुर्लक्ष करून, त्यांनी इतर कुठल्या देशात उपचार करण्याचा धोका घेतला नाही. इथे मोसम सुरु होण्याआगोदर, इतक्या लवकर कुणी येत नाही. अगदी काही वेगळ्या कारणासाठी कुणी आले तर येते. आणि व्यवस्थापकाला पैशांची गरज होती, तर मग दुष्कृत्यासाठी त्याचे मन वळवणे सोपे होते. त्यासाठी ही आदर्श जागा आहे.

“पण जसे मी म्हणालो तसे, गोष्टींनी वेगळे वळण घेतले. मारासॉडला फसवले गेले. त्याचे अंगरक्षक असलेली तीन माणसे इथे त्याला भेटून, त्याचे रक्षण करणार होती. पण ती अजून आली नव्हती. पण मारासॉड मात्र लगेच दाखल झाला. वेटरचे सोंग घेतलेला पोलीस ऑफिसर, याला पळवले जाते आणि मारासॉड त्याची जागा घेतो. त्याची टोळी केबल गाडी नादुरुस्त करते. वेळाचा प्रश्न असतो. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ड्रोउट मारला जातो. आणि त्याच्या प्रेताला चिठ्ठी अडकवली जाते. अशी आशा केली जाते, की तोपर्यंत जगात याचा बोलबाला होईल व ड्रोउटचे प्रेत तो मारासॉड असल्याचे समजून पुरले जाईल. डॉ लुट्झ हा सर्जन त्याची कामगिरी चोख पार पाडतो. पण एका माणसाचे तोंड गप्प करायचे राहून जाते, तो म्हणजे मी, हर्क्युल पायरो. त्यामुळे

टोळीला माझ्यावर हल्ला करण्यासाठी पाठवले जाते. पण माझ्या मित्रा, तुझे आभार --- “

पायरो डौलदारपणे श्च्वार्टत्झच्या समोर वाकतो व म्हणतो,

‘त्यामुळे तू खरा, हर्क्युल पायरो ठरलास, नाही का?”

“खरे की काय? “आणि तू त्या प्रेताला कधीच एक मिनिटभरदेखील फसला कसा काय नाहीस? तुला ते प्रेत मारासॉडचे नसल्याचे माहिती होते का?”

“होय तर, खात्रीने!”

“तू तसे बोलला का नाहीस?”

पायरोचा चेहरा अचानक कठोर झाला.

कारण मी नक्की मारासॉडला पोलिसांच्या हवाली करतो आहे, अशी खात्री मला हवी होती.”

तो पुटपुटल्यासारखे बोलला,

“त्या इरायमँथियन डुक्कराला जिवंत पकडण्यासाठी ---“

# THE AUGEAN STABLES
# ऑजियन तबेले




मिस्टर पायरो, परिस्थिती खूप नाजूक आहे.

हर्क्युल पायरोच्या ओठांवर मंद स्मित तरळले. तो उत्तरला, “तसे नेहमीच असते.”

त्याऐवजी त्याने त्याचा पलंगाशेजारील चेहरा मोठे गुपित राखणाऱ्या अशा पद्धतीचा ठेवला.

सर जॉर्ज कॉनवे दमदारपणे पुढे आला. त्याच्या ओठांमधून म्हणी सहज निघत होत्या --- सरकारच्या स्थानाची खूप नाजूकता

--- लोकांची रुची --- पक्षाचा कडकपणा --- एकत्रित लढाऊ फळी पुढे करण्याची गरज --- छापखान्याचे सामर्थ्य --- देशाचे हित ---

हे सर्व ऐकायला छान होते. पण त्याला काही अर्थ नव्हता. जेव्हा नम्रपणा नाहीसा होऊन, जांभया येऊ लागतात, तेव्हा नेहमीप्रमाणे पायरोचा जबडा दुखत होता. संसदेतील वादविवाद वाचतांनादेखील कधीकधी त्याला असे होत असे. पण त्या प्रसंगी त्याच्या जांभया रोखायचे काही कारण नसे.

त्याने ते शांतपणे सहन करायची मनाची तयारी केली. त्याच वेळेस त्याला सर जॉर्ज कॉनवेबद्दल सहानुभूती वाटली. त्या माणसाला त्याला नक्कीच काहीतरी सांगायचे होते --- आणि अर्थात त्याने सहजतेने ते सांगायची कला हरवली होती. शब्द नीटपणे स्पष्ट करता येत नव्हते. तो उपयोगी वाक्प्रचारांच्या बाबतीत एकदम माहीर होता --- म्हणजे असे वाक्प्रचार सहजपणे कानावर पडत पण त्यातून अर्थबोध होत नसे.

शब्द ओघाने येत --- बिचाऱ्या सर जॉर्जचा चेहरा लाल होई. तो टेबलावर बसलेल्या दुसऱ्या माणसाकडे, हताश नजर टाके व दुसरा माणूस प्रतिसाद देई.

एडवर्ड फेरीयर म्हणाला, “ठीक आहे, जॉर्ज. मी त्याला सांगतो.”

पायरोने गृहसचिवापासून नजर पंतप्रधानांकडे वळवली. त्याला एडवर्ड फेरीयरमध्ये थोडी रुची वाटली. ब्याऐंशी वर्षांच्या एका म्हाताऱ्याने, प्राध्यापक फर्गस मॅकलीओड याने, सहज वापरलेल्या वाक्प्रचारावरून ती रुची निर्माण झाली. खुन्याचा गुन्हा शाबित करण्यात आलेल्या रासायनिक अडथळयातून त्याने क्षणभर राजकारणात दखल द्यायचे ठरवले होते. प्रसिद्ध व आवडता जॉन हॅमेट [ आता उमराव कॉर्नवर्दी ] याचा जावई, एडवर्ड फेरीयर याला मंत्रीमंडळ बनवण्यास सांगण्यात आले. राजकारणी होण्यासाठी, तो अजून तरुण मनुष्य होता --- पन्नासखालील. प्राध्यापक फर्गस मॅकलीओड म्हणाला, "एके काळी फेरीयर माझा विद्यार्थी होता. तो चांगला मनुष्य आहे."

एवढेच झाले. पण पायरोसाठी ते बऱ्याच काही गोष्टींचे प्रतिनिधित्व करत होते. जर मॅकलीओड एखाद्याला चांगला म्हणत असेल, तर ते प्रसिद्ध छापखान्याने केलेल्या कौतुकापेक्षा, चारित्र्याचे प्रमाणपत्रच होते.

दोन्ही मते जुळली, तर मग ते लोकमताच्या बरोबरीने खरेच होते. एडवर्ड फेरीयर हा चांगला समजला गेला होता --- तेच तर --- बुद्धिमान नव्हे, थोरही नव्हे. विशेष असा बोलणारा वक्ता नव्हे. किंवा प्रगाढ पंडीतही नव्हे. तो चांगला मनुष्य होता --- पारंपारिक

घराण्यात वाढलेला. जॉन हॅमेटच्या मुलीशी लग्न केलेला --- जॉन हॅमेटचा उजवा हात असलेला. देशाचे सरकार जॉन हॅमेटच्या पद्धतीने चालवू शकणारा!

कारण जॉन हॅमेट लोकप्रिय होता व इंग्लंडच्या छापखान्याचाही आवडता होता. इंग्लिश लोकांना आवडणारा प्रत्येक गुण त्याच्यात होता. लोक त्याच्याबद्दल बोलत. 'एखाद्याला वाटे की हॅमेट प्रामाणिक आहे. 'त्याच्या साध्या घरगुती प्रसंगांचे, बागकामाच्या आवडीचे वर्णन केले जाई.' बाल्डविनचा पाइप किंवा चेंबरलेनच्या छत्रीप्रमाणे हॅमेटच्या रेनकोटाचे नाव घेतले जाई.' तो नेहमी त्याच्या हातात असे --- हवेमुळे घेतलेला तो कपडा होता. तो इंग्लिश हवेचे, इंग्लिश जातीच्या भविष्याचा विचार करण्याचे व जुन्या मूल्यांशी असलेल्या ममत्वाचे प्रतिक होता. शिवाय त्याच्या फसव्या ब्रिटीश पद्धतीप्रमाणे, जॉन हॅमेट लोकांसमोर भाषणे करणारा होता. शांतपणे व तळमळीने केलेल्या भाषणांमध्ये इंग्लिश हृदयात रुतून बसणारे साधे पण भावनापूर्ण वाक्प्रचार असत. परदेशी लोक कधीकधी ते ढोंगी असल्याची व कधीकधी असह्यपणे फार उमदे असल्याची टीका करत. जॉन हॅमेटला उमदे असल्याची जराही खंत नव्हती --- खेळकर, लोकांच्या दृष्टीकोनामधून नापसंती दाखवायची पद्धत होती. शिवाय त्याचे व्यक्तिमत्व रुबाबदार, उंच,

अभिमानी, गोरे व तेजस्वी निळया डोळयांचे होते. त्याची आई डेन्मार्कची नागरिक होती. तो स्वतः अनेक वर्षे वाखाणला गेलेला पिढीजाद उमराव होता. त्याचे टोपणनाव ‘विकिंग’ होते. जेव्हा खराब तब्येतीमुळे त्याला कार्यालयातील पद सोडावे लागले, तेव्हा तो फार अस्वस्थ झाला. त्याच्यामागून कोण येणार? बुद्धिमान उमराव चार्ल्स डेलाफिल्ड? [ इंग्लंडला त्याच्याइतक्या फार बुद्धिमान माणसाची गरज नव्हती. ] इव्हान व्हीटलर? [हुशार पण थोडा अनीतिमान ] जॉन पॉटर? [ स्वतःला हुकूमशहा म्हणवू शकेल, असा --- आम्हाला या देशात हुकूमशहा नको असलेला, आभारी आहे. ] त्यामुळे शांत एडवर्ड फेरीयर त्या पदावर आरुढ झाला, तेव्हा सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. फेरीयर ठीक होता. त्याला जुन्या लोकांकडून प्रशिक्षण मिळालेले होते. त्याने जुन्या वयस्क माणसाच्या मुलीशी लग्न केले होते. दर्जेदार ब्रिटीश वाक्प्रचाराप्रमाणे तो खपून गेला असता.

पायरोने त्या शांत, काळया, खर्जातील आल्हादक नसलेल्या आवाजाच्या व दमलेला दिसणाऱ्या माणसाचा अभ्यास केला.

एडवर्ड फेरीयर म्हणत होता, “मिस्टर पायरो, कदाचित तुम्ही आठवड्याला प्रसिद्ध होणाऱ्या ‘एक्स रे बातम्या’शी परिचित असाल, नाही का?

पायरोने थोडे लाजत कबूल केले, “मी त्यावर नजर टाकली आहे.

पंतप्रधान म्हणाले, “मग त्यात काय आहे, हे तुम्हाला थोडेफार माहिती असेल. माणसाची थोडीशी दुष्कीर्ती करणारा मजकूर. स्फोटक अशा गुप्त इतिहासाबद्दलचे चपराक देणारे परिच्छेद. त्यातील काही खरे. काही त्रासदायक नसणारे --- पण सर्व काही मसालेदार पद्धतीने लिहिलेले. प्रसंगानुरूप --- “

थोडे थांबून आवाज बदलत तो म्हणाला, “प्रसंगानुरूप काही जास्त.”

पायरो काही बोलला नाही. फेरीयर बोलत राहिला.

“येत्या दोन आठवड्यांत, उच्च राजकीय वर्तुळात, प्रथम दर्जाच्या प्रकरणांबद्दल सूचना मिळतील. खासगी कामासाठी सरकारी हुद्द्याचा उपयोग करणे व भ्रष्टाचाराची आश्चर्यकारक प्रकरणे हे उजेडात येईल.”

पायरो त्याचे खांदे शहारवत बोलला, “सर्वसामान्य उक्ती. जेव्हा हे उघडे होते, तेव्हा सहसा भ्रष्ट लोक त्यांच्या भावना वाईट रीत्या उघड्या पडून, नाराज होतात.”

फेरीयर कोरडेपणे बोलला, “यामुळे ते नाराज होणार नाहीत.”

पायरोने विचारले, ''मग हे उघड करणे कशासाठी आहे, हे तुम्हाला माहिती असेल, नाही का?''

''खूपच बारकाईने.''

एडवर्ड फेरीयर मिनिटभर थांबला व नंतर बोलू लागला,''त्याने काळजीपूर्वक व पद्धतशीरपणे गोष्टीचे स्वरूप सांगितले.

ही काही नैतिक वा बौद्धीक सुधारणेची गोष्ट नव्हती. भूतपूर्व पंतप्रधान जॉन हॅमेटने स्वतःच्या फायद्यासाठी केलेल्या दुसऱ्याच्या फसवणूकीचे निर्लज्ज शिव्याशाप, एक वस्तू उडवून दुसरी हातात ठेवणे व परतपरत तसे करत रहाणे, पक्षाच्या पैशांचा पूर्णपणे दुरुपयोग करणे, एवढेच नव्हे तर, भूतपूर्व पंतप्रधान जॉन हॅमेटने पैसे खाल्ल्याचा आरोप करणे व अशा तऱ्हेने त्याला अप्रामाणिक चोर ठरवणे, भलामोठ्या आत्मविश्वासाने फसवेगिरी करत, स्वतःचे खासगी भविष्य भरभराटीला नेण्यासाठी स्वतःच्या उच्च स्थानाचा उपयोग करून पुंजी गोळा करण्याचा आरोप करणे, असे सर्व चालू होते.

पंतप्रधानांचा शांत आवाज शेवटी थांबला. गृहसचिव दुःखाने जोरात ओरडला. किंकाळ्या मारत सुटला, ''हे राक्षसी आहे --- राक्षसी कृत्य आहे! हा चिंध्या पांघरणारा पेरी, त्याला गोळीच मारायला हवी!''

पायरो म्हणाला, "हे सगळे उघड करणे एक्स-रे बातम्यामध्ये दिसायला हवे."

"हो."

"त्यासाठी त्यांनी कशीकशी कारवाई करायचा बेत ठरवला आहे?"

फेरीयर सावकाशीने बोलला, "ते जॉन हॅमेटवर खासगी हल्ला करायचा बेत आखत आहेत. त्याला काळीमा फासेल, असे परिपत्रक जाहीर करायला बघत आहेत. त्याला कोर्टात खेचायचा विचार ते करत आहेत. स्वतःच्या कीर्तीला काळीमा फासल्याचा प्रयत्न केल्याबद्दल जॉन हॅमेट 'एक्स-रे बातम्या' या वर्तमानपत्राच्या संपादकाला कोर्टात खेचू शकतो.

"तो ते करेल का?"

"नाही."

"का नाही?"

फेरीयर बोलला, "एक्स-रे बातम्यांना याहून जास्त काहीच न आवडण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांना प्रचंड कीर्ती मिळेल. त्याविरुद्ध संरक्षण म्हणजे, तक्रार केलेली विधाने खरी असल्याचे अभ्यासपूर्ण विवेचन. हे पूर्ण प्रकरण अथकपणे प्रकाशझोतात आणून सर्वांना बघायला लावले पाहिजे."

“तरीही जर केस त्यांच्याविरुद्ध गेली, तर होणारे नुकसान फार मोठे असेल.”

फेरीयर सावकाशीने बोलला, “ते बहुधा त्यांच्याविरुद्ध जाणार नाही.”

“का?”

सर जॉर्ज योग्य प्रकारे बोलले, “मला खरेच वाटते की --- “

पण एडवर्ड फेरीयर बोलतच राहिला, “कारण ते जे छापू बघत आहेत, ते खरे आहे.”

सर जॉर्ज कॉनवे संसदेला संमत नसलेल्या मोकळेपणा दाखवल्याबद्दल भयंकर राग येऊन, तो जोरात किंचाळला, “माझ्या प्रिय एडवर्ड, आम्ही असे खात्रीपूर्वक सांगू शकत नाही --- “

एडवर्ड फेरीयरच्या दमलेल्या चेहऱ्यावर हास्याचे भूत झळकले. तो बोलला, “जॉर्ज, दुर्दैवाने, निखळ सत्य सांगायची वेळ येतेच. ती ही वेळ आहे.”

सर जॉर्ज उद्गारला, “मिस्टर पायरो, तुम्हाला समजले का, हे सर्व गुप्त गुपित आहे. एकही शब्द --- “

फेरीयर मध्येच सावकाशीने बोलला,

“मिस्टर पायरोना समजते, की त्याना काय समजणार नाही, ते असे आहेः लोकदल पक्षाचे भविष्य कड्याच्या टोकावर उभे आहे. मिस्टर पायरो, जॉन हॅमेट म्हणजे लोकदल होते. तो इंग्लंडच्या लोकांचे प्रतिनिधित्व करत होता --- तो प्रामाणिक व चांगला होता. आम्हाला कोणी बुद्धिमान समजत नव्हते. आम्ही गोंधळ घालणारे व मूर्खपणे चुका करणारे होतो. पण आम्ही पारंपारिक पद्धतीने उत्तम प्रकारे चालणारे होतो. आणि आमच्याकडे पायाभूत प्रामाणिकपणा होता. आमचे दुर्दैव असे होते, की जो आमचा नेता होता, लोकांचा प्रामाणिक मनुष्य होता, मर्यादेबाहेर हुशार होता, पण तोच या पिढीत सर्वात मूर्ख ठरवला गेला आहे.”

सर जॉर्जने एक किंकाळी मारली.

पायरोने विचारले, “तुम्हाला यातले काही माहिती नाही का?”

त्या जीर्ण चेहऱ्यावर हास्य पसरले. फेरीयर म्हणाला, “मिस्टर पायरो, तुमचा माझ्यावर विश्वास बसणार नाही. पण इतर सर्वांप्रमाणे मलाही पूर्णपणे फसवले गेले आहे. मला माझ्या बायकोचा तिच्या वडिलांबद्दलचा घुमा दृष्टीकोन कधीच समजला नाही. मग मला समजले. तिला त्यांचे महत्वाचे चारित्र्य माहिती होते.”

थोडे थांबून तो पुढे म्हणाला, “जेव्हा खरे बाहेर पडू लागले, तेव्हा मी चक्रावून गेलो. अविश्वसनीय! आम्ही सगळयांनी माझ्या

सासऱ्यांचा खराब तब्येतीबद्दल राजीनामा मागितला आणि सगळा गोंधळ निस्तरण्याच्या तयारीला आम्ही लागलो, असे मी म्हणू शकतो का?''

सर जॉर्ज किंचाळला. ''स्वच्छ करण्यास फार कठीण, ऑजियन तबेले!''

पायरोने सुरवात केली.

फेरीयर म्हणाला, ''मला भीती वाटते, हे आपल्यासाठी हर्क्युलसच्या श्रमांइतकी अवघड गोष्ट असल्याचे सिद्ध करेल. एकदा गोष्टी लोकांमध्ये पसरल्या, की सर्व देशातून प्रतिक्रियेची लाट उसळेल. सरकार पडेल. नंतर शक्य असेल, त्या ठिकाणी निवडणुका होतील. एव्हरहार्ड आणि त्याचा पक्ष पुन्हा सत्तेत येईल. तुम्हाला एव्हरहार्डचे धोरण माहिती आहे.''

सर जॉर्जने घशातून काही आवाज काढले. ''भावविव्हल --- फारच भावविव्हल.''

फेरीयर थंडपणे म्हणाला, ''एव्हरहार्डकडे क्षमता आहे --- पण तो धसमुसळा, आक्रमक व युक्तीबाजपणा अजिबात नसलेला आहे. त्याच्या समर्थकांकडे काही कसब नाही व ठाम मतेही नाहीत --- त्यामुळे ती सरळसरळ हुकूमशाही असेल.''

पायरोने मान हलवली.

सर जॉर्ज उशीराने बोलला, “जर सर्व काही घाईने केले गेले तर -- “ मुख्य माणसाने सावकाशीने डोके हलवले. ती हरल्याची खेळी होती.

पायरो म्हणाला, “घाई करता येईल, असे तुम्हाला वाटत नाही का?”

फेरीयर म्हणाला, “मिस्टर पायरो, मी शेवटची आशा म्हणून तुमच्याकडे बघतो आहे. माझे मत आहे, की हे प्रकरण अती मोठे आहे. खूप लोकांना याबद्दल माहिती आहे. त्यामुळे ते यशस्वीपणे बंद केले पाहिजे. आपल्याला फक्त दोन पद्धती अवलंबता येतील. एक तर अमानुषपणे सक्ती करायची किंवा पैसे देऊन वा अन्य अशाच गैरमार्गाने ते साध्य करायचे --- पण यात यशस्वी होण्याची आशा फारच कमी आहे. गृहमंत्री आपल्या त्रासाची तुलना स्वच्छ करण्यास फार कठीण असलेल्या तबेल्यांशी करतो. मिस्टर पायरो, त्यासाठी एकामागोमाग एक नद्यांमध्ये रक्तपात उसळण्याची गरज आहे. निसर्गात प्रचंड उलथापालथ होण्याची गरज आहे. चमत्काराशिवाय काही खरे नाही.”

पायरो आनंदाने त्याची मान हलवत म्हणाला, “खरे तर हर्क्युलसची गरज आहे. लक्षात ठेवा माझे नाव हर्क्युल आहे --- “

एडवर्ड फेरीयर म्हणाला, “मिस्टर पायरो, तुम्ही चमत्कार करू शकता का?”

“तुम्ही त्यासाठीच तर मला बोलावले आहे. तुम्हाला वाटते आहे, मी कदाचित करू शकेन?”

“ते खरे आहे --- मला जाणवले की जर मोक्ष मिळवायचा असेल, तर तो फक्त कुठल्यातरी पूर्णपणे नवीन व भन्नाट सूचनेनेच मिळू शकेल.” क्षणभर थांबून तो म्हणाला, “मिस्टर पायरो, कदाचित तुम्ही परिस्थितीचा नैतिक आढावा घेऊ शकाल का? जॉन हॅमेट मूर्ख होता. त्याच्या पुराणकथेची धूळदाण उडवायला हवी. अप्रामाणिक पायावर कुणी प्रामाणिक घर बांधू शकतो का? मला माहिती नाही. पण मला हे माहिती आहे, की मला प्रयत्न करून बघायचा आहे. तो टोकाच्या कटूपणे अचानक हसला. “राजकारणी लोकांना नेहमीप्रमाणे उच्च हेतूंसाठी --- खुर्ची टिकवायची असते.”

पायरो उठून बोलला,

“माझ्या पोलीसदलातील अनुभवाने मला कदाचित राजकीय पुढाऱ्यांबद्दल फारसा उच्च विचार करू दिला नसेल. जर जॉन हॅमेट कार्यालयात त्याच्या पदावर असता, तर मी काहीही कारणाने बोट उंचावले नसते --- छोटे बोटदेखील नाही. पण मला तुमच्याबद्दल

काही माहिती होते. मला एका खऱ्या थोर माणसाकडून, सुपीक मेंदू असलेल्या शास्त्रज्ञाकडून सांगण्यात आले होते, की तुम्ही एक चांगला माणूस आहात. मला जे करता येईल, ते मी करेन.''

त्याने वाकून अभिवादन केले व निघून गेला.

सर जॉर्ज उद्गारला, ''छान, सगळ्यामध्ये गालावर एक चांगली चपराक!''

पण अजूनही हसत, एडवर्ड फेरीयर म्हणाला, ''ती वाखाणणी होती.''

## दोन

खालच्या मजल्यावर जातांना, पायरोला एका उंच, छान केसांच्या बाईने छेडले. ती म्हणाली, ''मिस्टर पायरो, कृपया माझ्या हॉलमध्ये या.''

त्याने तिला अभिवादन केले व तिच्यामागे जाऊ लागला.

तिने दार लावले, त्याला बसायला खुर्ची दिली आणि सिगरेट पुढे केली. ती त्याच्यासमोर बसून शांतपणे बोलली, ''तुम्ही आताच माझ्या नवऱ्याला भेटलात --- आणि त्याने तुम्हाला --- माझ्या वडिलांबद्दल सांगितले.''

पायरोने तिच्याकडे लक्ष देऊन बघितले. त्याला ती उंच बाई, तिच्या चेहऱ्यावरील बुद्धिमत्तेने व सत्चारित्र्याने अजून सुंदर वाटली. मिसेस फेरीयर लोकप्रिय होती. पंतप्रधानांची पत्नी असल्याने, ती चांगलीच प्रकाशझोतात होती. तिच्या वडिलांची मुलगी म्हणून, तिची कीर्ती आणखीनच थोर होती. लोकप्रिय इंग्लिश आदर्श स्त्रीत्वाचा ती नमुना होती.

ती वाहून घेतलेली बायको होती. ती नवऱ्याचे देशप्रेमाचे वागणे वाटून घेई. स्त्रियांच्या विश्वातील कार्यक्रमातंर्गत सामाजिक आयुष्यात तिने रुची घेतली होती. तिचा पोषाख उत्तम असे, पण कधीच चैनी किंवा भपकेबाज नसे. ती तिचा बराचसा वेळ मोठमोठ्या समाजोपयोगी कामात घालवत असे. बेकार माणसांच्या बायकांच्या मदतीसाठी असलेल्या योजनांचे उद्घाटन करे. ती पक्षाची जमेची बाजू असून, देशाचेही तिच्याकडे आशापूर्णतेने लक्ष असे.

पायरो म्हणाला, "बाईसाहेब, तुम्ही फारच काळजीत असणार."

"हो. मी आहे. किती ते तुम्हाला कळणार नाही. अनेक वर्षे मी काही अपेक्षेने डोळे लावून बसले आहे."

पायरो म्हणाला, “खरोखर काय चालले होते, याची तुम्हाला कल्पना नव्हती का?”

तिने डोके हलवले.

“नाही --- जराही नाही. मला फक्त एवढेच माहिती आहे, की माझे वडील त्यांना सगळेजण समजत होते --- तसे नव्हते. मी लहान असल्यापासून मला ते समजले होते. ते --- फसवे असून, त्यांचे बोलणे व वागणे वेगळे होते.”

तिचा आवाज कटू व खोल होता. ती बोलली, “माझे एडवर्डशी लग्न लावून दिल्यावर मला समजले, की एडवर्ड सगळे काही घालवून बसणार आहे.”

पायरो शांत आवाजात बोलला, “बाईसाहेब, तुम्हाला कोणी शत्रू होते का?”

तिने चमकून त्याच्याकडे पाहिले. “शत्रू? मला असे वाटत नाही.”

पायरो विचारपूर्वक म्हणाला, “मला वाटते तुमच्या व तुमच्या नवऱ्याविरुद्ध मोठी मोहीम सुरु झाली आहे. बाईसाहेब, तुमच्याकडे --- तुमच्याकडे धैर्य असेल, तर तुम्ही त्याला तोंड द्यायची तयारी ठेवली पाहिजे.”

ती रडू लागली. “माझे एवढे काही नाही. पण फक्त एडवर्ड!”

पायरो म्हणाला, “एकाच्या नादाने दुसरा त्यात सामील होतो. लक्षात ठेवा, बाईसाहेब, तुम्ही सीझरची पत्नी आहात.”

त्याने तिचा रंग उतरलेला पाहिला. ती पुढे वाकून म्हणाली, “तुम्ही मला काय सांगायचा प्रयत्न करत आहात?”

## तीन

पर्सी पेरी, एक्स रे बातम्यांचा संपादक त्याच्या टेबलाशी सिगरेट ओढत बसला होता. तो कोल्ह्यासारखा चेहरा असलेला छोटासा माणूस होता.

तो मृदु आवाजात बोलला, “आपण त्यांच्यावर घाण उडवू, हे ठीक आहे --- अरे मुला, ते छानच आहे.”

त्याच्या हाताखालचा दुसरा, बारीक चष्मिस, तरुण अस्वस्थतेने बोलला, “तुम्ही उदास झाला नाहीत?”

“मी बळकट हातांच्या मदतीची अपेक्षा करतो आहे? त्यांची नव्हे. माझ्यात तेवढे धैर्य नाही. मी त्यांचे काही भलेही करणार नाही. आपण जसे ठरवले आहे, त्या पद्धतीने नव्हे --- या देशात, या खंडात आणि अमेरिकेत.”

दुसरा म्हणाला, “ते खूप रागावले असतील. ते काही करणार नाहीत का?”

“ते कुणाला तरी तडजोडीची गोड बोलणी करायला पाठवतील --- “

फोनची घंटी वाजली. पर्सी पेरीने फोन उचलला. तो म्हणाला, “काय म्हणत आहात? ठीक आहे. त्यांना पाठवून द्या.”

त्याने जिवणी फाकवत, फोन खाली ठेऊन दिला.

त्यांच्याकडे तो मोठ्या आवाजात बोलणारा भंपक माणूस आहे. तो ते काम करायला येतो आहे. आपण त्याच्याशी बोलणी करू का, हे त्यांना जाणून घ्यायचे आहे.”

पायरो आत आला. त्याने स्वच्छ नीटनेटके कपडे केले होते --- त्याने गुलाबाचे फूल कोटाला लावले होते.

पर्सी पेरी बोलला, “मिस्टर पायरो, तुम्हाला भेटून आनंद झाला. रुंद टाय लाऊन तुम्ही जाता जाता वाटेवर राजेशाही निरवानिरव करायला आला आहात का? नाही? माझी चूक होते आहे.”

पायरो बोलला, “मी गार पडलो. एखादा चांगल्या स्वागताची अपेक्षा करतो. हे अजून जास्त महत्वाचे आहे,” त्याचे डोळे निरागसपणे संपादकाच्या चेहऱ्यावर व काहीशा महागड्या

चांगल्या कपड्यांवर फिरले. “जेव्हा एखाद्याला काही फायदे नैसर्गिकपणे मिळालेले असतात.”

पेरी थोडक्यात म्हणाला, “तुम्ही मला भेटायला का आला आहात?”

पायरो पुढे झुकून, त्याच्या गुडघ्यांवर बोटे वाजवत व हसत म्हणाला, “ब्लॅकमेल करण्यासाठी.”

“ब्लॅकमेल करण्यासाठी? म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

मी असे ऐकले आहे --- छोट्या पक्ष्याने मला सांगितले --- तुमच्या इतक्या नैतिक वर्तमानपत्रात, तुम्ही काही फार घातक विधाने प्रसिद्ध करण्याच्या तयारीत असल्याचे कळल्यामुळे --- आता तुमच्या बँकेत थोडी भर पडणार आहे --- शेवटी ती विधाने अजून प्रसिद्ध झाली नाहीत.”

पायरोने मागे झुकून, त्याचे डोके समाधानपूर्वक हलवले.

“तुम्हाला कल्पना आहे का, की तुम्ही असे सुचवून, गुन्हा करत असल्याचे तुमच्या लक्षात येते आहे का?”

पायरो आत्मविश्वासाने हसला.

“माझी खात्री आहे, तुम्ही ही संधी नाकारणार नाही.”

“मी ती घेईन कारण अजूनपर्यंत कुणी कुणाला ब्लॅकमेल केल्याचा पुरावा सापडलेला नाही.”

“नाही. नाही. त्याबद्दल मी अगदी खात्री देतो. तुमचा काहीतरी गैरसमज होतो आहे. मी तुम्हाला धमकी देत नाही आहे. मी एक प्रश्न साध्या पद्धतीने सोडवत होतो. किती?”

पर्सी पेरी म्हणाला, “तुम्ही काय बोलत आहात, मला समजत नाही.”

“मिस्टर पेरी, हे देशाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.”

त्यांनी एकमेकांकडे विशेष कटाक्ष टाकले.

पर्सी पेरी म्हणाला, “मी सुधारणावादी आहे. मिस्टर पायरो, मला स्वच्छ राजकारण आणायचे आहे. मी भ्रष्टाचाराविरुद्ध आहे. या देशात राजकारणाची काय स्थिती आहे, हे तुम्हाला माहिती आहे का? स्वच्छ करण्यास फार कठीण असलेले तबेले, जास्त नाहीत व कमीही नाहीत.”

पायरो बोलला, ‘असे आहे तर! तुम्हीदेखील वाक्प्रचार वापरू लागलात.”

संपादक म्हणाला, ‘आणि कसली गरज असेल, तर ते तबेले लोकांच्या मतांच्या मोठ्या पुरानी स्वच्छ करण्याची आहे.”

पायरो उठला व बोलला, "मी तुमच्या भावनांचा आदर करतो. हे दयनीय आहे, की तुम्हाला पैशांची गरज भासत नाही."

पर्सी पेरी घाईने म्हणाला, "एक मिनिट थांबा --- मी अगदी तसेच म्हणालो नाही --- "

पण पायरो दारातून निघून गेला होता.

नंतरच्या घटनांसाठीचे त्याचे म्हणणे होते, की त्याला ब्लॅकमेल करणारे लोक आवडत नाहीत.

## चार

एव्हेरीट्ट डॅशवूड, त्या शाखेतील आनंदी तरुण माणसाने पायरोची पाठ थोपटली. तो बोलला, "माझ्या मुला, सगळीकडे घाणच घाण आहे. माझी घाण स्वच्छ आहे एवढेच."

"मला असे म्हणायचे नव्हते की तू पर्सी पेरीइतका महत्वाचा/बरोबरीचा आहेस."

"लहानसा , वाईट रक्त शोषणारा! तो आपल्या व्यवसायावर धब्बा आहे. शक्य झाले तर आपण त्याला खाली खेचायला पाहिजे."

पायरो म्हणाला, “असे आहे की सध्या मी राजकारण स्वच्छ करायच्या मागे आहे.”

डॅशवूड बोलला, “स्वच्छ करण्यास फार कठीण असलेले तबेले स्वच्छ करायच्या मागे तू आहेस का? पण मुला, हे तुझ्यासाठी फार आहे. तू फक्त थेम्स व संसद स्वच्छ करायच्या कामी लक्ष दे.”

त्याचे डोके हलवत पायरो बोलला, “तू चक्रम आहेस.”

“मला जग माहिती आहे, एवढेच!”

पायरो म्हणाला, “हो. मला वाटते, मी शोधत असलेला माणूस तूच आहेस. तू एक चांगला खेळाडू आहेस. तुला वेगळे काही करायला आवडते आणि तू बिनधास्त आहेस.”

:आणि म्हणून काय?”

“मला एक योजना प्रत्यक्षात आणायची आहे. जर माझ्या कल्पना बरोबर असतील, तर लोकांच्या आवडीच्या एका बेताचा आपण बुरखा फाडू शकू. माझ्या मित्रा, यामुळे तुझ्या वर्तमानपत्राची चलती होईल.”

डॅशवूड आनंदाने बोलला “आणि मी हे करु शकतो.”

“हा एका बाईचे चारित्र्यहनन करण्यासंबंधीचा बेत आहे.

छान! मस्तच! लैगिकतेशी संबंधीचे सर्व काही खपते.”

“मग बस आणि ऐक.”

## पाच

लोक बोलत होते. लहानशा विम्प्लींगटन गावात वावड्या उठत होत्या. “मला नाही वाटत, असे काही असेल. जॉन हॅमेट प्रामाणिक माणूस आहे. इतर राजकारण्यांसारखा तो नाही.”

“ठीक आहे, ठग लोक तसे असल्याचे सापडण्यापूर्वी सगळे असेच म्हणतात.”

त्यांच्यापैकी हजारोजण म्हणतात की त्याने पॅलेस्टाईन तेलाच्या व्यापारात एवढे पैसे मिळवले आहेत.”

“तो काही वेड्यासारखाच सौदा होता. त्यांच्यापैकी सर्वजण तेच बोलत होते. त्यांच्यातील प्रत्येकजण वाईट माणूस होता.”

“तुम्ही एव्हरहार्डला असे करताना बघणार नाही. तो एक जुन्या वळणाचा माणूस आहे.”

“पण जॉन हॅमेट असा होता, यावर मी विश्वास ठेऊ शकत नाही. वर्तमानपत्रात छापून आलेले सगळे खरे असतेच, असे नाही.”

“फेरीयरची बायको त्याची मुलगी आहे म्हणे! तिच्याबद्दल काय लिहिले आहे, ते बघितलेस का?”

त्यांनी अनेक अंगठ्यांनी उलटलेल्या एक्स रे बातम्याच्या प्रतीवर बघितले,

“सिझर्सची बायको? आम्ही असे ऐकले की उच्च स्थानावरील राजकारणी स्त्री दुसऱ्या दिवशी विचित्र परिस्थितीत सापडली. तिच्यापेक्षा वयाने लहान तरुण प्रेमिकाला ती पैसे पुरवत असलेल्या अवस्थेत? ओहो, जाहिरातीचे प्रतिक --- प्रतिक होण्याइतकी तू अवखळ कशी काय होऊ शकलीस?”

एक गावठी हळू आवाज आला, “मिसेस फेरीयर इतकी दयाळू नाही. ती त्यांच्यापैकी इंग्लिश भाषा सोडून दुसरी भाषा बोलणारी कोल्ह्याच्या जातीची कुणी मादी आहे.”

दुसरा आवाज बोलला, “तुम्ही बायकांचे कधी काही सांगू शकत नाही. मला विचाराल, तर तो सगळा गट चुकीचा आहे.”

## सहा

लोक बोलतच होते. “पण लाडके, मला ते पूर्णपणे खरे वाटते. नाओमीला ते पॉलकडून कळले आणि त्याला अँडीकडून! ती खरेच अनैतिक आहे.”

“पण ती तर खूप साधी, योग्य व भावी संसद सदस्य होती.”

“लाडके, हा फक्त सारखेपणा होता. ते म्हणतात, ती लैगिकतेने पिसाटलेली होती. मी खरे सांगते आहे. हे सगळे एक्स रे बातम्यांमध्ये छापून आले आहे. हे फक्त छापलेले आहे पण तुम्ही ओळींच्या मधीलदेखील वाचू शकता. मला कळत नाही त्यांना हा सुगावा लागला कुठून?”

“या राजकीय प्रकरणाबद्दल तुला काय वाटते? ते असे म्हणतात, तिच्या वडिलांनी पक्षाचा पैसा लुबाडून त्याचा गैरवापर केला.”

## सात

लोक बोलतच होते.

“मला त्याबद्दल विचार करायला आवडत नाही. पण ते तसे आहे, मिसेस रॉजर्स. मला विचाराल, तर मला वाटते, मिसेस फेरीयर ही खरेच चांगली बाई होती.”

“तुम्हाला काय वाटते, या सगळ्या भयंकर बातम्या खऱ्या असतील?”

“मी म्हणते तसे, मला तिच्याबद्दल विचार करायला आवडत नाही. गेल्या जूनमध्येच तिने पेल्चेस्टर तेथे विक्रीसाठी नव्याने बाजार उघडला. मी आता जशी सोफ्याजवळ उभी आहे, तशीच मी अगदी तिच्याजवळची होते. आणि ती छान हसत होती.”

“पण मी काय म्हणते, आगीशिवाय जाळ नाही.”

“अर्थात, ते खरे आहे. ओहो प्रिय, मला असे वाटते, की तुझा कुणावरच विश्वास नाही.”

## आठ

चेहरा पांढरा पडलेला एडवर्ड फेरीयर, पायरोला बोलला, “हे माझ्या बायकोवरचे हल्ले! ते तिला बदनाम करायला केले होते --- नक्कीच तो हेतू होता! मी त्या वाईट खोडीविरुद्ध काही कृती करणार आहे.”

पायरो म्हणाला, “मी तुला असे करायचा सल्ला देणार नाही.”

“पण या खोट्यानाट्या अफवा थांबवल्याच पाहिजेत.”

“त्या खोट्या असल्याबद्दल तुमची खात्री आहे?””

“अर्थात हो, असे विचारल्याबद्दल देव तुम्हाला शिक्षा करो.”

त्याचे डोके एका बाजूला कललेले ठेऊन पायरो म्हणाला. “तुमची बायको काय म्हणते?”

क्षणभर फेरीयर दचकला.

“ती म्हणाली की आपण काही लक्षच द्यायचे नाही, हे उत्तम राहील --- पण मी असे करू शकत नाही --- प्रत्येकजण तेच बोलतो आहे.”

पायरो म्हणाला, “हो. प्रत्येकजण तेच बोलतो आहे.”

## नऊ

आणि मग सर्व वर्तमानपत्रात असे जाहीर केले गेले, की मिसेस फेरीयर यांचे चिंताग्रस्त ताणतणावातून मानसिक खच्चीकरण झाले होते. त्या उपचारांसाठी, स्कॉटलंडला गेल्या आहेत.

अर्धवट माहितीवरून काढलेला निष्कर्ष, अफवा --- खरी माहिती अशी होती की मिसेस फेरीयर स्कॉटलंडमध्ये नव्हत्या, त्या तिथे कधीच गेल्या नव्हत्या. मिसेस फेरीयर कुठे होत्या, याबद्दलच्या सगळ्या अफवा, खोट्या बातम्या --- आणि पुन्हा लोकांची कुजबुज.

“मी तुला सांगते, अँडीने तिला त्या भयंकर ठिकाणी पाहिले. ती प्यायली होती आणि भयंकर अर्जेन्टीयन रक्षणकर्ता तिच्याबरोबर होता.”

अजून वावड्याः मिसेस फेरीयर अर्जेन्टीयन नर्तकीबरोबर गेली आहे. मादक पदार्थ सेवन केलेली ती, कुणाला तरी पॅरीसला दिसली. ती ते अनेक वर्षे घेत आहे. तेव्हा तिने फारच जास्त घेतले होते.

पहिल्यांदा अविश्वास दाखवत असले, तरी हळूहळू इंग्लंडचे नैतिक स्वच्छ मन मिसेस फेरीयरविरुद्ध दृढ बनत चालले. असे वाटू लागले, त्यात काही तथ्य असावे. पंतप्रधानाची बायको अशी असावी! शक्य नाही. ती अतीच अनैतिक व निलाजरी आहे.”

आणि मग फोटो आले.

मिसेस फेरीयरचे पॅरीसमधील फोटो --- रात्रक्लबमध्ये पहुडलेली --- तिचे हात एका काळ्या, ऑलिव्हसारखी त्वचा असलेल्या, दुष्ट दिसणाऱ्या तरुण माणसाच्या गळयात पडलेले! इतर फोटो --- समुद्रकिनारी अर्धनग्न अवस्थेत --- तिचे डोके एका पहुडलेल्या पालीसारख्या माणसाच्या खांद्यांवर! आणि खालील मजकूर --- मिसेस फेरीयरचा चांगला वेळ घालवणे --- “

दोन दिवसांनी ‘एक्स रे बातम्या’ विरुद्ध कायदेशीर कारवाई.

# दहा

सर मॉर्टीमर इंगेलवूड याने केसची सुनावणी चालू केली. तो प्रसिद्ध रागीट वकील होता. मिसेस फेरीयर एका अप्रसिद्ध कटाला बळी पडली होती --- या कटाची तुलना फक्त अलेक्झांड्रा ड्यूमाच्या वाचकांना परिचित असलेल्या राणीच्या नेकलेसच्या, खूप बोलबाला झालेल्या कटाबरोबरच होऊ शकली असती. विशिष्ट भागातील लोकांच्या डोळयात स्तुत्य असलेल्या राणीच्या उच्च स्थानाला धक्का लावण्यासाठी हा कावा रचला जातो. त्या देशात सीझरच्या बायकोच्या जागी असलेल्या एका गुणी व शिष्टसंमत स्त्रीला तिच्या उच्च स्थानावरून खेचण्यासाठी, हा बेत रचला गेलेला असतो. सर मॉर्टीमर फॅसीस्ट व कम्युनिस्ट यांच्या विरुद्ध कटूतेने वाक्ताडन करतात. ते दोघेही लोकशाहीविरुद्ध वाईट बंडखोरपणे कावेबाजी करत असल्याचे जगजाहीर असते. नंतर तो साक्षीदारांना बोलावू लागतो.

नॉर्थ्रुम्बियाचा धर्मगुरू हा पहिला साक्षीदार होता. नॉर्थ्रुम्बियाचा धर्मगुरू, डॉ हेंडरसन, ही इंग्लिश चर्चमधील प्रसिद्ध व्यक्ती होती. तो चारित्र्यवान व मोठा संत होता. तो उदार मनाचा,

सहनशील आणि उत्तम व्याख्याता होता. त्याला ओळखणाऱ्या सर्वांचा तो लाडका होता व ते त्याला मान देत असत.

तो पिंजऱ्यात गेला व उल्लेख केलेल्या तारखांदरम्यान मिसेस फेरीयर राजवाड्यात त्याच्याबरोबर व त्याच्या बायकोबरोबर रहात होती, असे सांगितले. चांगल्या कामांमध्ये तिने स्वतःला गुंतवून घेतले होते. तिला पूर्ण विश्रांतीचा सल्ला देण्यात आला होता. छापखान्यापासून काही त्रास होऊ नये म्हणून, तिच्या या भेटीबद्दल गुप्तता पाळण्यात आली होती.

त्यानंतर प्रसिद्ध डॉक्टरने मिसेस फेरीयरला काळज्यांपासून पूर्णपणे दूर रहायचा सल्ला दिल्याचे सांगितले.

स्थानिक फॅमिली डॉक्टरने राजवाड्यात मिसेस फेरीयरला तपासल्याचा पुरावा दिला.

पुढचा साक्षीदार थेल्मा अँडरसन हिला बोलावले गेले. ती पिंजऱ्यात आली तेव्हा कोर्टातून एक शहारा उठला. प्रत्येकाला क्षणार्धात समजले, की मिसेस फेरीयरचे तिच्याशी खूपच साम्य होते.

“तुमचे नाव थेल्मा अँडरसन आहे का?”

ती उत्तरली, “हो.”

“तुम्ही डॅनिश आहात का?”

“हो. कोपनहेगनला माझे घर आहे.”

“आणि तुम्ही तेथील एका हॉटेलमध्ये काम करता?”

“हो, सर.”

“कृपया तुमच्या शब्दात सांगा की मागच्या १८ मार्चला काय झाले.”

“माझ्या टेबलाशी येणारा एक माणूस आहे --- इंग्लिश सभ्य माणूस. तो मला सांगतो, की तो एका इंग्लीश वर्तमानपत्रासाठी काम करतो --- ‘एक्स रे बातम्या’.”

“तुमची खात्री आहे की त्याने ‘एक्स रे बातम्या’ हेच नाव सांगितले?”

“हो. माझी खात्री आहे --- कारण, असे बघा, मला पहिल्यांदा वाटले की हे वैद्यकीय वर्तमानपत्र असावे. पण नाही, तसे नव्हते. नंतर तो म्हणाला की एक इंग्लिश सिनेमानटी आहे, जिला त्यात स्थान हवे आहे. आणि मी साधारण तशी दिसते. मी फारसे सिनेमे बघत नाही. मला त्याने घेतलेले नाव माहिती नव्हते. पण तो मला म्हणाला, की ती खूप प्रसिद्ध आहे. आणि तिला बरे नाही. त्यामुळे तिची अशी इच्छा आहे की सार्वजनिक ठिकाणी तिचे प्रतिनिधित्व कुणीतरी करावे. ती त्याबद्दल बरेच पैसे देईल.”

“या माणसाने तुम्हाला किती पैसे देण्याचे कबूल केले?”

“पाचशे पौंड. माझा पहिल्यांदा विश्वास बसला नाही --- मला वाटले तो मला फसवतो आहे. पण त्याने मला अर्धे पैसे लगेच दिले. मग मी जिथे काम करते तिथे, मी ते सोडत असल्याची सूचना दिली.” ती गोष्ट चालू राहिली. तिला पॅरीसला नेले गेले. उत्तम कपडे दिले गेले. आणि एक अंगरक्षक दिला गेला. एक भयंकर अर्जेन्टीयन रक्षणकर्ता --- फार नम्र व चांगला.”

असे दिसत होते, की त्या बाईने ते मस्त उपभोगले. ती लंडनला विमानाने परत आली. तिला तिच्या अंगरक्षकाने काही रात्रक्लबमध्ये नेले. त्याच्याबरोबर पॅरीसमध्ये तिचे फोटो काढले गेले. तिने कबूल केले, की ती गेलेल्या काही जागा चांगल्या नव्हत्या --- खरेच त्या सभ्य लोकांच्या वाटत नव्हत्या. काही फोटोही तसेच होते. पण या गोष्टी जाहिरातीसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी तिला सांगितले होते. सर रामन स्वतः चांगला माननीय माणूस होता.

प्रश्नांची उत्तरे देतांना तिने कबूल केले, की मिसेस फेरीयरच्या नावाचा उल्लेख कधीच केला गेला नाही. आणि तिला काही कल्पना नव्हती, की तिला मिसेस फेरीयरसाठी वापरले जात आहे. तिला कुणाला त्रास द्यायची इच्छा नव्हती. पॅरीस व रिव्हिएरामध्ये घेतले गेलेले काही फोटो तिला दाखवले गेल्यावर तिने ओळखले.

थेल्मा अँडरसन पूर्णपणे प्रामाणिक वाटत होती. ती नक्कीच एक आल्हादक पण जरा मूर्ख बाई होती. आता सर्व काही माहिती झाल्यावर, तिच्यावर काही आरोप करायचे कुणाला कारण उरले नाही.

बचाव निःशंकपणे पटणारा होता. त्या अँडरसन बाईला हे प्रकरण अजिबात माहिती नसल्याचे म्हणणे खरे वाटत होते. त्या बाबतीतले फोटो लंडनच्या कार्यालयात आणले गेले आणि ते खरेच होते. सर मॉर्टीमरच्या शेवटच्या भाषणाने खळबळ माजवली. त्याने हे सर्व प्रकरण ही दुष्टपणे आखलेली राजकीय खेळी / कूटनीती असल्याचे प्रतिपादन केले. पंतप्रधान व त्यांच्या बायकोला खाली खेचण्याचे हे सर्व कारस्थान होते. दुर्दैवी मिसेस फेरीयरच्या बाजूने सहानुभूतीचा ओघ वळला.

साक्षीदारांचे म्हणणे ऐकून, निकाल दिला गेला. नुकसानभरपाई म्हणून प्रचंड मोठा आकडा मान्य करण्यात आला. जेव्हा मिस्टर फेरीयर, मिसेस फेरीयर व तिचे वडील कोर्टातून बाहेर पडले, तेव्हा गर्दीतून त्यांचा विजयाच्या व अभिनंदनाच्या आरोळ्या दुमदुमल्या.

## अकरा

एडवर्ड फेरीयरने पायरोशी प्रेमाने हस्तांदोलन केले. तो म्हणाला,

“मिस्टर पायरो, मी तुमचा हजार वेळा आभारी आहे. तर अशा तऱ्हेने एक्स रे बातम्यांचा खात्मा झालेला आहे. वाईट लहानसे वर्तमानपत्र! त्यांचा सर्वनाश झाला आहे. अशा दुसऱ्याच्या कीर्तीला काळीमा फासणाऱ्या व त्यांच्याविरुद्ध नाही नाही त्या कंड्या पिकवणाऱ्याला चांगला धडा मिळाला. जाहिरात मोहिमेच्या दुष्ट उद्दिष्टाचे पितळ उघडे पडले. ते कुणी तोतया बाईला वापरत असतील, ही कल्पना तुम्हाला कशी सुचली?”

पायरो म्हणाल, “ही काही नवीन कल्पना नाही. जेव्हा जीन डी ला मोटेने मेरी अँटोनेटची भूमिका बजावून, काम केले होते, तेव्हा ते यशस्वी झाले होते.”

“मला माहिती आहे. मला ‘राणीचा नेकलेस’ परत वाचायला पाहिजे. पण ते तोतयाचे काम केलेल्या बाईला तुम्ही कसे काय हुडकून काढलेत?”

“मी तिला डेन्मार्कमध्ये शोधले आणि तिथे ती मला सापडली.”

“पण डेन्मार्क का?”

“कारण मिसेस फेरीयरची आजी डेन्मार्कची होती आणि ती स्वतःसुद्धा डेनिश प्रकारचीच दिसायची. अजूनही एक कारण होते.”

“त्यांच्यातील साम्य थक्क करणारे होते. काय राक्षसी कल्पना आहे! मला कळत नाही, त्या बेकार लोकांना अशी कल्पना कशी सुचली?”

पायरो हसला. “पण तो नाही हसला.” त्याने स्वतःच्या छातीवर बोटे वाजवली. ”मी याचा विचार केला.”

एडवर्ड फेरीयर त्याला निरखत राहिला. “मला समजत नाही, याचा अर्थ काय?”

पायरो हसला.

“आपल्याला एका पौराणीक गोष्टीकडे जावे लागेल. ‘राणीचे नेकलेस’ --- ते ‘स्वच्छ करण्यास फार कठीण असलेले तबेले साफ करण्याच्या गोष्टी’ पर्यंत! हर्क्युलसने काय वापरले, तर नदी --- म्हणजेच निसर्गाचा एक शक्तिमान स्त्रोत. ते आधुनिक करा. निसर्गाचा एक शक्तिमान स्त्रोत कुठला आहे? लैगिकता, नाही का? लैगिकतेने गोष्टी विकल्या जातात. त्याच्या बातम्या होतात. लोकांना लैगिकतेशी संबंधित प्रकरणे द्या आणि ती कुठल्याही

स्वतःची तुंबडी भरण्यासाठी केलेल्या राजकीय गुन्ह्यापेक्षा खळबळजनक ठरतात.

“अरे मित्रा, तेच माझे काम होते. हर्क्युलसने जसे नदीचा प्रवाह बदलण्यासाठी, पहिल्यांदा चिखलात हात घालून धरण बांधले, तसे माझ्या एका पत्रकार मित्राने मला मदत केली. त्याने योग्य व्यक्ती सापडेपर्यंत, डेन्मार्क धुंडाळून तोतयाचे काम केले गेले असावे, असे सुचवले. त्याने तिला शोधून काढले. तिच्याजवळ सहजच ‘एक्स रे बातम्या’चा उल्लेख केला. त्याला आशा होती, की तिला ते सर्व आठवेल. आणि तसेच झाले.

“आणि म्हणून काय झाले? चिखल --- खूपच चिखल. सीझरच्या बायकोला त्याने मढवून टाकले. प्रत्येकासाठी, कुठल्याही राजकीय प्रकरणापेक्षा जास्त स्वारस्य असलेले! आणि परिणाम --- एका खेळीचा कळस? की प्रतिसाद! गुणांचे खच्चीकरण! चांगल्या बाईवर आरोप! स्वच्छ करण्यास फार कठीण असलेल्या तबेल्यांवर अद्भुतरम्यतेचा व भावनामयतेचा जोरदार प्रवाह वहात असलेला!

जर देशातील सगळी वर्तमानपत्रे आता जॉन हॅमेटला पक्षाच्या पैशांचा दुरुपयोग केल्याबद्दल दोषी ठरवत असतील, तर त्यावर

कोणीच विश्वास ठेवणार नाही. हा सरकारला खच्ची करण्याचा दुसरा एक राजकीय डाव असल्याचे समजले जाईल.”

एडवर्ड फेरीयरने एक खोल श्वास घेतला. क्षणभर हर्क्युल पायरोला त्याच्या अख्या कारकिर्दीत पहिल्यांदाच शारीरिक इजा झाल्यासारखे वाटत होते.

“माझी बायको! तुमचे तिला वापरण्याचे धाडस --- “

सुदैवाने कदाचित, मिसेस फेरीयर त्याच क्षणी खोलीत शिरली. ती म्हणाली, “ठीक आहे. ते सर्व चांगले झाले.”

“जाहिरातीचा खप करण्याची आदर्श प्रतिमा --- तुम्हाला सगळे काही माहिती झाले आहे का?

मिसेस फेरीयर म्हणाली, “अर्थात, प्रिया.”

तिने पतिव्रता पत्नीसारखे स्मितहास्य केले.

“आणि तू मला हे कधीच सांगितले नाहीस.”

“पण एडवर्ड, तुम्ही मिस्टर पायरोला हे कधीच करू दिले नसते.”

“खरे आहे.”

जाहिरातीचा खप करण्याची आदर्श प्रतिमा हसली.

“असे आपल्याला वाटले.”

“आपल्याला?”

“मी आणि मिस्टर पायरो.”

ती मिस्टर पायरोकडे व तिच्या नवऱ्याकडे बघून हसली. ती म्हणाली,

“धर्मगुरुबरोबर माझा वेळ अगदी शांततेत गेला --- आता मला पूर्ण ताजेतवाने वाटते. पुढच्या महिन्यात लिव्हरपूल येथील नवीन लढाऊ जहाजाचे नामकरण मी करावे, असे ते म्हणत आहेत --- मला वाटते, ही गोष्ट करणे लोकप्रिय ठरेल.”

# The Stymphalean Birds

## स्टयम्फालीयन पक्षी



*[ हे पक्षी मनुष्याला खाणारे असून, त्यांच्या चोची ब्राँझसारख्या कठीण असतात. त्यांची पिसे कडक धातूसारखी असल्यामुळे, ते त्यांचे पंख पसरून भक्ष्यावर हल्ला चढवतात. त्यांची विष्ठा विषारी असते. ]*

हॅरॉल्ड वारिंगने त्यांना तळ्याच्या कडेच्या रस्त्याने चालतांना प्रथम पाहीले. तो हॉटेलबाहेर गच्चीवर बसला होता. दिवस छान होता. तळे निळे होते. सूर्य तळपत होता. हॅरॉल्ड पाइप ओढत होता आणि सर्व जग त्याला सुंदर अशी चांगली जागा वाटत होती.

त्याची राजकीय कारकीर्द चांगला आकार घेत होती. तिशीच्या वयात सचिवाचे काम करायला मिळणे, हे अभिमानाचे होते. असे ऐकण्यात आले, की पंतप्रधान कुणाला तरी सांगताना कळले, की "हा तरुण योद्धा फार पुढे जाईल." हॅरॉल्डला कृत्रिम रीत्या खूष करणे शक्य नव्हते. जीवनाने त्याच्यावर गुलाबी रंगाचा वर्षाव केला होता. तो तरुण होता. दिसायला पुरेसा चांगला होता. तब्येतीने उत्तम होता. अद्भुतरम्य पाशांनी जराही बांधला गेलेला नव्हता.

नेहमीच्या चक्रातून सुटका व्हावी व प्रत्येक व्यक्तीपासून आणि प्रत्येक गोष्टीपासून खरी विश्रांती मिळावी म्हणून, म्हणून त्याने हरझोस्लोवाकीयामध्ये सुट्टी घ्यायचे ठरवले होते. हॉटेल लेक स्टेम्पका या लहानशा, आरामशीर व फार गर्दी नसलेल्या ठिकाणी तो उतरला होता. तिथले बहुतेक लोक परदेशी होते. आतापर्यंत तरी दुसरे इंग्लिश लोक म्हणजे एक मिसेस राइस नावाची वयाने मोठी

बाई व तिची विवाहित मुलगी, मिसेस क्लेटॉन होत्या. हॅरॉल्डला त्या दोघीही आवडल्या. एल्सी क्लेटॉन जुन्या स्टाईलप्रमाणे आल्हादक होती. तिने केलाच तर फार थोडा मेकप ती करत असे. ती सभ्य आणि फार लाजरी होती. मिसेस राइस चारित्र्यवान बाई होती. ती उंच असून तिचा आवाज खोल होता. पण तिची विनोदबुद्धी चांगली असून तिची सोबत चांगली वाटत असे. तिचे आयुष्य तिच्या मुलीत गुंतलेले होते.

हॅरॉल्डने काही सुंदर तास त्या मायलेकीबरोबर घालवले. त्यांनी त्याला फार गुंतवून ठेवायचा प्रयत्न केला नाही आणि त्यांचे संबंध मित्रत्वाचे व वरवरचे राहिले.

हॉटेलातील दुसरे लोक हॅरॉल्डच्या लक्षात आले नाहीत. बहुधा ते खूप चालणारे लोक होते किंवा मोटार शिकणाऱ्या क्लबचे सभासद होते. ते एखाददोन रात्री राहून निघून जात. या दुपारपर्यंत त्यांच्यापैकी कुणी त्याच्या लक्षात आले नाहीत.

ते तळ्यापासून खूप हळू येत होते. आणि असे झाले की हॅरॉल्डचे लक्ष त्यांच्याकडे गेले तेव्हा सूर्यावर एक ढग आला आणि तो थोडा शहारला.

मग त्याने निरखून बघितले. त्या दोन स्त्रियांबद्दल काही विचित्र होते का? त्यांची नाके पक्ष्यांसारखी लांब व वाकडी होती. आणि

त्यांचे सारखे असलेले चेहरे अगदी हलत नव्हते. त्यांच्या खांद्यावर त्यांनी सैलसर शाल घेतली होती. ती वाऱ्याने उडून दोन मोठ्या पक्ष्यांच्या पंखांसारखी दिसत होती.

हॅरॉल्डने स्वतःशी विचार केला, ‘त्या पक्षांसारख्या आहेत.” आणि इच्छा नसतांना सहजपणे पुढे विचार केला, ‘अपशकुनासारखे पक्षी.”

त्या स्त्रिया गच्चीत सरळ त्याच्याजवळ आल्या. त्या तरुण नव्हत्या --- चाळीशीपेक्षा पन्नाशीच्या वाटत होत्या. आणि त्यांच्यात इतके साम्य होते की त्या बहिणीच असल्या पाहिजेत. त्यांचे हावभाव मनाई करणारे होते. त्या हॅरॉल्डच्या अंगावरून जाताना त्यांची नजर मिनिटभर त्याच्यावर खिळली. तो कटाक्ष चौकस, त्याची किंमत ठरवणारा व जवळजवळ ---अमानवी होता.

हॅरॉल्डवरील त्यांच्या पापी असण्याचा ठसा अधिकच वाढला. त्याच्या लक्षात आले की दोघींपैकी एका बहिणीचा हात पक्ष्यांच्या नखे असलेल्या पायासारखा होता --- सूर्य तळपत होता, तरी तो परत एकदा शहारला. त्याने विचार केला, “भयानक प्राणी! ससाण्यासारखे --- “

हॅाटेलपासून मिसेस राइसच्या येण्याने त्याची विचारशृंखला तुटली. त्याने उडी मारून त्याची खुर्ची पुढे ओढली. आभार मानून, ती बसली. तिने नेहमीप्रमाणे भरभर विणकाम सुरु केले.

हॅरॉल्डने विचारले, “आताच हॉटेलात शिरलेल्या दोन स्त्रियांना तुम्ही पाहिले का?

”शाली पांघरलेल्या? हो. त्या इथून गेल्या.”

“त्या कुणी वेगळ्याच भासल्या, असे तुम्हाला वाटले का?”

“अं --- म्हणजे कदाचित त्या जरा विचित्र दिसत होत्या. त्या इथे कालच आल्या आहेत. मला वाटते, त्या खूपच सारख्या दिसतात --- त्या नक्कीच जुळया असणार.”

हॅरॉल्ड बोलला, “मी कदाचित काहीही तर्क करत असेन. पण त्यांच्यात मला काहीतरी पापी दिसले.”

“किती विचित्र आहे! तुमच्याबरोबर सहमत होण्यासाठी मला त्यांना जवळून बघावे लागेल.”

ती पुढे बोलली, “हॉटेलच्या काळजीवाहू व्यक्तीकडून मी त्यांची माहिती काढते. पण त्या दोघी इंग्लिश नसाव्यात.”

“नको. नको.”

मिसेस राइसने तिच्या घड्याळाकडे नजर टाकून म्हटले, “चला, चहाची वेळ झाली. मिस्टर वारिंग, तुम्ही आत जाऊन घंटी वाजवाल का?”

“नक्कीच, मिसेस राइस.”

त्याने तसे केले आणि मग तो त्याच्या जागी येऊन बसला. त्याने विचारले, “आज दुपारी तुमची कन्या कुठे आहे?”

‘एल्सी? आम्ही एकत्र फिरायला गेलो. तळ्याभोवती थोडे फिरलो. मग पाइनच्या जंगलातून घरी आलो. ते खरेच छान वाटले.”

एका वेटरने येऊन चहाबरोबर काय हवे आहे, असे विचारले. मिसेस राइस यांनी झपाझप हात चालवत, तोंडही चालू ठेवले, “एल्सीला तिच्या नवऱ्याचे पत्र आले होते. ती कदाचित चहाला येणार नाही.”

“तिचा नवरा?” हॅरॉल्डला नवल वाटले. “तुम्हाला माहिती आहे का, मी तिला नेहमी विधवा समजत होतो.”

मिसेस राइसने त्याच्याकडे जळजळीत कटाक्ष टाकला. ती कोरडेपणे बोलली, “ओहो, नाही. एल्सी काही विधवा नाही.” तिने जोर देऊन म्हटले, “दुर्दैवाने!”

हॅरॉल्ड चमकला.

तिचे डोके गंभीरपणे हलवत, मिसेस राइस म्हणाली, “मिस्टर वारिंग, उत्तेजक पेय हे फार दुःखाला कारणीभूत ठरू शकते.”

“तो पितो का?”

“हो. आणि इतरही बऱ्याच गोष्टी तो स्वभावाने रागीट आहे आणि त्याची मनस्थिती ठीक नसून, तो फार हेवा करतो.” तिने सुस्कारा सोडला. मिस्टर वारिंग, हे जग कठीण आहे. मला एल्सीचे खूप प्रेम आहे. ती माझी एकुलती एक मुलगी आहे. तिला दुःखी बघणे ही गोष्ट सहन करणे, माझ्यासाठी सोपे नाही.”

हॅरॉल्ड मनापासूनच्या भावनेने बोलला, “ती किती सभ्य बाई आहे!”

“कदाचित जास्तच सभ्य आहे.”

‘म्हणजे तुम्हाला --- “

मिसेस राइस सावकाशीने म्हणाली, “सुखी प्राणी जरा उद्धट असतो. एल्सीचा सभ्यपणा मला वाटते, पराभवातून आलेला आहे. तिच्यासाठी आयुष्य चांगले नाही.”

हॅरॉल्ड थोडे कां कू करत बोलला, “तिने या नवऱ्याशी लग्न कसे केले?”

मिसेस राइस उत्तरल्या, “फिलीप क्लेटॉन फार आकर्षक होता. तो फार देखणा [ अजूनही ] आहे. त्याच्याकडे थोडेफार पैसे आहेत

--- त्याच्या खऱ्या चारित्र्याबद्दल आम्हाला सांगायला कोणीच नव्हते. मी अनेक वर्षे विधवा आहे. एकट्या रहाणाऱ्या दोन बायकांना अनोळखी माणसाचे चारित्र्य जाणून घेणे अवघड असते.

हॅरॉल्ड विचारपूर्वक बोलला, “हो, हे खरे आहे.”

त्याला वाटले की दयेची व रागाची लाट त्याच्यावर आरुढ होते आहे. एल्सी क्लेटॉन फार तर पंचवीस वर्षांची असेल. त्याला तिच्या निळया डोळयातील स्वच्छ मित्रत्वाचे भाव आठवले. त्याला अचानक जाणवले की त्याची तिच्यातील रुची मित्रत्वाच्या पलीकडे जाते आहे.

आणि ती तर त्या भिकार माणसाशी बांधली गेली होती ---

## दोन

त्या संध्याकाळी जेवणानंतर हॅरॉल्ड त्या मायलेकींना भेटला. एल्सी क्लेटॉनने हलकासा गुलाबी ड्रेस घातला होता. तिचे डोळे लाल असल्याचे त्याने पाहिले. ती रडत होती.

मिसेस राइस थोडक्यात म्हणाली, “मिस्टर वारिंग, मी त्या तुमच्या ग्रीक पुराणातील दोन झकपक बायका कोण आहेत, ते शोधून काढले. हॉटेलच्या काळजीवाहू व्यक्तीकडून मला असे समजले, की त्या चांगल्या कुटुंबातून आलेल्या आहेत.”

हॅरॉल्डने खोलीच्या दुसऱ्या टोकाला, जिथे त्या झकपक बायका बसल्या होत्या, तिथे पाहिले. एल्सी स्वारस्य घेऊन म्हणाली, "त्या तिथे बसल्या आहेत, त्या दोन बायका का? त्यांनी मेंदीने केस रंगवले आहेत का? त्या का कुणास ठाऊक, पण काहीतरीच दिसत आहेत."

हॅरॉल्ड विजयी सुरात बोलला, "मलाही तेच वाटत होते."

मिसेस राइस हसून बोलली, "मला वाटते तुम्ही दोघेही विचित्र आहात नुसते लोकांकडे पाहून ते कसे आहेत, हे आपण सांगू शकत नाही."

एल्सी हसली व म्हणाली, "मी समजते, तुझे बरोबर आहे. पण त्या गिधाडेच वाटतात."

हॅरॉल्ड म्हणाला, "आणि मला वाटते, त्या मेलेल्या लोकांचे डोळे फोडत बसणार."

"ओहो, असले काही बोलू नका." एल्सी ओरडली.

हॅरॉल्ड घाईने म्हणाला, "माफ करा."

मिसेस राइस हसून बोलली, "तसेही त्या काही आपल्या वाटेत येणार नाहीत."

एल्सी म्हणाली, "आपल्याकडे काही अपराधी वाटेल, अशी गुपिते नाही आहेत."

मिसेस राइस चमकून बोलली, “कदाचित मिस्टर वारिंगकडे असतील.”

हॅरॉल्ड मान मागे टाकत हसला. तो म्हणाला, “जगातले कुठलेही गुपित माझ्याकडे नाही. माझे आयुष्य म्हणजे उघडे पुस्तक आहे.” आणि मनातल्या मनात लाजला. “सरळ रस्ता सोडणारे लोक किती मूर्ख असतात! खरी सद्सदविवेकबुद्धी --- एवढ्याचीच आयुष्यात गरज असते. हे असल्यावर तुम्ही जगाला तोंड देऊ शकता. तुम्हाला राक्षसी प्रवृत्तीकडे नेणाऱ्या प्रत्येकाला सांगू शकता.” त्याला एकदम चैतन्यमय, खूप ताकदवान व स्वतःच्या नशीबाचा मालक असल्यासारखे वाटू लागले.

## तीन

हॅरॉल्ड वारिंग, इतर अनेक इंग्लिश लोकांसारखा वाईट भाषातज्ञ होता. त्याचे फ्रेंच तो थांबत थांबत बोलायचा आणि तेही ठरवल्यासारखे ब्रिटीश उच्चार करत! जर्मन आणि इटालियन त्याला अजिबात येत नसे.

आतापर्यंत त्याला स्वतःतील या त्रुटींचे काही वाटले नाही. जगातील मोठ्या हॉटेलांमध्ये त्याला सगळेजण इंग्लिशमधून बोलतांना आढळायचे, मग कसली काळजी?”

पण या अशा एकाकी जागी, येथील देशी भाषा एक प्रकारची स्लोव्हाकियन भाषा होती. पण येथील हॉटेलमधील रहिवासी जर्मन बोलत. जेव्हा हॅरॉल्डच्या त्या दोन मैत्रिणी त्याच्यासाठी दुभाष्याचे काम करत, तेव्हा त्याला पश्चात्ताप वाटे. भाषाप्रेमी असलेली मिसेस राइस तेथील स्लोव्हाकियन भाषा थोडीशी बोलू शके.

हॅरॉल्डने ठरवले, की तो जर्मन शिकायला सुरवात करेल. त्यासाठी त्याने काही पुस्तके विकत आणायचे व रोज सकाळी काही तास त्यासाठी खर्च करायचे ठरवले.

ती सकाळ प्रसन्न होती. काही अक्षरे लिहिल्यावर, हॅरॉल्डने त्याच्या घड्याळात पाहिले. अजून जेवणाला तासभर होता. तो तळ्याकडे गेला व नंतर पाइनच्या जंगलात फिरू लागला. तिथे पाच मिनिटे चालतो, तोच त्याने एक अचूक आवाज ऐकला. कुठेतरी जवळच एक बाई हुंदके देत, रडत, तिचे हृदय हलके करत होती.

हॅरॉल्ड थांबला व त्या आवाजाच्या दिशेने गेला. ती बाई एल्सी क्लेटॉन होती. ती तोंड हातात लपवून, एका पडलेल्या झाडावर बसली होती. तिच्या दुःखाच्या उमाळ्याने तिचे खांदे थरथरत होते.

हॅरॉल्ड मिनिटभर संभ्रमात राहिला व नंतर तिच्याजवळ गेला. हळूवारपणे तो म्हणाला, “मिसेस क्लेटॉन --- एल्सी?”

ती अजूनच जोरात रडू लागली व त्याच्याकडे पाहिले. हॅरॉल्ड तिच्याशेजारी बसला.

खऱ्या सहानुभूतीने म्हणाला, “मी काही करू शकतो का? काहीही सांग.”

तिने मान हलवली. “नाही --- नाही. तुम्ही दयाळू आहात. पण कुणीच माझ्यासाठी काही करू शकणार नाही.”

हॅरॉल्ड जरा नम्रपणे बोलला, “हे काही तुझ्या नवऱ्यासंबंधी आहे का?”

तिने नकारात्मक मान हलवली. मग तिने डोळे पुसले व तिची पावडरची डबी काढली. स्वतःला सावरत, थरथरत्या आवाजात ती बोलली,

“मला ममीला काळजी करायला लावायचे नाही आहे. मी दुःखी दिसले, की ती इतकी अस्वस्थ होते. म्हणून मी बाहेर पडून इथे रडते आहे. मला माहिती आहे, हा मूर्खपणा आहे. रडून काही होत नाही. पण काही वेळा --- असे वाटते --- की आयुष्य फार असह्य आहे.”

हॅरॉल्ड म्हणाला, “मला माफ करा.”

तिने त्याच्याकडे एक डौलदार कटाक्ष टाकला. मग ती घाईने म्हणाली, "हा माझाच दोष आहे. मी माझ्या इच्छेनेच फिलीपशी लग्न केले. पण --- पण ते सुखावह ठरले नाही. मला स्वतःलाच दोष दिला पाहिजे."

हॅरॉल्ड म्हणाला, "हे असे म्हणणे म्हणजे अडचणीत धैर्य दाखवणे आहे.

एल्सीने डोके हलवले. "नाही. मी काही धैर्य दाखवलेले नाही. मी मुळीच शूर नाही. मी फार घाबरट आहे. हे काहीसे फिलीप्सच्या त्रासामुळे आहे --- मी त्याला अतिशय घाबरते. जेव्हा तो रागाच्या भरात असतो, तेव्हा फारच घाबरते."

हॅरॉल्ड भावनामयतेने म्हणाला, "तू त्याला सोडले पाहिजेस."

"माझी तेवढी ताकद नाही. तो मला सोडणार नाही."

"हे वाईट आहे. घटस्फोट घेण्याचे काय?"

तिने सावकाश मान हलवली. खांदे सरळ करत बोलली,

"मला काही आधार नाही. माझे असेच चालणार. तुम्हाला माहिती आहे, मी माझ्या ममीबरोबर खूप काळ राहिले. विशेषतः यासारख्या वेगळ्या ठिकाणी आम्ही बरोबर जात असू. त्याला फिलिपची काही हरकत नाही."

तिच्या गालावर हळूहळू रंग चढू लागला. “असे बघा, असाही एक त्रास आहे, की तो खूप प्रमाणात हेवा करणारा आहे. जर --- जर मी कुणा माणसाशी जास्त बोलले, तरी तो भीतीदायक प्रसंग उभे करत असे.”

हॅरॉल्डचा राग वाढला. त्याने अनेक बायकांच्या नवऱ्यांच्या हेव्यादाव्याविषयीच्या तक्रारी ऐकल्या होत्या. सहानुभूती दाखवतांना तो गुप्तपणे अशा मताचा होता, की नवऱ्याला पुरेसा न्याय मिळतो. पण एल्सी अशा बायकांपैकी नव्हती. तिने अजूनपर्यंत त्याच्याकडे कधी लैंगिक अशा दृष्टीकोनातून बघितले नव्हते.

एल्सी थोडे शहारत त्याच्यापासून बाजूला झाली. तिने आभाळाकडे पाहिले. “सूर्य ढगाआड गेला. चांगली थंडी वाजू लागली आहे. हॉटेलमध्ये परतलेले बरे. जेवायची वेळही होत आली.”

ते उठले व हॉटेलच्या दिशेने चालू लागले. ते मिनिटभर चालले तेव्हा त्याना त्याच दिशेने चालणाऱ्या एका आकृतीने त्यांना मागे टाकले. तिच्या उडणाऱ्या शालीवरुन त्यांनी तिला ओळखले. ती पोलीश बहिणींपैकी एक होती.

हॅरॉल्डने थोडेसे वाकून दाखवत, तिला मागे टाकले. तिने काही प्रतिसाद दिला नाही. पण तिचे डोळे मिनिटभर त्या दोघांवर खिळले. त्या त्याला आजमावणाऱ्या दृष्टीक्षेपाने हॅरॉल्डला अचानक अस्वस्थ वाटले. त्याला एल्सीबरोबर झाडाच्या खोडावर बसलेले, तिने पाहिले की काय आणि कदाचित तिला असे वाटले नसेल ना ---

तिच्याकडे बघून तिला असे वाटलेले कळत होते. त्याच्यावरून एक रागाची लहर दौडत गेली. काही बायकांचे मन किती संशयी असते!

इतक्यात सूर्य ढगाआड जाऊन ते कुडकुडू लागले --- कदाचित बरोबर त्याच वेळी जेव्हा ती बाई त्यांना बघत होती ---

काही कारणाने हॅरॉल्डला अस्वस्थ वाटले.

## चार

त्या संध्याकाळी हॅरॉल्ड त्याच्या खोलीवर रात्री दहानंतर गेला. इंग्लिश नोकराणीने येऊन त्याला बरीच पत्रे दिली. त्यातील काहींना लगेच उत्तर देणे भाग होते.

त्याने पायजमा व गाऊन घातला व टेबलाशी पत्रे वाचायला बसला. त्याने तीन पत्रे लिहिली व चौथे लिहायला सुरवात करणार

तेवढ्यात दार सताड उघडून, एल्सी क्लेटॉन डगमगत खोलीत घुसली.

हॅरॉल्डने उडी मारली. तो चक्रावला. एल्सीने तिच्यामागे दार लावले आणि ती तिचा हात टेबलाच्या खणाशी घट्ट धरून उभी राहिली. ती धापा टाकत होती. तिचा चेहरा पांढरा पडला होता. ती मरणाची घाबरली होती.

ती धापा टाकत म्हणाली, "हा माझा नवरा आहे. तो अचानक इथे आला आहे. मी --- मला वाटते, तो मला ठार मारणार आहे. तो वेडा झाला आहे --- ठार वेडा. म्हणून मी तुमच्याकडे आले. नको --- नको. त्याच्यापासून माझा बचाव करा."

ती एकदोन पाऊले पुढे आली. तिचा घाम गळत होता. ती जवळजवळ पडली. हॅरॉल्डने तिला आधारासाठी हात दिला.

त्याने असे केल्यावर, दार उघडले गेले व तिथे एक माणूस उभा असलेला दिसला. तो मध्यम उंचीचा असून, दाट भुवया असलेला व काळेभोर चकचकीत डोके असलेला होता. त्याच्या हातात गाडीचा जड पाना होता. त्याचा आवाज चढला आणि तो रागाने थरथरू लागला. तो जोरात किंचाळला, "म्हणजे त्या बाईचे बरोबर होते. तुझी या माणसाशी भानगड चालू आहे!"

एल्सी ओरडली, “नाही. नाही फिलीप. हे खरे नाही तू चुकतो आहेस.”

हॅरॉल्डने चटकन तिला आपल्यामागे खेचले. फिलीप क्लेटॉन त्या दोघांवर ओरडत चालून आला, “मी चुकतो आहे? मग मी तुला या खोलीत कसे पकडले? तू --- राक्षसीण! यासाठी मी तुला मारून टाकेन.”

त्याने कडेने हळूच चाल करून, हॅरॉल्डचा हात बाजूला केला. एल्सी रडत हॅरॉल्डच्या दुसऱ्या बाजूला गेली. त्याने तिच्या नवऱ्याला बाजूला करायचा प्रयत्न केला.

पण फिलीप क्लेटॉनने त्याची बायको मिळवण्यासाठी, एक शक्कल लढवली. त्याने गरकन वळून दिशा बदलली.एल्सी घाबरून खोलीबाहेर पळाली. फिलीप क्लेटॉन तिच्यामागे धावला. आणि हॅरॉल्ड क्षणभर देखील वाया न घालवता, त्यांच्यामागे गेला.

पॅसेजच्या कडेला असलेल्या तिच्या झोपायच्या खोलीत एल्सी शिरली. हॅरॉल्डने कुलुपात किल्ली घातल्याचा आवाज ऐकला. पण ते वेळेवर बंद होईना. तत्पूर्वी फिलिपने दार सताड उघडले. तो खोलीत घुसला.

हॅरॉल्डने एल्सीची घाबरट किंकाळी ऐकली. दुसऱ्या मिनिटाला हॅरॉल्ड तिथे घुसला.

एल्सी खिडकीच्या पडद्याजवळ उभी होती. जसा हॅरॉल्ड आत आला, तसा फिलीप तिच्या अंगावर पाना घेऊन धाऊन गेला. ती जोरात किंचाळली. मग तिने तिच्याशेजारील टेबलावरून एक जड पेपरवेट उचलून घेतला व त्याच्या दिशेने फेकला.

फिलीप एखाद्या कुत्र्यासारखा खाली वाकला. एल्सी किंचाळली. हॅरॉल्ड थिजल्यासारखा थांबला. ती मुलगी गुडघ्यांवर तिच्या नवऱ्याच्या पायाशी वाकली. तो निपचित पडला.

पॅसेजबाहेर दाराची कडी लावल्याचा आवाज आला. एल्सी उडी मारून, हॅरॉल्डजवळ गेली.

दमलेल्या हळू आवाजात ती म्हणाली, "कृपा करा --- कृपया, तुमच्या खोलीत परत जा. ते आले तर त्यांना तुम्ही इथे सापडाल."

हॅरॉल्डने नकार दिला. क्षणार्धात तेथील परिस्थिती, त्याच्या लक्षात आली. फिलीप क्लेटॉन जखमी होऊन चुपचाप पडला होता. पण कदाचित एल्सीची किंकाळी त्याच्यापर्यंत पोचली असावी. जर तो तिच्या खोलीत सापडला असता तर ते लाजीरवाणे व गैरसमज करणारे ठरले असते. तिच्यासाठी व त्याच्यासाठीही काही प्रकरण उद्भवायला नको.

अजिबात आवाज न करता, त्याने पॅसेजमधून उडी मारली व त्याच्या खोलीत परत आला. तो तिथे पोचतो न पोचतो, तोच त्याने

दार उघडल्याचा आवाज ऐकला. तो खोलीत सुमारे अर्धातास बसला. थांबून राहिला. बाहेर येण्याचे धाडस केले नाही. लवकर किंवा उशीरा एल्सी नक्की येईल, असे त्याला वाटले.

दारावर एक हलकी थाप आली. हॅरॉल्डने उडी मारून ते उघडले.

ती एल्सी नसून, तिची आई होती. तिला बघून हॅरॉल्ड आश्चर्यचकित झाला. ती एकदम खूप म्हातारी दिसू लागली होती. तिच्या डोळ्याखाली काळी वर्तुळे उठली होती व करडे केस विस्कटले होते.

त्याने झटपट तिला खुर्चीत बसवले. ती बसली. ती जेमतेम श्वास घेत होती. हॅरॉल्ड घाईने बोलला, "मिसेस राइस, तुम्ही अस्वस्थ दिसत आहात. मी तुमच्यासाठी काही आणू का?"

तिने मान हलवली.

"नको. मी ठीक आहे. मला काही नको. फक्त मला धक्का बसला आहे. मिस्टर वारिंग, एक भयंकर गोष्ट घडली आहे."

हॅरॉल्डने विचारले, "फिलीप क्लेटॉनला फार लागले आहे का?"

तिने श्वास रोधून धरला. "त्याहूनही वाईट. तो मेला आहे ---
"

# पाच

खोली फिरू लागली.

हॅरॉल्डच्या कण्यातून जणू बर्फाचे पाणी झिरपू लागले. एकदोन मिनिटे तो मूकस्तंभ झाला.

तो मलूलपणे बोलला, “मेला?”

मिसेस राइसने मान हलवली. ती दमल्यामुळे तिचा आवाज पार खोल गेला होता. ती म्हणाली,

“त्या संगमरवरी पेपरवेटचा कोपरा त्याच्या बरोबर कानशीलावर लागला. शेकोटीच्या लोखंडी चौकटीवर डोके आपटत तो मागे खाली पडला. तो कसा काय मेला, मला माहिती नाही --- पण तो खात्रीने मेला आहे. मी मेलेली अनेक माणसे पाहिली आहेत, त्यामुळे मला माहिती आहे.”

“मोठे संकट --- तो शब्द हॅरॉल्डच्या डोक्यात घुमू लागला. महासंकट, महासंकट, महासंकट ---

तो भावनाक्षोभाने म्हणाला, “तो एक अपघात होता --- मी तो होतांना पाहिले.”

मिसेस राइस कडकपणे म्हणाली, “अर्थात तो अपघात होता. मला ते माहिती आहे. पण --- पण इतर कुणी असा विचार करेल का? मी ---

खरे तर घाबरून गेले आहे. हॅरॉल्ड, हे इंग्लंड नाही.”

हॅरॉल्ड सावकाश बोलला, “मी एल्सीची गोष्ट खात्रीपूर्वक सांगू शकतो.”

मिसेस राइस म्हणाली, “हो. आणि ती तुझी गोष्ट खात्रीपूर्वक सांगू शकेल. ते --- ते असेच आहे.”

हॅरॉल्डचा मेंदू नैसर्गिकपणे तल्लख व काळजी घेणारा होता. त्याने तिचे म्हणणे समजून घेतले. त्याने सर्व घटनेचे परीक्षण केले व त्यांच्या बाबतीतल्या त्रुटी समजावून घेतल्या.

एल्सी आणि त्याने बराच वेळ एकत्र घालवला होता. मग त्याना पाइनच्या जंगलात पोलीश बाईकडून जरा तडजोडीच्या परिस्थितीत एकत्र पाहिले गेले होते. त्या पोलीश बायकांना इंग्लिश बोलता येत नसे. पण थोडेफार समजत असे. जर तिने त्यांचे संभाषण चोरून ऐकले असेल, तर त्यांना ‘हेवादावा’ व ‘नवरा’ यासारख्या शब्दांचा अर्थ कदाचित कळत असावा. काही झाले तरी हे स्पष्ट होते, की तिने असे काहीतरी म्हटले होते, की क्लेटॉनचा हेवा करणे फार वाढले होते. आणि आता --- त्याचे मरण. जेव्हा

क्लेटॉन मेला, तेव्हा हॅरॉल्ड एल्सीच्या खोलीत होता. त्याने मुद्दाम होऊन फिलिपला पेपरवेट मारला असे कळण्यासाठी, काही पुरावा नव्हता. हेवा करणाऱ्या नवऱ्याला ते एकत्र सापडले नाहीत, असे म्हणायलादेखील काही पुरावा नव्हता. फक्त एल्सी व तो तसे सांगत होते. त्यांच्यावर विश्वास ठेवला जाईल का?"

त्याच्या शरीरातून एक भीतीची लहर दौडत गेली.

त्याने काही कल्पना केली नाही --- नाही, त्याने खरेच काही कल्पना केली नव्हती --- की तो किंवा एल्सी यांना खून केल्याकारणाने, फाशीची शिक्षा ठोठावली जाईल. काही झाले तरी खात्रीने, तो त्यांच्याविरुद्धचा मनुष्यवधाचा गुन्हा होता. [ या परदेशात मनुष्यवध होत होता का? ] जरी त्यांची आरोपातून सुटका झाली, तरी चौकशी झालीच असती --- सर्व वर्तमानपत्रातून ती बातमी झळकली असती. एक इंग्लिश माणूस व बाई यांना शिव्या बसल्या असत्या --- हेवा करणारा नवरा --- उदयोन्मुख राजकारणी. हो, म्हणजे त्याच्या करियरचा शेवट झाला असता. पण अशा प्रकरणातून बाहेर पडणे अवघड होते.

तो अचानक बोलला, "आपण ते प्रेत नाहीसे करू शकत नाही का? ते कुठे तरी पुरून टाकले तर?"

मिसेस राइसची त्याला कःपदार्थ समजणारी नवलपूर्ण नजर बघून त्याला लाज वाटली. ती उल्लेखनीय रीत्या स्पष्ट आवाजात म्हणाली, “माझ्या प्रिय हॅरॉल्ड, ही काही रहस्यमय गोष्ट नाही. अशी काही गोष्ट करणे, शुद्ध वेडेपणाचे आहे.”

तो गुरगुरला, “मला वाटते, ते जमेल. नाहीतर आपण काय करणार? अरे देवा, आपण काय करणार?”

मिसेस राइसने दुःखाने डोके हलवले. ती भुवया आक्रसून, नापसंती दर्शवत होती. मोठ्या कष्टाने तिचे विचार चालू होते.

हॅरॉल्डने ती काय विचार करत आहे, हे सांगण्याची मागणी केली.

“हे भयंकर प्रकरण टाळण्यासाठी, आपण अजून दुसरे काही करू शकत नाही का?”

“हे भयंकर प्रकरण टाळण्याचा एक उपाय आहे --- तो भयानक आहे --- भीतीदायक आहे ---पूर्वी कधी झालेला नाही.”

ते एकमेकांकडे रोखून बघू लागले. मिसेस राइस घोगऱ्या आवाजात बोलली, “एल्सी, माझ्या छोट्या मुली, हे भयंकर प्रकरण टाळण्यासाठी, , मी काहीही करेन --- नाहीतर हे प्रकरण तिला ठार करेल आणि तुझे करीयर आणि सर्व काही बरबाद करेल.”

हॅरॉल्ड बोलू शकला, “माझे काही एवढे मनावर घेऊ नका.”

पण ते बोलणे खरे नव्हते.

मिसेस राइस कटूपणे बोलल्या, “आणि सगळे इतके नकोसे --पूर्णपणे खोटे! तुमच्यात जणू कधी काही नव्हतेच. मला सगळे काही माहिती आहे.”

हॅरॉल्ड हरलेल्या आवाजात बोलला, “हे सर्व काही ठीक होते, असे निदान तुम्ही तरी म्हणू शकता.”

हो. जर ते माझ्यावर विश्वास ठेवणार असले तर! पण तुला माहिती आहे, की येथील लोक कसे आहेत.”

हॅरॉल्डने क्षीणपणे कबूल केले, की जगाच्या दृष्टीने त्याच्यात आणि एल्सीमध्ये नक्कीच गुन्हेगारी स्वरूपाचे लागेबांधे होते. मिसेस राइसने हे नाकारणे म्हणजे मुलीला वाचवण्यासाठी खोटे बोलणे होते.

हॅरॉल्ड क्षीणपणे म्हणाला, “हो. दुर्दैवाने आपण इंग्लंडमध्ये नाही आहोत.”

मिसेस राइस डोके वर करत म्हणाली, “ओहो, ते खरे आहे --- हे इंग्लंड नाही. काही करता आले, तर मला नवल वाटेल --- “

हॅरॉल्डने तिच्याकडे उत्सुकतेने पाहिले.

मिसेस राइस कसनुसे बोलली, “तुझ्याकडे किती पैसे आहेत?”

तो म्हणाला, “फार नाहीत. अर्थात मी तार करून मागवू शकतो.”

मिसेस राइस गंभीरपणे म्हणाली, “आपल्याला बरेच लागतील. पण मला वाटते तसा प्रयत्न करणे बरे राहील.”

हॅरॉल्डला थोडे दुःख झाले. तो बोलला, “तुमची काय कल्पना आहे?”

मिसेस राइस निर्णायक सुरात म्हणाली, “आपल्याला प्रेत लपवणे शक्य नाही. गुपचूप पण राजरोसपणे तसे करायची संधी आहे.”

हॅरॉल्डला आशा वाटली. पण तो थोडा अविश्वास दाखवत होता. “तुम्हाला खरेच असे वाटते का?”

“हो. एका गोष्टीसाठी हॉटेलचा व्यवस्थापक आपल्या बाजूने असेल. तो लोकांची तोंडे गप्प करू शकेल. माझ्या मते, हे जादा चौकस बल्गेरियन लोकांपैकी कुणालाही आणि सर्वांना --- पैशांची लालूच दाखवून --- नक्कीच लागू पडते --- आणि पोलीस तर कुणापेक्षाही जास्त भ्रष्ट असतात.”

हॅरॉल्ड सावकाश बोलला, “तुमचे बरोबर आहे, असा माझा विश्वास आहे.”

मिसेस राइसने चालू ठेवले, "सुदैवाने, मला वाटते हॉटेलमधील कोणी काही ऐकले नाही."

"एल्सीच्या पुढची खोली कुणाची आहे?"

"त्या दोन पोलीश स्त्रियांची. पण त्यांनी काही ऐकले नसावे. जर त्यांनी ऐकले असते, तर त्या बाहेर पॅसेजमध्ये आल्या असत्या. फिलीप उशीरा आला. रात्रीचा हमाल सोडून कुणीही त्याला पाहिले नाही. हॅरॉल्ड, तुला माहिती आहे का, मला वाटते सर्व काही सांगून टाकावे आणि तो नैसर्गिकपणे मेल्याचे प्रमाणपत्र डॉक्टरकडून घ्यावे. हा फक्त युक्तीने योग्य माणसाला येथपर्यंत आणायचा प्रश्न आहे --- बहुधा पोलीस इन्स्पेक्टर!"

हॅरॉल्ड गालातल्या गालात हसून बोलला, "हे विनोदी नाटक झाले, नाही का? ठीक आहे. शेवटी आपण प्रयत्न करून बघू, काय?"

## सहा

मिसेस राइसमध्ये उत्साह भरला गेला. पहिल्यांदा व्यवस्थापकाला बोलावले गेले. हॅरॉल्ड त्याच्या खोलीत राहिला ---प्रकरणाबाहेर! तो व मिसेस राइस यांनी ठरवले होते, की नवरा बायकोमधील भांडण अशी ही गोष्ट सांगितली जावी. एल्सीचे

तारुण्य आणि सौदर्य यामुळे तिच्याबद्दल लोकांना सहानुभूती वाटेल.

दुसऱ्या दिवशी सकाळी, वेगवेगळे पोलीस आले आणि त्यांना मिसेस राइस यांच्या झोपायच्या खोलीत नेले गेले. दुपारी ते निघून गेले. हॅरॉल्डने फक्त पैसे पाठवले पण बाकी कशात भाग घेतला नाही --- खरे तर त्याला असे करणे शक्य झाले नाही, कारण पोलीसांपैकी कुणालाच इंग्लिश येत नव्हते.

बारा वाजता मिसेस राइस त्याच्या खोलीवर आली. ती पांढरी पडली होती व दमली होती. पण तिच्या चेहऱ्यावर सुटकेचे भाव दिसत होते. ती म्हणाली, “ते सर्व सुरळीत झाले.”

“देवाचे आभार! तुम्ही हुशार ठरलात. याचे सर्व श्रेय तुमचे आहे.”

मिसेस राइस विचारपूर्वक बोलली, “हे इतक्या सुरळीतपणे झाले, की कुणालाही वाटेल हे सर्व अगदी सामान्य होते. त्यांनी फार काही चलाखी दाखवली नाही. हे खरे तर --- खरे तर उबग आणणारे होते!”

हॅरॉल्ड कोरडेपणे बोलला, “सार्वजनिक व्यवस्थेशी भांडण करायची ही वेळ नाही. किती दिले?”

“भाव जरा जास्त होता.”

तिने आकड्यांची यादी वाचली.

पोलीस सुपरीटेंडेंट

कमिशनर

दलाल

डॉक्टर

हॉटेल व्यवस्थापक

रात्रीचा हमाल

हॅरॉल्डचा शेरा एवढाच होता, “रात्रीचा हमालाला फार काही मिळाले नसेल, नाही का? हा फक्त सोनेरी लेसचा प्रश्न आहे.”

मिसेस राइसने स्पष्ट केले,

“हॉटेल व्यवस्थापक म्हणाला, की त्याच्या हॉटेलात असे व्हायलाच नको होते. खरी गोष्ट अशी होती की फिलिपला गाडीत हृदयाचा धक्का बसला. तो हवा मिळवण्यासाठी पॅसेजमध्ये गेला. तुला माहिती आहे, की ते कसे नेहमी दारे उघडी टाकत. तिथे तो पडला. पोलिसांनी काही करायचे ठरवले, तरी ते काय करणार?”

हॅरॉल्ड म्हणाला, “वा! वा! आपले पोलीस तसे नाहीत म्हणून बरे आहे.”

असे बोलून छान ब्रिटीश मनस्थितीत तो जेवायला गेला.

# सात

सहसा जेवणानंतर हॅरॉल्ड मिसेस राइस व तिच्या मुलीबरोबर कॉफी घेत असे. या नेहमीच्या कार्यक्रमात बदल न करण्याचे त्याने ठरवले. त्या दिवशी रात्रीनंतर त्याने प्रथमच एल्सीला पाहिले. ती फार अशक्त दिसत होती व अजून धक्क्यातून सावरलेली दिसत नव्हती. पण ती सर्वसामान्य वागणूक ठेवायचा कसून प्रयत्न करत होती. हवापाणी आणि निसर्ग यावर थोडे थोडे बोलत होती.

आताच येऊन दाखल झालेल्या एका पाहुण्याबद्दलत, त्याचे राष्ट्रीयत्व कोणते असेल, याबद्दल ते बोलत होते. हॅरॉल्डने त्याच्या मिशांवरून असा निष्कर्ष काढला, की तो फ्रेंच असला पाहिजे --- एल्सी म्हणाली जर्मन --- मिसेस राइसने म्हटले, स्पॅनिश.

त्यांच्याशिवाय गच्चीत कुणीच नव्हते. पण फक्त त्या दोन पोलीश बायका होत्या. त्या अगदी दुसऱ्या टोकाला काही भरतकाम करत बसल्या होत्या.

त्याने त्यांना बघितले, तेव्हा नेहमीप्रमाणे काळजी वा भीतीने त्याच्या अंगावरून सरसरून काटा आला. ते थंड चेहरे, नाकाच्या वाकड्या चोची व पक्ष्यांच्या नखे असलेल्या पायासारखे हात ---

एक मुलगा धावत धावत आला व मिसेस राइसला बोलावले असल्याचे सांगितले. ती उठून त्याच्यामागे चालू लागली. त्यांना हॉटेलच्या दाराशी पूर्ण गणवेषातील पोलीस दिसला.

एल्सीने श्वास रोधून धरला. “तुम्हाला असे वाटत नाही का --- काहीतरी नको ते घडले आहे?”

हॅरॉल्डने लगेच तिची समजूत काढली, “ओहो, नाही. नाही. तसे काही नाही.”

पण त्यालाही अचानक भीती वाटलीच. तो म्हणाला, “तुमची आई नवलपूर्ण आहे.”

एल्सी शहारत बोलली, “मला माहिती आहे. ममी चांगली लढवय्यी आहे. ती पराभवाच्या छायेत कधीच बसणार नाही. पण हे सर्व फार भयंकर आहे, नाही का?”

“आता असे बोलू नका. सर्व काही ठीक झाले आहे.”

एल्सी बारीक आवाजात बोलली, “मी ते विसरू शकत नाही, की मी त्याला मारले.”

हॅरॉल्ड घाईने बोलला, “असा विचार करू नका. तो एक अपघात होता. तुम्हाला खरे तर ते माहिती आहे.”

तिचा चेहरा थोडा उजळला.

हॅरॉल्ड पुढे बोलला, “आणि तसेही तो आता भूतकाळ झाला. तो गेला आणि गेला. परत त्याचा कधीही विचार करू नका.”

मिसेस राइस परत आली. तिच्या चेहऱ्यावरील भाव दर्शवत होते, की सर्व काही ठीक आहे.

ती आनंदाने म्हणाली, “त्यांनी मला चांगलेच घाबरवले. पण त्यांना फक्त काही कागद हवे होते. सर्व काही ठीक आहे. मुलांनो, आपण अंधारातून बाहेर पडलो आहोत. हा आनंद साजरा करण्यासाठी मला वाटते, आपण लिकर मागवू.”

लिकर मागवली व ती आली. त्यांनी त्यांचे पेले उंचावले.

मिसेस राइस म्हणाल्या, “भविष्यकाळासाठी!”

हॅरॉल्ड एल्सीकडे बघून हसला व बोलला, “तुमच्या आनंदासाठी!”

तिनेही त्याच्याकडे हसून पाहिले आणि पेला उंचावून म्हणाली, “आणि तुमच्यासाठी --- तुमच्या यशासाठी! माझी खात्री आहे की तुम्ही नक्की एक मोठा माणूस होणार आहात.”

भीतीच्या भावनेपासून ते आनंदी होण्यापर्यंत आले. त्यांच्या मनावरचे ओझे उतरले होते. भयाण सावलीतून त्यांची सुटका झाली होती. सर्व काही सुरळीत ---

गच्चीच्या दुसऱ्या टोकाहून, पक्ष्यांसारख्या त्या दोघी उठल्या. त्यांनी त्यांचे काम काळजीपूर्वक गोळा केले. त्या दगडी झेंडूयांपाशी आल्या. थोडे वाकून त्या मिसेस राइसशेजारी बसल्या. त्यापैकी एकीने बोलायला सुरवात केली. दुसरीने तिची नजर एल्सी आणि हॅरॉल्डकडे वळवली. तिच्या ओठांवर हास्य तरळत होते. हॅरॉल्डला ते हास्य चांगले वाटले नाही ---

त्यांनी मिसेस राइसकडे पाहिले. ती त्या पोलीश बाईचे म्हणणे ऐकत होती. त्याला वाटले, की जरी त्याला एकही शब्द समजणार नाही, तरी मिसेस राइसच्या चेहऱ्यावरील भावना त्याला पुरेशा समजत होत्या. सर्व जुना राग आणि दुःख उफाळून आले. ती ऐकत होती आणि प्रसंगवशात थोडेसे बोलत होती.

आता त्या दोघीजणी उठल्या आणि थोडे वाकून, हॉटेलमध्ये निघून गेल्या.

हॅरॉल्ड पुढे वाकून, घोगऱ्या आवाजात म्हणाला, “काय झाले?”

मिसेस राइसने फार निराश व दुःखी सुरात उत्तर दिले, “त्या दोघी आपल्याला ब्लॅकमेल करणार आहेत. त्यांनी काल रात्री सर्व काही ऐकले आहे. आणि आता आपण ते सर्व गुंडाळून बसलो

आहोत. यामुळे गोष्टी हजार पटीने जास्त गुंतागुंतीच्या झाल्या आहेत --- “

## आठ

हॅरॉल्ड वारिंग तळ्याच्या काठाने तासभर फिरत होता. त्याला थोडा ताप होता. त्याच्यावर चालून आलेला दुःखाचा आक्रोश केवळ शारीरिक शक्तीने रोखून धरण्याचा तो प्रयत्न करत होता.

पहिल्यांदा त्याला त्या दोन विचित्र अपशकुनी स्त्रिया भेटल्या, त्या जागेपाशी शेवटी तो आला. त्यांनी त्याला व एल्सीला त्यांच्या पकडीत घेतले होते. तो मोठ्याने म्हणाला, “त्यांना शाप द्या. ग्रीक पुराणातील रक्तपिपासू राक्षसी जोडीचा धिक्कार असो.”

थोडासा खोकला आल्याने, तो गोल वळला. तेव्हा त्याला ऐटीत मिशा ठेवलेला, नुकताच झाडांच्या सावलीतून आलेला एक परका इसम दिसला.

हॅरॉल्डला कळेना की काय बोलावे. तो आता जे काही बोलला, ते नक्की या छोट्या माणसाने ऐकले असणार.

पराभव झाल्यासारखा, हॅरॉल्ड अविश्वासाने बोलला, “ओहो --- शुभ दुपार.”

दुसरा उत्तम इंग्लिशमध्ये बोलला, “पण मला वाटते, तुमच्यासाठी, ही चांगली दुपार नसावी.

“अं --- खरे तर --- “ हॅरॉल्ड पुन्हा अडचणीत आला.

तो लहान मनुष्य म्हणाला, “मिस्टर, मला वाटते, तुम्हाला काही त्रास आहे. मी तुम्हाला काही मदत करू शकतो का?”

“नाही. नको. आभारी आहे. जरा तळ्यावर फिरून मी माझा ताण कमी करत होतो.”

दुसरा सभ्यपणे बोलला,

“पण मला वाटते, तुम्हाला माहिती आहे, मी तुम्हाला मदत करू शकतो. आताच गच्चीवर बसलेल्या त्या दोन स्त्रियांच्याबरोबर मी तुमचा त्रास जोडत नाही आहे? आणि मी बरोबर आहे.”

“हॅरॉल्डने त्याच्याकडे रोखून बघितले.

तो म्हणाला, “तुम्हाला त्यांच्याबद्दल काही माहिती आहे का? तसेही, तुम्ही कोण आहात?”

जसा काही राजघराण्यात जन्म झाला आहे अशा थाटात छोटा मनुष्य बोलला, “मी हर्क्युल पायरो आहे. आपण जंगलात जरा आड बाजूला जाउया का? म्हणजे मग तुम्ही मला तुमची गोष्ट सांगा. मी म्ह्टल्याप्रमाणे, तुम्हाला मदत करू शकेन.”

काही मिनिटापूर्वी ओळख झालेल्या त्या छोट्या माणसाजवळ सर्व गोष्ट सांगावी, असे हॅरॉल्डला का वाटले, कळले नाही. कदाचित तो फार ताणात होता. काही म्हटले, तरी असे झाले खरे! त्याने हर्क्युल पायरोला सर्व गोष्ट सांगितली.

पायरोने ती शांतपणे ऐकून घेतली. एकदोनदा त्याने थंडपणे मान हलवली. जेव्हा हॅरॉल्ड सांगायचा थांबला, तेव्हा दुसरा स्वप्नाळूपणे बोलला, “मानवी मासावर वाढणारे, लोखंडी चोचींचे स्टयम्फालीयन पक्षी स्टयम्फालीयन तळयाजवळ रहातात --- हो, हे बरोबर जुळते आहे.”

हॅरॉल्ड त्याला निरखत म्हणाला, “काय म्हणालात?”

त्याला वाटले, की कदाचित हा चौकस भासणारा माणूस वेडा असावा.

हर्क्युल पायरो हसला.

“मी असा विचार केला, एवढेच. समजले का, माझा सगळ्या बाबींकडे बघण्याचा वेगळा दृष्टीकोन असतो. आता तुमच्या या कामासंबंधी बोलू. तुम्ही फारच अडचणीत सापडला आहात.”

हॅरॉल्ड अधीरपणे बोलला, “हे सांगायला मला तुमची गरज नाही.”

पायरोने चालू ठेवले, "ब्लॅकमेल करणे, ही गंभीर गोष्ट आहे. या ग्रीक पुराणातील राक्षसी तुम्हाला पैसे --- आणि पैसे --- आणि अजून पैसे द्यायला लावतील! जर तुम्ही त्यांना विरोध केलात, तर काय होईल?"

हॅरॉल्ड कटूपणे बोलला, "खरी गोष्ट बाहेर येईल. माझे करीयर खराब होईल. आणि कधीही काही गुन्हा न केलेली मुलगी नरकात जाईल. या सर्वांचा शेवट काय होईल, हे देवालाच माहित!"

पायरो म्हणाला, "म्हणून काहीतरी केलेच पाहिजे."

हॅरॉल्ड बोथटपणे बोलला, "काय?"

त्याचे डोळे अर्धवट मिटून, पायरो मागे झुकला. तो म्हणाला, [ परत त्याच्या मानसिक स्वास्थ्याविषयी हॅरॉल्डला शंका वाटली. ] "ही ब्रॉंझ कॅस्टानेटची [ अथेना देवतेने हर्क्युलसच्या मदतीसाठी आणलेले आवाज करणारे वाद्य ] वेळ आहे."

हॅरॉल्ड म्हणाला, "तुम्ही जरा वेडे आहात का?"

दुसरा डोके हलवून बोलला, "अर्थात, मी फक्त माझ्या पूर्वजांच्या, हर्क्युलसच्या उदाहरणाचे अनुकरण करतो. माझ्या मित्रा, काही तास धीर धर. उद्यापर्यंत! मी तुला त्रास देणाऱ्या तुझ्या शत्रूपासून तुझी सुटका करू शकेन."

## नऊ

हॅरॉल्ड दुसऱ्या दिवशी सकाळी पायरोला शोधत आला. पायरो गच्चीत एकटाच बसलेला होता. पायरोने दिलेल्या ठामपणाच्या वचनामुळे हॅरॉल्ड प्रभावित झाला होता.

त्याने पायरोजवळ येऊन उत्सुकतेने विचारले, "काय कसे काय?"

पायरो त्याच्याकडे वळला."ठीक आहे."

"म्हणजे काय?"

"सर्व काही समाधानकारकपणे होते आहे."

"पण काय झाले आहे?"

पायरो स्वप्नाळूपणे म्हणाला, "मी ब्रॉंझच्या कॅस्टानेटला कामाला लावले आहे. किंवा आधुनिक भाषेत, मी धातूच्या तारांना गुणगुण करायला लावले आहे --- थोडक्यात, मी टेलिफोन वापरतो आहे. तुमचे स्टयम्फालीयन पक्षी अशा जागी हलवले आहेत, की जिथे काही काळ त्यांची जादा हुशारी चालणार नाही."

"त्या दोघी पोलिसांना हव्या होत्या? त्यांना अटक झाली आहे का?"

"अर्थात."

हॅरॉल्डने एक खोल श्वास घेतला.

“किती छान! मी असा विचार कधीच केला नव्हता.”तो उठला “मला मिसेस राइसला व एल्सीला भेटले पाहिजे व सर्व सांगितले पाहिजे.”

“त्यांना माहिती आहे.”

“ओहो, छान! मला सांगा काय --- “

तो अडखळला.

तळयाकडूनच्या रस्त्याने शाली उडवणाऱ्या दोन पक्ष्यांसारख्या आकृती येत होत्या.

त्या उद्गारल्या, “मला वाटले, तुम्ही म्हणालात की त्यांना पकडले गेले!”

पायरोने हॅरॉल्ड दृष्टीक्षेप टाकत होता, तिकडे बघितले.

‘ओहो, त्या दोघी? त्या काही त्रास देणार नाहीत. हमालाने तुम्हाला सांगितल्याप्रमाणे, त्या पोलीश कुटुंबातील चांगल्या स्त्रिया आहेत. त्यांचे दिसणे कदाचित तेवढे चांगले नसेल, पण त्याचे काय?”

“पण मला समजत नाही.”

“नाही तुम्हाला समजणार नाही! पोलिसांना दुसऱ्या दोघी हव्या होत्या ---

त्या हुशार मिसेस राइस व मिसेस क्लेटॉन या पोलिसांना हव्या होत्या. त्या शिकार करणाऱ्या पक्षिणी आहेत. माझ्या मित्रा, त्या दोघी ब्लॅकमेल करुन, जगत आहेत.”

हॅरॉल्डला जग त्याच्याभोवती फिरत असल्यासारखे वाटले. तो मलूलपणे बोलला, “पण तो मनुष्य --- तो मारला गेलेला मनुष्य!”

“कोणीच मारले गेले नाही. तिथे कुणी मनुष्य नव्हताच.!”

“पण मी त्याला पाहिले!”

“ओहो, नाही. उंच, खोल आवाज काढणारी मिसेस राइस पुरुष असल्याचे सोंग करते. नवऱ्याचे काम तिने केले --- तिच्या करड्या केसांच्या टोपाशिवाय आणि आणि खास त्यासाठी बनवलेला टोप घालून!”

तो पुढे वाकला व दुसऱ्याच्या गुडघ्यांवर बोटे मारली.

“माझ्या मित्रा, तुम्ही कुणावर अंधविश्वास ठेऊ नये. या देशाचे पोलीस पैसे घेऊन सहजासहजी फसणारे नाहीत --- मुळात, ते फसूच शकत नाहीत. विषेशतः खुनाची केस असेल, तर नाहीच! त्या दोघी सर्वसामान्य इंग्लिश लोकांच्या परदेशी भाषांच्या

अज्ञानावर व्यापार करत होत्या. मिसेस राइस फ्रेंच व जर्मन बोलू शकत असे. त्यामुळे ती व्यवस्थापकाची मुलाखत घेई व प्रकरणाचा ताबा घेई. पोलीस येत व तिच्या खोलीत जात. हो. पण खरे काय झालेले असे? तुम्हाला माहिती नसे. कदाचित ती सांगत असे की तिची खांद्यावर लावायची शोभेची पिन हरवली आहे --- किंवा असेच काही. असेच काही, की ज्या कारणाने पोलीस येतील आणि तुम्ही ते आलेले पहाल. आणि खरे तर काय झालेले असेल? तुम्ही बरेच पैसे मागवता. ते मिसेस राइसला देता. तीच सर्व बोलणी करत असते. तर हे असे आहे. तर अशा त्या शिकारी पक्षिणी लोभी आहेत. तिच्या लक्षात आले, की त्या दोन बिचाऱ्या दुर्दैवी पोलीश बायकांबद्दल तुमच्या मनात नकारात्मक भावना तयार झाली आहे. त्या दोघी येऊन मिसेस राइसशी साधेसे निरागस संभाषण करतात आणि मिसेस राइस परत तोच खेळ खेळायला बघते. काय संभाषण झाले हे तुम्हाला कधीच कळणार नसते.

तर तुम्ही परत तिला पैसे देणार आणि ती ते वेगळ्या व्यक्तींना देत असल्याचे ढोंग करणार.”

हॅरॉल्डने एक मोठा श्वास घेतला. तो बोलला, “आणि एल्सी --- एल्सी?”

हर्क्युल पायरोने त्याचे डोळे वळवले. “तिने पण तिची भूमिका, नेहमीप्रमाणे उत्तम वठवली. मोठी कसबी लहानशी नटी, सर्व काही अगदी खरे खरे व निरागस भासवणारी! ती लैंगिक दृष्ट्या काही करत नसे, पण फार उमदी स्त्री असल्यासारखे ढोंग करे.”

पायरो स्वप्नाळूपणे पुढे बोलला, “इंग्लिश लोकांच्या बाबतीत ते लागू पडत असे.”

हॅरॉल्ड वारिंगने खोल श्वास घेतला व तो ठाम, कोरड्या आवाजात बोलला, “मी आता प्रत्येक युरोपियन भाषा शिकायला सुरवात करणार आहे. परत कोणी मला मूर्ख बनवायला नको.”

# अनुवादिकेची ओळख

## डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे सव्वीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


## डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)















## डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)













वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI



THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



सॉमरसेट मॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night


शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल












## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.
## डॉ. वृषाली जोशी यांचे हे सव्वीसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू

गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची

आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।